# प्रस्तावना

ही माहितीपुस्तिका तुमच्या वाहनाचा एक आवश्यक भाग आहे आणि वाहन विकले किंवा अन्य पद्धतीने एखाद्या नवीन मालकाकडे किंवा चालकाकडे हस्तांतरित केले, तर ही माहितीपुस्तिका वाहनाबरोबरच राहिली पाहिजे. कृपया तुमचे नवीन मारुती सुझुकी वाहन चालवण्यास सुरुवात करण्यापूर्वी ही माहितीपुस्तिका काळजीपूर्वक वाचा आणि ती वेळोवेळी पुन्हा वाचत जा. त्यामध्ये सुरक्षितता, वाहनाचा वापर आणि देखभाल याबाबत महत्वाची माहिती आहे. माहितीपुस्तिकेत दिलेल्या चार मोफत तपासणी सेवांचा जरुर लाभ घ्या. या माहितीपुस्तिकेला चार मोफत तपासणी कूपन्स जोडलेली आहेत. कोणत्याही सेवेसाठी तुम्ही तुमचे मारुती सुझुकी वाहन तुमच्या डीलरकडे नेल्यास कृपया ही माहितीपुस्तिका त्याला दाखवा.

तुमच्या वाहनाचे आयुष्य वाढावे आणि देखभाल खर्च कमी व्हावा, यासाठी या माहितीपुस्तिकेच्या “तपासणी आणि देखभाल” विभागात दिलेल्या “ठराविक कालावधीनंतर करण्याच्या देखभालीचे वेळापत्रक” मध्ये वर्णन केल्यानुसार तुमच्या वाहनाची ठराविक काळानंतर देखभाल करणे आवश्यक आहे. तुमचे समाधान आणि सुरक्षितता यांच्या खात्रीसाठी त्रास आणि अपघात टाळण्यासाठी ती करणे आवश्यक आहे.

तुमच्या वाहनाचे आयुष्य वाढावे यासाठी आणि तुम्हाला सुरक्षितपणे वाहन चालवता यावे यासाठी “तपासणी आणि देखभाल” विभागात दिलेल्या “रोज करण्याच्या तपासणीची यादी” नुसार वाहनाची दररोज तपासणी आणि देखभाल करणे आवश्यक आहे.

मारुती सुझुकी इंडिया लिमिटेड पृथ्वीवरील नैसर्गिक साधनसंपत्तीचे संवर्धन आणि रक्षण करण्यावर विश्वास ठेवते.

या दृष्टीने आम्ही प्रत्येक वाहन मालकाला वापरलेले इंजिन ऑईल, कूलंट आणि इतर फ्लुइड्स, बॅटरीज आणि टायर्स इ. चा योग्य प्रकारे पुनर्वापर करणे, बदलून घेणे किंवा योग्य रीतीने त्यांची विल्हेवाट लावणे यासाठी उत्तेजन देतो.

**मारुती सुझुकी इंडिया लिमिटेड**

**या माहितीपुस्तिकेतील सर्व माहिती ही माहितीपुस्तिका प्रसिद्ध होण्याच्या वेळी उपलब्ध असलेल्या त्या उत्पादनाबाबतच्या सर्वात ताज्या माहितीवर आधारित आहे. सुधारणा आणि इतर बदलांमुळे ही माहिती आणि तुमचे वाहन यांमध्ये तफावती असू शकतील. मारुती सुझुकी इंडिया लिमिटेड उत्पादनामध्ये कोणतेही बदल कोणत्याही वेळी, कोणत्याही पूर्वसूचनेशिवाय करण्याचा आणि असे किंवा तत्सम बदल पूर्वी निर्माण केलेल्या किंवा विकलेल्या वाहनांमध्ये करण्याबाबत कोणतीही जबाबदारी निर्माण न करता हे किंवा तत्सम बदल करण्याचा अधिकार राखून ठेवते.**

**हे वाहन इतर देशांमधील मानके किंवा नियमनांची पूर्तता करेलच असे नाही. इतर कोणत्याही देशामध्ये या वाहनाची नोंदणी करण्याचा प्रयत्न करण्यापूर्वी लागू असलेली सर्व नियमने तपासा आणि योग्य त्या सुधारणा करा.**

# महत्वाचे

**⚠ इशार ा/ ⚠ सावधानीचा इशारा /*सूचना*/**
*टीप*

कृपया ही माहितीपुस्तिका काळजीपूर्वक वाचा आणि त्यातील सूचनांचे काळजीपूर्वक पालन करा. काही विशेष माहितीवर जोर देण्यासाठी ⚠ **इशारा**, **सावधानीचा इशारा**, ***सूचना*** आणि *टीप* या शब्दांना खास अर्थ आहेत. या सूचक शब्दांनी लक्ष वेधून घेणार्या संदेशांकडे विशेष लक्ष द्या:

**⚠ इशारा**

**एखादा संभाव्य धोका सुचवतो ज्यामुळे दुखापत किंवा मृत्यू होऊ शकतो.**


**⚠ सावधानीचा इशारा**

**एखादा संभाव्य धोका सुचवतो ज्यामुळे किरकोळ किंवा मध्यम दुखापत होऊ शकते.**

***सूचना***

**एखादा संभाव्य धोका सुचवतो ज्यामुळे वाहनाचे नुकसान होऊ शकते.**

*टीप:*
*देखभाल सोपी करणारी किंवा सूचना स्पष्ट करणारी विशेष माहिती सुचवतो.*



75F135

या माहितीपुस्तिकेत असलेली एका गोलात तिरक्या रेघेची खूण असे सुचवते की “हे करु नका” किंवा “हे घडू देऊ नका”.

# बदल/सुधारणा करण्याबाबत इशारा

**⚠ इशारा**

**तुमच्या वाहनात कोणतेही बदल/सुधारणा करु नका. बदल/सुधारणांचा अनिष्ट परिणाम वाहनाची सुरक्षितता, हाताळणी, कार्य, किंवा टिकाऊपणावर होऊ शकतो आणि सरकारच्या नियमांचा भंग होऊ शकतो. त्याव्यतिरिक्त अशा बदल/सुधारणांमुळे झालेले नुकसान किंवा कार्यातील समस्या वॉरंटीमध्ये समाविष्ट असतीलच असे नाही.**

***सूचना***

**सेल्युलर टेलिफोन किंवा सीबी (सिटिझन्स बँड) रेडिओसारखे मोबाईल संपर्क साहित्य तुमच्या वाहनात सदोष पद्धतीने बसवले असले तर त्यामुळे तुमच्या वाहनाच्या इग्निशन सिस्टिममध्ये इलेक्ट्रॉनिक व्यत्यय येऊन वाहनाचे कार्य बिघडू शकते. असे मोबाईल संपर्क साहित्य बसवण्याबाबत तुमच्या अधिकृत “मारुती सुझुकी कमर्शियल” डीलरचा सल्ला घ्या.**

***सूचना***

**मारुती सुझुकीने ज्यांची शिफारस केलेली नाही असे हीन दर्जाचे इंधन आणि/किंवा लुब्रिकंट्स वापरल्याने प्रचंड नुकसान होऊ शकते.**

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| इंधनासाठी शिफारस | 1 |
| वाहन चालवण्यापूर्वी | 2 |
| तुमचे वाहन चालवणे | 3 |
| वाहन चालवण्यासाठी टिप्स | 4 |
| इतर कंट्रोल्स आणि सामुग्री | 5 |
| वाहनात माल भरणे आणि ट्रेलर ओढून नेणे | 6 |
| तपासणी आणि देखभाल | 7 |
| संकटकालीन सेवा | 8 |
| वाहनाच्या बाह्य रुपाची काळजी घेणे | 9 |
| सर्वसाधारण माहिती | 10 |
| विनिर्देशने | 11 |
| बॉडी फॅब्रिकेशनसाठ सूचना (चॅसी प्रकारासाठी) | 12 |

# इंधनासाठी शिफारस

इंधनासाठी शिफारस ................................................................. 1-1

# इंधनासाठी शिफारस

## (पेट्रोल आणि द्वि-इंधन इंजिनच्या मॉडेलसाठी)

### पेट्रोल

तुम्ही 91 किंवा अधिक ऑक्टेन नंबरचे (आरओएन) अनलेडेड पेट्रोल वापरले पाहिजे.

- **पेट्रोल/इथेनॉल मिश्रणे**
  अनलेडेड पेट्रोल आणि इथेनॉल (धान्यापासून काढलेला मद्यार्क) यांची मिश्रणे, ज्यांना गॅसोनॉल असेही म्हणतात, ती काही भागांमध्ये व्यापारी तत्वावर उपलब्ध आहेत. अशा प्रकारच्या मिश्रणांमध्ये जर जास्तीत जास्त 10% इथेनॉल असेल, तर ती तुमच्या वाहनात वापरण्यास हरकत नाही. मात्र खात्री करा, की या पेट्रोल-इथेनॉल मिश्रणाचे रेटिंग कमीत कमी पेट्रोलसाठी शिफारस केलेल्या रेटिंगइतके असेल.

- **पेट्रोल/मिथेनॉल मिश्रणे**
  अनलेडेड पेट्रोल आणि मिथेनॉल (लाकडापासून काढलेला मद्यार्क) यांची मिश्रणेसुद्धा काही भागांमध्ये व्यापारी तत्वावर उपलब्ध आहेत. कोणत्याही परिस्थितीमध्ये 5% हुन अधिक मिथेनॉल असलेली इंधने वापरु नका. अशा इंधनांमुळे झालेली फ्युएल सिस्टिमची हानी किंवा वाहनाच्या कार्यामधील समस्या ही मारुती सुझुकीची जबाबदारी नाही आणि ती नवीन वाहनाच्या वॉरंटीमध्ये समाविष्ट असेलच असे नाही.
  5% किंवा कमी मिथेनॉल असलेली इंधने, जर त्यांमध्ये को-सॉल्व्हंट्स आणि करोजनरोधक द्रव्ये असली, तर तुमच्या वाहनात वापर करण्यासाठी योग्य असू शकतात.

*टीप:*
*एखादे पेट्रोल/अल्कोहोल मिश्रण वापरत असताना तुम्ही जर तुमच्या वाहनाची चालवण्याची क्षमता किंवा इंधनबचत याबाबत समाधानी नसलात, तर तुम्ही पुन्हा अल्कोहोलविरहित अनलेडेड पेट्रोल वापरणे सुरु करावे.*

***सूचना***

**इंधनाच्या टाकीमध्ये, गरम हवा असताना इंधनाचे प्रसरण होण्यासाठी जागा राहावी म्हणून हवेसाठी रिकामी जागा असते. फिलर नॉझल आपोआप बंद झाल्यानंतर किंवा सुरुवातीचा ब्लोबॅक झाल्यानंतर तुम्ही जर इंधन भरणे चालू ठेवले, तर हवेसाठीची जागा भरुन जाईल. अशा रीतीने टाकी पूर्ण भरल्यास गरम हवेमध्ये इंधनाच्या प्रसरणामुळे इंधनाची गळती होईल. अशी इंधनाची गळती टाळण्यासाठी फिलर नॉझल आपोआप बंद झाल्यानंतर, किंवा दुसरी एखादी नॉन-ऑटोमॅटिक पद्धत वापरताना सुरुवातीचा व्हेंट ब्लोबॅक झाल्यानंतर इंधन भरणे थांबवा.**

***सूचना***

**अल्कोहोलयुक्त इंधन भरत असताना ते सांडणार नाही याची काळजी घ्या. इंधन जर वाहनाच्या बॉडीवर सांडले, तर ते लगेच पुसून टाका. अल्कोहोलयुक्त इंधनांमुळे रंगाची हानी होऊ शकते, जे नवीन वाहनाच्या मर्यादित वॉरंटीमध्ये समाविष्ट नाही.**

## (द्वि-इंधन इंजिनच्या मॉडेलसाठी)

### सीएनजी

सीएनजी (कम्प्रेस्ड नॅचरल गॅस) मध्ये मुख्यतः मिथेन असतो. सीएनजी हे स्वच्छ इंधन मानले जाते. सीएनजीची घनता कमी असल्यामुळे, वाहनाची साठवण क्षमता वाढवण्यासाठी सीएनजी हा सुमारे 200 बार दाबाखाली कम्प्रेस केला जातो.

**⚠ सावधानीचा इशारा**

**सीएनजी ची गळती होत असल्याचा किंवा तो सुटत असल्याचा आवाज आला, किंवा सीएनजी पाइपिंगची बाहेरच्या बाजूला हानी झाली, किंवा अपघात झाला, तर गोंधळून जाऊ नका.**
- **वाहन थांबवून इंजिन बंद करा, खिड्क्यांच्या काचा खाली करा आणि सर्व दारे उघडा.**
- **मॅन्युअल शट ऑफ व्हॉल्व बंद केल्याची खात्री करा.**
- **पुढील मदतीसाठी अधिकृत मारुती सुझुकी कमर्शियल वर्कशॉपशी त्वरित संपर्क साधा.**

**(डिझेल इंजिनच्या मॉडेलसाठी)**

तुम्ही 51 हून जास्त सिटेन (सीएन) क्रमांक आणि 50 पीपीएमे (पार्टस पर मिलियन) हून कमी सल्फरचे प्रमाण असलेले डिझेल इंधन वापरले पाहिजे. मारुती सुझुकी EN590 ला अनुरुप असलेले डिझेल इंधन वापरण्याची शिफारस करते, मरीन डिझेल इंधन, हीटिंग ऑईल्स इ. वापरु नका.

***सूचना***

**इंधनाच्या टाकीमध्ये, गरम हवा असताना इंधनाचे प्रसरण होण्यासाठी जागा राहावी म्हणून हवेसाठी रिकामी जागा असते. फिलर नॉझल आपोआप बंद झाल्यानंतर किंवा सुरुवातीचा ब्लोबॅक झाल्यानंतर तुम्ही जर इंधन भरणे चालू ठेवले, तर हवेसाठीची जागा भरुन जाईल. अशा रीतीने टाकी पूर्ण भरल्यास गरम हवेमध्ये इंधनाच्या प्रसरणामुळे इंधनाची गळती होईल. अशी इंधनाची गळती टाळण्यासाठी फिलर नॉझल आपोआप बंद झाल्यानंतर, किंवा दुसरी एखादी नॉन-ऑटोमॅटिक पद्धत वापरताना सुरुवातीचा व्हेंट ब्लोबॅक झाल्यानंतर इंधन भरणे थांबवा.**


***सूचना***

**अल्कोहोलयुक्त इंधन भरत असताना ते सांडणार नाही याची काळजी घ्या. इंधन जर वाहनाच्या बॉडीवर सांडले, तर ते लगेच पुसून टाका. अल्कोहोलयुक्त इंधनांमुळे रंगाची हानी होऊ शकते, जे नवीन वाहनाच्या मर्यादित वॉरंटीमध्ये समाविष्ट नाही.**

# वाहन चालवण्यापूर्वी


चाव्या ........ 2-1
डोअर लॉक्स ........ 2-1
टेलगेट ........ 2-1
खिडक्या ........ 2-3
आरसे ........ 2-3
सीट्स ........ 2-3
सीट बेल्ट्स ........ 2-4
इंस्ट्रूमेंट क्लस्टर ........ 2-9
स्पीडोमीटर ........ 2-10
फ्युएल गेज........ 2-10
माहितीचा डिस्प्ले ........ 2-10
वॉर्निंग आणि इंडिकेटर लाइट्स ........ 2-14
लाइटिंग कंट्रोल लिव्हर........ 2-18
हेडलाइट लेव्हलिंग स्विच........ 2-19
वळण्याच्या सिग्नलची कंट्रोल लिव्हर........ 2-19
हॅझार्ड वॉर्निंग स्विच........ 2-20
विंडशील्ड वायपर आणि वॉशर लिव्हर........ 2-20
हॉर्न........ 2-22
सीएनजी सिलिंडर वॉर्निंग लेबल (असल्यास) ........ 2-22
सीएनजी वॉर्निंग लेबल (असल्यास) ........ 2-22
सीएनजी मॅन्युअल शट ऑफ व्हॉल्व (असल्यास)........ 2-23

## चाव्या




51KM024

तुमच्या वाहनाबरोबर दोन चाव्या येतात. मॉडेलच्या प्रकारानुसार, चावीला (चाव्यांना) ट्रान्समिटर असू किंवा नसूही शकतो. अतिरिक्त चावी सुरक्षित जागी ठेवून द्या. एका चावीने वाहनातील सर्व लॉक्स उघडता येतात.


चाव्यांचा आयडेंटिफिकेशन क्रमांक चाव्यांबरोबर दिलेल्या एका धातूच्या टॅगवर किंवा चाव्यांवर कोरलेला आहे. हा टॅग (दिला असल्यास) सुरक्षित जागी ठेवा. तुमच्या चाव्या हरवल्या तर नवीन चाव्या बनवून घेण्यासाठी तुम्हाला या क्रमांकाची गरज लागेल. तुमच्या पुढील संदर्भासाठी हा क्रमांक खाली लिहून ठेवा.

| चावी क्रमांक: |
|---|
| |

## डोअर लॉक्स

### साईड डोअर लॉक्स

**ड्रायव्हरचे दार**




76MH0A001


(1) लॉक करणे
(2) लॉक उघडणे
(3) पुढील
(4) मागील

वाहनाच्या बाहेरून ड्रायव्हरचे दार लॉक करण्यासाठी:

- चावी आत सरकवा आणि चावीची वरची बाजू वाहनाच्या पुढच्या दिशेने फिरवा, किंवा
- लॉकचा नॉब खाली दाबा, नंतर दार लावताना दाराचे हँडल मागे ओढून धरा.

वाहनाच्या बाहेरून ड्रायव्हरचे दार उघडण्यासाठी चावी आत सरकवा आणि चावीची वरची बाजू वाहनाच्या मागच्या दिशेने फिरवा.


वाहनाच्या बाहेरून प्रवाशाचे दार उघडण्यासाठी लॉकचा नॉब खाली दाबा, नंतर दार लावताना दाराचे हँडल मागे ओढून धरा.




54G005


(1) लॉक करणे
(2) लॉक उघडणे

## टेलगेट




77PH025

टेलगेट हे लॉकची हँडल्स (1) ओढून उघडता येते. ते बंद करताना जोर लावून बंद करा.




77PM201


तसेच टेलगेट हे अर्धवट उघडे असताना टेलगेट चेनच्या (2) मदतीनेसुद्धा बंद करता येते.

**सूचना**

**टेलगेटची चेन (2) वापरात नसताना पिनच्या (3) सहाय्याने बंद करा.**

**⚠ इशारा**

- **टेलगेट उघडे / अर्धवट उघडे असताना वाहन चालवल्यास टेलगेट वर-खाली होत राहील आणि ते इतरांना लागून दुखापत किंवा मृत्यूसुद्धा होऊ शकतो.**
- **टेलगेट उघडे / अर्धवट उघडे असल्यास इतर वाहनचालकांना टेललाईट्स पाहण्यात अडथळा येतो व त्यामुळे अपघात होऊ शकतात. वाहन चालवण्यापूर्वी टेलगेट बंद असून घट्ट बसले असल्याची खात्री करा.**
- **एखादा अपघात झाला तर आतील सामान वाहनाबाहेर फेकले जाऊ नये यासाठी टेलगेट बंद असून घट्ट बसले असल्याची खात्री करा.**
- **टेलगेट अर्धवट उघड्या स्थितीत लॉक झाले असताना त्याच्यावर उभे राहू नका किंवा त्यावर सामान ठेवू नका.**
- **जर टेलगेट पूर्णपणे उघड्या स्थितीत असले तर वाहनाच्या मागच्या बाजूचे लाईट्स, जसे पोझिशन लॅम्प, वळण्याच्या सिग्नलचा इंडिकेटर आणि स्टॉप लॅम्प हे झाकले जातात आणि ते दिसू शकत नाहीत.**





77PM202

**⚠ इशारा**

- **जर टेलगेट (1) पूर्णपणे उघड्या स्थितीत असताना सामान आत ठेवायचे किंवा बाहेर काढायचे असेल तर रस्त्यावरच्या इतरांना वाहन असल्याचे समजावे म्हणून रस्त्यावर सर्वांना दिसेल अशा रीतीने एक इशारा देणारी त्रिकोणी खूण (वॉर्निंग ट्रॅंगल) (2) ठेवली पाहिजे.**

## खिडक्या


### मानवी पद्धतीनेविंडो कंट्रोल




60G010

डोअर पॅनेलवर असलेले हँडल फिरवून दाराच्या खिडक्यांच्या काचा वर-खाली करा.

### मागील खिडकी





77PH073

खिडकी उघडण्यासाठी लॉक (1) दाबा आणि खिडकी सरकवा.

## आरसे

### आतील रिअरव्ह्यू आरसा

आरश्यामध्ये तुमच्या वाहनाच्या मागील बाजूचे दृश्य दिसण्यासाठी तुम्ही आतील रिअरव्ह्यू आरसा हाताने हलवू शकता.





74LHT0235

### बाहेरील बाजूचा(चे) रिअरव्ह्यू आरसा(से)

तुमच्या वाहनाच्या बाजू जेमतेम दिसाव्या असा रीतीने बाहेरील बाजूचा(चे) आरसा(से) हलवा.

**⚠ इशारा**

**बाजूच्या बहिर्गोल आरश्यामध्ये दिसणारे वाहन किंवा इतर वस्तूच्या अंतराचा अंदाज घेताना काळजी घ्या. लक्षात घ्या, की या वस्तू साध्या सपाट आरश्यामधून दिसतात त्यापेक्षा जास्त लहान आणि दूर असल्याचा भास होतो.**




64P0190

## सीट्स

### सीट हलवणे (ड्रायव्हरचे सीट)

**⚠ इशारा**

**वाहन चालवताना कधीही ड्रायव्हरचे सीट हलवण्याचा प्रयत्न करु नका. सीट अनपेक्षित रीतीने हलू शकते व त्यामुळे वाहनावरील नियंत्रण जाऊ शकते. वाहन सुरु करण्यापूर्वीच ड्रायव्हरचे सीट योग्य स्थितीत असल्याची खात्री करा.**

**⚠ इशारा**

**सीट बेल्ट नको इतका सैल असण्याचे टाळण्यासाठी, ज्यामुळे एक सुरक्षिततेचा उपाय म्हणून सीटची परिणामकारकता कमी होते, सीट बेल्ट्स लावण्यापूर्वी सीट्स योग्य स्थितीत असल्याची खात्री करा.**



77PH087


**सीट पोझिशन ॲडजस्टमेंट लिव्हर (1)**
लिव्हर वर ओढा आणि सीट सरकवा.

सीट सरकवल्यानंतर ते घट्ट जागेवर बसले असल्याच्या खात्रीसाठी ते मागे आणि पुढे सरकवण्याचा प्रयत्न करा.

**⚠ सावधानीचा इशारा**

**सीट सरकवताना त्यात तुमचे हात सापडणार नाहीत, किंवा सीट तुमच्या शरीरावर आपटणार नाही याची काळजी घ्या.**

## सीट बेल्ट्स




65D231S

**⚠ इशारा**

**तुमचे सीट बेल्ट्स कायम लावून ठेवा.**

**⚠ इशारा**

**वाहन कुठे आदळल्यास दुखापत किंवा मृत्यूचा धोका कमीत कमी राहण्यासाठी ड्रायव्हर आणि प्रवासी यांनी कायम सीट बेल्ट्स लावून ठेवले पाहिजेत, म्हणजे ते जागेवरच घट्ट राहतील, मग त्यांच्या सीटपाशी एअर बॅग असो की नसो.**




65D606

**⚠ इशारा**

- **वाहनाच्या सामान ठेवण्याच्या जागेत कधीही माणसांना बसायला परवानगी देऊ नका. जर अपघात झाला, तर जे लोक सीटवर बसून सीट बेल्ट लावलेल्या स्थितीत नसतील, त्यांना दुखापत होण्याचा धोका खूपच वाढतो.**
- **सीट बेल्ट्स नेहमी खालीलप्रमाणे लावलेले असले पाहिजेत:**
  - **बेल्टचा बैठकीचा भाग हा नेहमी कमरेखालच्या भागावरुन आडवा घेतला पाहिजे, कमरेवरुन आडवा नाही.**
  - **खांद्यावरुन येणारे पट्टे नेहमी बाहेरच्या बाजूला असलेल्या खांद्यावरुन घेतला पाहिजे, खांद्याच्या खालच्या बाजूने कधीही नाही.**
  - **खांद्यावरुन येणारे पट्टे तुमचा चेहरा आणि मानेपासून दूर असले पाहिजेत, पण खांद्यांवरुन खाली पडू नयेत.**

(पुढे चालू)




65D201




65D199

**⚠ इशारा**

(पुढे चालू)

- सीट बेल्ट्स हे पट्ट्यांना पीळ पडलेल्या स्थितीत कधीही लावू नयेत आणि ते ज्या संरक्षण देण्याच्या उद्देशाने बनवले आहेत, तो उद्देश पूर्ण होण्यासाठी ते शक्य तितक्या घट्ट, पण आरामशीर असतील अशा रीतीने लावावेत. सैल असलेल्या बेल्टमुळे, शरीरालगत बसलेल्या बेल्टपेक्षा कमी संरक्षण मिळते.
- प्रत्येक सीट बेल्टचे बकल हे योग्य त्याच बकल कॅचमध्ये घातले असल्याची खात्री करा.

(पुढे चालू)

**⚠ इशारा**

(पुढे चालू)

- गर्भवती महिलांनी सीट बेल्ट्स वापरावेत, मात्र अशा महिलेच्या वैद्यकीय सल्लागाराने तिच्यासाठी योग्य त्या विशिष्ट शिफारसी कराव्या. लक्षात ठेवा, की आकृतीमध्ये दाखवल्याप्रमाणे बेल्टचा बैठकीचा भाग हा नेहमी पार्श्वभागाच्या शक्य तितका खाली आडवा घेतला पाहिजे, कमरेवरुन आडवा नाही.
- तुमचा सीट बेल्ट तुमच्या खिशातील किंवा कपड्यांवर ठेवलेल्या कठीण किंवा ज्या फुटू शकतील अशा वस्तूंवरुन लावू नका. अपघात झाल्यास सीट बेल्टच्या खाली असलेल्या चष्मा, पेन इ. वस्तूंमुळे दुखापत होऊ शकते.

(पुढे चालू)

**⚠ इशारा**

(पुढे चालू)

- कधीही एकच सीट बेल्ट एकापेक्षा अधिक व्यक्तींवरुन लावू नका आणि प्रवासी व्यक्तीच्या मांडीवर असलेल्या अर्भकाच्या किंवा बालकाच्या अंगावरुन कधीही लावू नका. अपघात झाल्यास सीट बेल्टमुळे गंभीर दुखापत होऊ शकते.
- ठराविक कालावधीनंतर सीट बेल्ट असेंब्लीज तपासा आणि त्यांचे कुठे फार जास्त नुकसान झाली नाही ना, हे पहा. सीट बेल्ट्सचे वेबिंग जर फाटू लागले असेल, कोणत्याही प्रकारे दूषित किंवा खराब झाले असेल, तर ते बदलावेत. जरी एखाद्या मोठ्या धडकेमध्ये असेंब्लीचे झालेले नुकसान सहज डोळ्यांनी दिसत नसले, तरी अशा वेळी वापरलेली सीट बेल्ट असेंब्ली पूर्णपणे बदलणे गरजेचे असते.
- अर्भके आणि लहान मुलांना जर सीट बेल्ट्सनी व्यवस्थित बांधून एका जागी ठेवले नसेल, तर कधीही त्यांना घेऊन प्रवास करु नये.
- लहान मुलांच्या बाबतीत जर सीट बेल्ट्स मुलाच्या मानेला किंवा चेहर्याला घासत असेल, तर अशा मुलाला वाहनाच्या मध्यभागाच्या आणखी जवळ न्या.
- सीट बेल्ट्सच्या वेबिंगचे पॉलिश, ऑईल, रसायने, आणि विशेषतः बॅटरी ऍसिडमुळे दूषितीभवन होणे टाळा. सौम्य साबण आणि पाण्याने ते सुरक्षितपणे साफ केले जाऊ शकतात.

(पुढे चालू)

**⚠ इशारा**


(पुढे चालू)
- **सीट बेल्टच्या बकल्समध्ये नाणी, क्लिप्स इ. सारख्या वस्तू कधीही घालू नका, आणि या भागांमध्ये द्रव पदार्थ सांडणार नाहीत याची काळजी घ्या. सीट बेल्टच्या बकलमध्ये एखादी बाहेरची वस्तू गेली तर सीट बेल्ट व्यवस्थित काम करु शकणार नाही.**

## मांड्या-खांद्यावरुन घेण्याचा बेल्ट


### इमर्जन्सी लॉकिंग रिट्रॅक्टर (ईएलआर)

सीट बेल्टमध्ये एक इमर्जन्सी लॉकिंग रिट्रॅक्टर (ईएलआर) असतो, जो फक्त वाहन अचानक थांबले किंवा त्याला जोराचा धक्का बसला, तरच सीट बेल्ट लॉक करण्यासाठी असतो. तुम्ही बेल्ट जर फार चटकन तुमच्या शरीरावरुन आडवा घेतला, तरी तो लॉक होऊ शकतो. असे झाल्यास बेल्ट सोडून देऊन तो अनलॉक करा, आणि मग सावकाश पुन्हा शरीरावरुन आडवा घ्या.

**सुरक्षिततेबाब लक्षात ठेवण्याच्या गोष्टी**





60A038





60A040

धडक बसल्यास बेल्टच्या खालून सरकण्याचा धोका कमी करण्यासाठी बेल्टचा बैठकीचा भाग हा पार्श्वभागाच्या शक्य तितका खाली घ्या आणि बेल्टचा खांद्याचा भाग लॅच प्लेटमधून वर ओढून बेल्ट शरीराशी व्यवस्थित चिकटून बसेल अशा रीतीने बसवा. खांद्यावरुन तिरक्या येणार्या बेल्टच्या भागाची लांबी शरीराची हालचाल सहज करता येऊ शकेल अशा रीतीने आपोआप कमी-जास्त होते.




60A036


सीट बेल्ट व्यवस्थित लावण्यासाठी सीटमध्ये ताठ आणि मागे टेकून बसा, सीट बेल्टला जोडलेली लॅच प्लेट शरीरावरुन आडवी ओढा, आणि तुम्हाला क्लिक आवाज ऐकू येईपर्यंत सरळ बकलमध्ये दाबा.




60A039

सीट बेल्ट सोडवण्यासाठी बकलवरील बटन दाबून बेल्ट आणि/किंवा लॅच प्लेट हाताने धरुन बेल्ट सावकाश मागे न्या.

### ड्रायव्हरचा सीट बेल्ट वॉर्निंग लाईट / समोरच्या प्रवाश्याचा सीट बेल्ट वॉर्निंग लाईट (असल्यास)




77PM02017

(1) ड्रायव्हरचा सीट बेल्ट रिमाइंडर लाईट / समोरच्या प्रवाश्याचा सीट बेल्ट रिमाइंडर लाईट

जेव्हा ड्रायव्हर आणि / किंवा समोरचा प्रवासी सीट बेल्ट्स लावत नाहीत, तेव्हा सीट बेल्ट रिमाइंडर लाईट चालू होईल किंवा लुकलुकेल आणि ड्रायव्हर आणि / किंवा समोरच्या प्रवाशाला सीट बेल्ट लावायची आठवण करून देण्यासाठी एक बझर वाजेल, अधिक माहितीसाठी, खाली दिलेले स्पष्टीकरण पहा.

**⚠ इशारा**

**ड्रायव्हर आणि प्रवाशांनी पूर्ण वेळ त्यांचे सीट बेल्ट्स लावणे अत्यावश्यक आहे. जी लोक सीट बेल्ट्स लावत नाहीत त्यांना अपघातात इजा होण्याचा धोका जास्त असतो. इग्निशन स्विच मध्ये चावी टाकण्यापूर्वी आपला सीट बेल्ट लावण्याची नियमित सवय लावावी.**

*टीप :*
*ड्रायव्हरचा सीट बेल्ट रिमाइंडर लाईट / समोरच्या प्रवाश्याचा सीट बेल्ट रिमाइंडर लाईट ड्रायव्हर आणि समोरचा प्रवासी दोघांसाठी आहे.*

**ड्रायव्हरचा सीट बेल्ट रिमाइंडर**

इग्निशन स्विच “ऑन” स्थितीत असताना ड्रायव्हरचा सीट बेल्ट लावलेला नसेल तर, रिमाइंडर पुढीलप्रमाणे काम करेल:


1) ड्रायव्हरचा सीट बेल्ट रिमाइंडर लाईट चालू होईल.
2) व्हेईकल्सचा वेग तासाला 15 km/h पर्यंत पोहचल्यावर ड्रायव्हरचा सीट बेल्ट रिमाइंडर लाईट लुकलुकेल आणि बझर सुमारे 95 सेकंदांसाठी वाजेल.
3) जोपर्यंत ड्रायव्हर सीट बेल्ट लावत नाही तोपर्यंत रिमाइंडर लाईट चालू राहील.

जर ड्रायव्हरने त्याचा किंवा तिचा सीट बेल्ट लावला आणि नंतर सीट बेल्ट काढला, तर रिमाइंडर सिस्टीम व्हेईकल्सच्या वेगानुसार टप्पा 1) किंवा 2) पासून सक्रिय होईल. व्हेईकल्सचा वेग 15 km/h तास पेक्षा कमी असेल तेव्हा रिमाइंडर टप्पा 1) पासून चालू होईल. व्हेईकल्सचा वेग 15 km/h तास पेक्षा जास्त असेल तेव्हा रिमाइंडर टप्पा 2) पासून चालू होईल.

ड्रायव्हरने सीट बेल्ट लावल्यावर किंवा इग्निशन स्विच बंद केल्यावर रिमाइंडर आपोआप बंद होईल.

**समोरच्या प्रवाश्याचा सीट बेल्ट रिमाइंडर लाईट**

जेव्हा इग्निशन स्विच “ऑन” स्थितीत असताना पुढच्या प्रवाशाच्या सीट मध्ये बसलेल्या व्यक्तीने सीट बेल्ट लावलेला नसेल तर, समोरच्या प्रवाश्याचा सीट बेल्ट रिमाइंडर सक्रिय होईल.




69RH203

(2) समोरच्या प्रवाश्याचा सीट बेल्ट रिमाइंडरचा सेन्सर

सीट बेल्ट रिमाइंडरचा सेन्सर (2) समोरच्या सीटवर व्यक्ती बसल्याचा तपास करतो. सीट कुशन मध्ये समोरच्या प्रवाश्याचा सीट बेल्ट रिमाइंडरचा सेन्सर स्थित असतो.

समोरच्या प्रवाश्याचा सीट बेल्ट रिमाइंडर ड्रायव्हरच्या सीट बेल्ट रिमाइंडर सारखाच काम करतो.

## सूचना

- सीट कुशन मध्ये समोरच्या प्रवाश्याचा सीट बेल्ट रिमाइंडरचा सेन्सर स्थित असतो. जर जड किंवा टोकदार वस्तू सीट कुशन वर ठेवल्यास, किंवा जर प्रवाशाची सीट काढली, वेगळी केली आणि त्यात बदल केले गेले तर सेन्सर नीट काम करणार नाही किंवा त्याचे नुकसान होऊ शकते.
- सीट कव्हरच्या विविधतेमुळे सेन्सरच्या प्रक्रियावर विपरीत परिणाम होऊ शकतो.मारुती सुजुकीची शिफारस आहे की तुम्ही या व्हेईकलसाठी मारुती सुजुकीचे अस्सल सीट कव्हर वापरा.
- आपण पुढच्या प्रवाशाच्या सीट कुशन वर लिक्विड अरोमेटिक्स, सॉफ्ट ड्रिंक किंवा रस सारखे द्रव सांडल्यास, सीट कुशन मध्ये असलेल्या समोरच्या प्रवाशाच्या सीट बेल्ट रिमाइंडरचे सेन्सर खराब होऊ शकते. सांडल्यास लगेच कोरड्या मऊ कापडाने पुसून टाका.

(क्रमश)

## सूचना

(क्रमश)

- समोरच्या प्रवाशाच्या सीट वर बसताना, सीटबेल्ट रिमाइंडर सिस्टीम प्रभावीपणे कार्य करण्यासाठी प्रवाश्याने सीट बॅकरेस्टच्या बाजूला झुकणे आणि सीट कुशनवर केंद्रित करणे फार महत्वाचे आहे. एखादा रहिवासी अयोग्यरित्या बसलेला (स्लॉच, बाजूने फिरतो, पुढे बसतो किंवा बाजूला असतो) या सिस्टीमच्या कामकाजात हैंपर येऊ शकतो कारण त्यास बसणारी व्यक्ति सापडत नाही.


*टीप :*

- *आपण प्रवाशाच्या सीटवर एखादी वस्तू ठेवल्यास त्या वस्तूचे वजन सेन्सर द्वारे कळेल आणि समोरच्या प्रवाशाच्या सीट बेल्ट रिमाइंडर लाईट चालू होईल आणि नंतर आतील बज़र बीप होऊ शकेल.*
- *जर मुल किंवा लहान आकाराचा व्यक्ती समोरच्या प्रवाशाच्या सीटवर बसला असेल किंवा पुढच्या प्रवाशाच्या सीटवर कुशन ठेवली असेल तर सेन्सर द्वारे वजन कमी होऊ शकत नाही आणि आतील बज़र बीप होऊ शकत नाही.*

*टीप :*

*मारुती सुजुकीचीने सीट कव्हरची मारुती सुजुकीची खरी अक्सेसरिज वापरण्याची शिफारस केली आहे.*

### सीट बेल्टची तपासणी




65D209S


ठराविक कालांतराने सीट बेल्ट्स तपासून खात्री करा, की ते व्यवस्थित काम करत असून त्यांचे कुठे नुकसान झालेले नाही. सीट बेल्टचे वेबिंग, बकल्स, लॅच प्लेट्स, रिट्रॅक्टर्स, ऍंकरेजेस, आणि गाईड लूप्स नीट तपासा. काम व्यवस्थित करत नसलेले किंवा खराब झालेले सीट बेल्ट्स बदला.

## ⚠ इशारा

**कुठेही धडक बसल्यानंतर सर्व सीट बेल्ट असेंब्लीज नीट तपासून पाहिल्याची खात्री करा. धडक बसण्याच्या वेळी वापरात असलेली कोणतीही सीट बेल्ट असेंब्ली (धडक अगदीच किरकोळ नसल्यास), जरी तिला झालेले नुकसान डोळ्यांनी सहज दिसत नसले तरी बदलली पाहिजे. धडक बसण्याच्या वेळी वापरात नसलेली कोणतीही सीट बेल्ट असेंब्ली जर व्यवस्थित काम करत नसेल किंवा तिचे कोणत्याही प्रकारे नुकसान झाले असेल, तर ती बदलली पाहिजे.**

## इंस्ट्रूमेंट क्लस्टर

1. स्पीडोमीटर
2. माहिती प्रदर्शन
3. ट्रिप मीटर सिलेक्टर नॉब
4. चेतावणी आणि निर्देशक दिवे




77PM02001


## स्पीडोमीटर

स्पीडोमीटर हा वाहनाचा वेग दर्शवतो

## फ्युएल गेज

### (पेट्रोल आणि द्वि-इंधन इंजिनच्या मॉडेलसाठी)


**पेट्रोल**




77PM07020


### (द्वि-इंधन इंजिनच्या मॉडेलसाठी)

**सीएनजी**




77PM07019

### (डिझेल इंजिनच्या मॉडेलसाठी)




77PH006

जेव्हा इग्निशन स्विच “ON” स्थितीत असते, तेव्हा हा गेज इंधनाच्या टाकीत अंदाजे किती इंधन आहे, हे सांगतो. “F” म्हणजे टाकी पूर्ण भरलेली असते आणि “E” म्हणजे टाकी रिकामी असते.


फ्युएल मीटर जर “E” च्या अलिकडे फक्त एक भाग दाखवत असला, तर लवकरात लवकर टाकीत इंधन भरुन घ्या.

*टीप:*
*जर शेवटचा भाग उघड-मीट करु लागला, तर याचा अर्थ असा, की टाकी जवळजवळ पूर्णपणे रिकामी झाली आहे.*

खूण (1) दर्शवते की इंधन भरण्याचे टाकीचे दार वाहनाच्या उजव्या बाजूला आहे.


## माहितीचा डिस्प्ले

### (पेट्रोल आणि द्वि-इंधन इंजिनच्या मॉडेलसाठी)




77PM07021

### (डिझेल इंजिनच्या मॉडेलसाठी)




77PH109

(1) ट्रिप मीटर सिलेक्टर नॉब
(2) माहितीचा डिस्प्ल

जेव्हा इग्निशन स्विच “ON” स्थितीत असते, तेव्हा माहितीचा डिस्प्ले खालील माहिती दाखवतो.

**डिस्प्ले (अ)**
फ्युएल गेज

**डिस्प्ले (ब)**
ओडोमीटर / ट्रिप मीटर / घड्याळ / ब्राइटनेस कंट्रोल

**डिस्प्ले (स)**
**फ्युएल मोड्स (असल्यास)**

## फ्युएल गेज

जेव्हा इग्निशन स्विच “ON” स्थितीत असते, तेव्हा डिस्प्ले (अ) फ्युएल गेज दाखवतो.


या भागातील “फ्युएल गेज” पहा.

## ओडोमीटर / ट्रिप मीटर / घड्याळ / ब्राइटनेस कंट्रोल

जेव्हा इग्निशन स्विच “ON” स्थितीत असते, तेव्हा डिस्प्ले (ब) खालीलपैकी एक गोष्ट दाखवतो, ओडोमीटर, ट्रिप मीटर A, ट्रिप मीटर B किंवा घड्याळ.


डिस्प्ले इंडिकेशन (ब) बदलण्यासाठी ट्रिप मीटर सिलेक्टर नॉब (1) चटकन दाबा.

**(पेट्रोल आणि द्वि-इंधन इंजिनच्या मॉडेलसाठी)**




77PH007

**(डिझेल इंजिनच्या मॉडेलसाठी)**




77PH007

(अ) ओडोमीटर
(ब) ट्रिप मीटर A
(स) ट्रिप मीटर B
(द) घड्याळ
(इ) ब्राइटनेस कंट्रोल

*ब्राइटनेस कंट्रोल हा जेव्हा पोझिशन लाइट्स आणि/किंवा हेडलाइट्स चालू असतील, तेव्हा दिसेल.

**⚠ इशारा**

**तुम्ही वाहन चालवताना जर डिस्प्ले बदलण्याचा प्रयत्न केला, तर तुमचा वाहनावरील ताबा जाऊ शकतो.**

**वाहन चालवताना डिस्प्ले बदलण्याचा प्रयत्न करु नका.**

*टीप:*
*तुम्ही जेव्हा नॉब दाबून सोडाल, तेव्हा दाखवली जाणारी माहिती बदलेल.*

**ओडोमीटर**
ओडोमीटर हा वाहनाने एकूण किती अंतर प्रवास केला आहे, याची नोंद करतो.

***सूचना***

**तुमच्या ओडोमीटरवरील रीडिंगचा मागोवा ठेवा आणि आवश्यक त्या सेवांसाठी देखभालीचे वेळापत्रक नियमितपणे पहा.**
**वाहनाने ठराविक अंतरे प्रवास केल्यानंतर आवश्यक त्या सेवा करवून न घेतल्यास वाहनाच्या काही विशिष्ट भागांची जास्त झीज किंवा हानी होऊ शकते.**

**ट्रिप मीटर**
ट्रिप मीटर हा छोट्या प्रवासांची अंतरे पाहण्यासाठी किंवा इंधनासाठी वाहन पंपावर नेण्याच्या दोन प्रसंगांमधील अंतरे पाहण्यासाठी वापरला जाऊ शकतो. तुम्ही ट्रिप मीटर A किंवा ट्रिप मीटर B स्वतंत्रपणे वापरु शकता.

ट्रिप मीटर शून्यावर रिसेट करण्यासाठी, डिस्प्लेवर जेव्हा ट्रिप मीटर दिसत असेल तेव्हा ट्रिप मीटर सिलेक्टर नॉब (1) काही क्षण दाबून धरा.

*टीप:*
*ट्रिप मीटरचा जास्तीत जास्त अंक 9999.9 इतका असतो. या जास्तीत जास्त अंकाच्या पलिकडे वाहन जाईल, तेव्हा हा अंक परत 0.0 होतो.*

**घड्याळ**
या डिस्प्लेमध्ये वेळ दिसते.

दिसणारी वेळ बदलण्यासाठी:
1) मिनिटे दर्शवणारा आकडा उघडमीट करु लागेपर्यंत ट्रिप मीटर सिलेक्टर नॉब (1) दाबून धरा.
2) मिनिटे दर्शवणारा आकडा बदलण्यासाठी, मिनिटे दर्शवणारा आकडा उघडमीट करु लागल्यानंतर ट्रिप मीटर सिलेक्टर नॉब (1) पुन्हा पुन्हा दाबा. मिनिटे दर्शवणारा आकडा चटकन बदलण्यासाठी, मिनिटे दर्शवणारा आकडा उघडमीट करत असताना ट्रिप मीटर सिलेक्टर नॉब (1) दाबून धरा. मिनिटे दर्शवणारा आकडा सेट करण्यासाठी, तास दर्शवणारा आकडा उघडमीट करु लागेपर्यंत सुमारे 5 सेकंद थांबा.
3) तास दर्शवणारा आकडा बदलण्यासाठी, मिनिटे दर्शवणारा आकडा उघडमीट करु लागेपर्यंत ट्रिप मीटर सिलेक्टर नॉब (1) पुन्हा पुन्हा दाबा. 5 सेकंद थांबा, म्हणजे तास दर्शवणारा आकडा उघडमीट करु लागेल. तास दर्शवणारा आकडा बदलण्यासाठी, ट्रिप मीटर सिलेक्टर नॉब (1) चटकन दाबून ठेवा. तास दर्शवणारा आकडा सेट होण्यासाठी 5 सेकंद थांबा.

**⚠ इशारा**

**तुम्ही वाहन चालवताना जर डिस्प्ले बदलण्याचा प्रयत्न केला, तर तुमचा वाहनावरील ताबा जाऊ शकतो.**

**वाहन चालवताना डिस्प्ले बदलण्याचा प्रयत्न करु नका.**

*टीप:*
*जेव्हा तुम्ही बॅटरीला निगेटिव्ह (–) टर्मिनल पुन्हा जोडाल, तेव्हा घड्याळातील वेळ पूर्णपणे परत पहिल्यापासून सुरु होईल. तेव्हा वेळ हवी त्यानुसार बदला.*

**ब्राइटनेस कंट्रोल**
जेव्हा पोझिशन लाइट्स आणि/किंवा हेडलाइट्स चालू असतील, तेव्हा तुम्ही या मीटरच्या प्रकाशमानतेची तीव्रता नियंत्रित करु शकता.

इन्स्ट्रुमेंट पॅनेल लाइटच्या प्रकाशाची तीव्रता बदलण्यासाठी ट्रिप मीटर सिलेक्टर नॉब (1) दाबून ठेवा.

**⚠ इशारा**

**तुम्ही वाहन चालवताना जर डिस्प्ले बदलण्याचा प्रयत्न केला, तर तुमचा वाहनावरील ताबा जाऊ शकतो.**


**वाहन चालवताना डिस्प्ले बदलण्याचा प्रयत्न करु नका.**

*टीप:*

- *तुम्ही जर ब्राईटनेस कंट्रोल डिस्प्ले सुरु केल्यानंतर सुमारे 10 सेकंदांच्या आत ट्रिप मीटर सिलेक्टर नॉब दाबला नाही, तर ब्राईटनेस कंट्रोल डिस्प्ले आपोआप रद्द होईल.*
- *जेव्हा तुम्ही बॅटरी पुन्हा जोडाल, तेव्हा इन्स्ट्रुमेंट पॅनेल लाइट्सच्या प्रकाशाची तीव्रता पूर्णपणे परत पहिल्यापासून सुरु होईल. तेव्हा तीव्रता हवी त्यानुसार बदला.*


**फ्युएल मोड्स (असल्यास)**

वाहनात तीन फ्युएल मोड्स आहेत - पेट्रोल, ऑटो आणि फोर्स्ड सीएनजी मोड्स, जे स्टीअरिंग व्हीलच्या उजवीकडे डॅशबोर्डवर असलेले सिलेक्टर स्विच (1) दाबून निवडता येतात.




77PM02005


**पेट्रोल मोड**




77PM02002

या मोडमध्ये वाहन पेट्रोलवर सुरु होते आणि पेट्रोलवरच चालते. या मोडमध्ये पेट्रोल इंडिकेटर सतत दिसतो आणि सीएनजी इंडिकेटर “ऑफ” राहतो.

**ऑटो मोड**





77PM02003

या मोडमध्ये इंजिन पेट्रोलवर सुरु होते आणि नंतर प्रोग्रॅम केल्यानुसार गरम झाल्यानंतर आपोआप सीएनजी वर जाते. इग्निशन स्विच “ऑन” असून वाहन “ऑटो मोड” मध्ये सुरु झाल्यानंतर डिस्प्ले वर सीएनजी इंडिकेटर उघडमीट करतो आणि पेट्रोल इंडिकेटर दिसत राहतो. वाहन सीएनजीवर गेल्यानंतर आपोआप सीएनजी इंडिकेटर दिसू लागेल आणि पेट्रोल इंडिकेटर बंद होईल.

*टीप:*

- *नेहमी शिफारस केली जाते की इंजिनचे आयुष्यमान वाढवण्यासाठी वाहन ऑटो मोड किंवा पेट्रोल मोडमध्येच सुरु करावे.*
- *ऍम्बियंट / इंजिनचे तापमान शून्य अंश सेल्सियसच्या खाली असताना वाहन सुरु केल्यास इंधनपद्धतीत बदल होऊन सीएनजी सुरु होण्याची क्रिया कदाचित होणार नाही. अशा परिस्थितीत इंजिन गरम होईपर्यंत ते पेट्रोल मोडमध्ये सुरु ठेवा आणि नंतर सीएनजीवर चेंजओव्हर करण्यासाठी ते पुन्हा सुरु करण्याचा प्रयत्न करा.*

**फोर्स्ड सीएनजी मोड**




77PM02004

हा आपत्कालीन मोड आहे आणि पेट्रोल टँकमध्ये पेट्रोल शिल्लक नसल्यास तो वापरायला हरकत नाही. या मोडमध्ये वाहन सीएनजीवर सुरु होते आणि सीएनजीवरच चालते. इग्निशन “ON” करुन इंजिन सुरु न करता, फक्त सीएनजी इंडिकेटर दिसू लागेपर्यंत चेंजओव्हर स्विच दाबून ठेवा. या मोडमध्ये सीएनजी इंडिकेटर दिसतो आणि पेट्रोल इंडिकेटर “ऑफ” राहतो.

*टीप:*
- *शिफारस करण्यात येते की पेट्रोल टँकमध्ये पुरेशा प्रमाणात पेट्रोल ठेवावे.*
- *ॲम्बियंट / इंजिनचे तापमान शून्य अंश सेल्सियसच्या खाली असल्यास वाहन फोर्स्ड सीएनजी मोडमध्ये कदाचित सुरु होणार नाही. शिफारस केली जाते की वाहन अशा वेळी ऑटो मोडमध्ये सुरु करावे.*

**सीएनजी मोडवरुन पेट्रोल मोड असा आपोआप चेंजओव्हर**


इंजिन सुरु असताना जर सीएनजी संपला, तर वाहन आपोआप सीएनजी मोडवरुन पेट्रोल मोडवर जाईल आणि सीएनजी माल्फंक्शन वॉर्निंग लॅम्प उघडमीट करु लागेल. पेट्रोल इंडिकेटर आपोआप सतत दाखवला जाईल आणि सीएनजी इंडिकेटर बंद होईल.

ही माहिती मिळाल्याची पोच म्हणून चेंजओव्हर स्विच एकदाच दाबा. चेंजओव्हर स्विच दाबल्यावर सीएनजी माल्फंक्शन वॉर्निंग लॅम्प उघडमीट करण्याचे बंद होईल आणि पेट्रोल इंडिकेटर सतत दाखवला जाईल. मात्र वाहनात पुन्हा सीएनजी भरेपर्यंत प्रत्येक वेळी इग्निशन ऑन - इग्निशन ऑफ केल्यावर सीएनजी माल्फंक्शन वॉर्निंग लॅम्प उघडमीट करत राहील. सीएनजी भरल्यास सीएनजीवर जाण्यासाठी कृपया फ्युएल चेंजओव्हर स्विच एकदा दाबा. त्यानंतर वाहन सीएनजीवर चालू शकेल.

*टीप:*
- *शिफारस केली जाते की सीएनजी मोडवरुन आपोआप पेट्रोल मोडवर चेंजओव्हर होताना वाहनाचे इंजिन स्टॉल होऊ नये म्हणून पेट्रोल टँकमध्ये पुरेसे पेट्रोल ठेवावे.*
- *जर चेंजओव्हर स्विच दाबूनही सीएनजी माल्फंक्शन वॉर्निंग लॅम्प उघडमीट करत राहिला, तर जवळच्या अधिकृत मारुती सुझुकी कमर्शियल वर्कशॉपमध्ये वाहनाची तपासणी करुन घ्या.*

# वॉर्निंग आणि इंडिकेटर लाइट्स

## ब्रेक सिस्टिम वॉर्निंग लाइट्स



82K170

**लाइट**

वाहनाच्या प्रकारानुसार चार वेगवेगळ्या प्रकारच्या क्रिया घडतात.

1) इग्निशन स्विच जेव्हा फिरवून “ON” स्थितीवर आणले जाते, तेव्हा हा लाइट अगदी थोडा वेळ लागतो.
2) इग्निशन स्विच “ON” स्थितीत असताना पार्किंग ब्रेक लावला तर लाइट लागतो.
3) वरीलपैकी कोणत्याही एका किंवा दोन्ही परिस्थितींमध्ये लाइट लागतो.
4) तसेच ब्रेक फ्लुइडच्या टाकीतील फ्लुइड ठराविक पातळीच्या खाली जाते, तेव्हाही हा लाइट लागतो.

ब्रेक फ्लुइडच्या टाकीतील फ्लुइड पुरेशा प्रमाणात शिल्लक असेल, तर इंजिन सुरु केल्यानंतर आणि पार्किंग ब्रेक सोडल्यानंतर हा लाइट जायला पाहिजे.

तुम्ही वाहन चालवताना जर ब्रेक सिस्टिम वॉर्निंग लाइट सुरु झाला, तर वाहनाच्या ब्रेक सिस्टिममध्ये काही तरी समस्या आहे असा त्याचा अर्थ असू शकतो. असे घडल्यास तुम्ही:

1) वाहन रस्त्याच्या कडेला घेऊन काळजीपूर्वक थांबवा.

**⚠ इशारा**

**वाहन थांबण्यासाठी जास्त अंतर लागू शकेल, तुम्हाला ब्रेक पेडल जास्त जोराने दाबावे लागू शकेल, आणि पेडल नेहमीपेक्षा जास्त खाली जाऊ शकेल, हे लक्षात ठेवा.**

2) रस्त्याच्या कडेला वाहन सुरु करुन ते पुन्हा थांबते का, ब्रेक लागतात का ते काळजीपूर्वक पहा.
   – ते सुरक्षित आहे असे वाटले, तर वाहन सावकाश व काळजीपूर्वक चालवत सर्वात जवळच्या डीलरकडे दुरुस्तीसाठी न्या, किंवा
   – वाहन दुसर्या वाहनामागे बांधून सर्वात जवळच्या अधिकृत “मारुती सुझुकी कमर्शियल” वर्कशॉपकडे दुरुस्तीसाठी नेण्याची व्यवस्था करा.


**⚠ इशारा**

**खालीलपैकी कोणतीही परिस्थिती उद्‌भवल्यास त्वरित तुमच्या अधिकृत मारुती सुझुकी कमर्शियल वर्कशॉपला ब्रेक सिस्टिम तपासायला सांगा.**

- **इंजिन सुरु केल्यानंतर आणि पार्किंग ब्रेक पूर्णपणे सोडल्यानंतरही जर ब्रेक सिस्टिम वॉर्निंग लाइट गेला नाही तर.**
- **इग्निशन स्विच फिरवून “ON” स्थितीवर आणल्यानंतरही जर ब्रेक सिस्टिम वॉर्निंग लाइट गेला नाही तर.**
- **वाहन चालवताना जर कोणत्याही वेळी ब्रेक सिस्टिम वॉर्निंग लाइट लागला तर.**

*टीप:*
*ब्रेक सिस्टिम ही सेल्फ-ॲडजस्टिंग असते, त्यामुळे ब्रेक पॅड्स जसजसे झिजतात तसतशी फ्लुइडची पातळी कमी होत जाते. ब्रेक फ्लुइडच्या टाकीत ब्रेक फ्लुइड पुन्हा भरणे हा वाहनाच्या नित्याच्या देखभालीचा एक भाग मानला जातो.*

## नादुरुस्त इंडिकेटर लाइट



63J031


तुमच्या वाहनामध्ये एक कम्प्युटर-नियंत्रित उत्सर्जन नियंत्रण प्रणाली (एमिशन कंट्रोल सिस्टिम) आहे. एमिशन कंट्रोल सिस्टिमचे सर्व्हिसिंग करुन घेणे केव्हा आवश्यक आहे, हे दर्शवण्यासाठी बिघाड झाल्याचे दर्शवणारा एक लाइट इन्स्ट्रुमेंट् पॅनेलवर दिलेला आहे. हा बिघाड झाल्याचे दर्शवणारा लाइट चालू आहे, हे तुम्हाला समजण्यासाठी, जेव्हा इग्निशन स्विच फिरवून “ON” स्थितीवर आणले जाते, तेव्हा हा लाइट चालू होतो, आणि इंजिन सुरु झाल्यावर तो बंद होतो.

वाहन चालू असताना जर माल्फंक्शन इंडिकेटर लाईट सुरु झाला, तर एमिशन कंट्रोल सिस्टिममध्ये काही तरी समस्या आहे असा याचा अर्थ होतो. याची दुरुस्ती करण्यासाठी वाहन तुमच्या अधिकृत मारुती सुझुकी कमर्शियल वर्कशॉपमध्ये घेऊन जा.

***सूचना***

**बिघाड झाल्याचे दर्शवणारा लाइट चालू असताना जर तुम्ही वाहन तसेच चालवत राहिलात, तर त्यामुळे वाहनाच्या एमिशन कंट्रोल सिस्टिमचे कायमस्वरुपी नुकसान होऊ शकते, आणि त्याचा परिणाम इंधन बचतीवर आणि वाहनाच्या निर्दोषपणे चालण्याच्या क्षमतेवर परिणाम होऊ शकतो.**

## ऑईल प्रेशर




50G051

जेव्हा इग्निशन स्विच फिरवून “ON” स्थितीवर आणले जाते, तेव्हा हा लाइट चालू होतो, आणि इंजिन सुरु झाल्यावर बंद होतो. ऑईल प्रेशर पुरेसे नसल्यास हा लाइट चालू होईल आणि चालूच राहील. वाहन चालवताना हा लाइट चालू झाल्यास लवकरात लवकर वाहन रस्त्याच्या कडेला आणून इंजिन बंद करा.
ऑईलची पातळी तपासा आणि आवश्यक असल्यास शिफारस केलेले ऑईल घाला. पुरेसे ऑईल असेल तर वाहन पुन्हा चालवण्यापूर्वी तुमच्या अधिकृत मारुती सुझुकी कमर्शियल वर्कशॉपमध्ये त्याची लुब्रिकेशन सिस्टिम तपासून घ्यावी.

**सूचना**

- **हा लाइट चालू असताना जर तुम्ही इंजिन चालू केले, तर इंजिनचे मोठे नुकसान होऊ शकते.**
- **ऑईल घालण्याची गरज दर्शवण्यासाठी केवळ ऑईल प्रेशर लाइटवर अवलंबून राहू नका. ठराविक काळाने इंजिन ऑईलची पातळी तपासल्याची खात्री करा.**

## चार्जिंग



50G052

इग्निशन स्विच "ON" केल्यावर हा लाईट सुरु होतो आणि इंजिन सुरु झाल्यावर बंद होतो. जर बॅटरी चर्जिंग सिस्टिममध्ये काही दोष असेल तर हा लाईट सुरु झाल्यावर तसाच सुरु राहील.जर इंजिन सुरु असताना हा लाईट सुरु झाला, तर तुमच्या अधिकृत मारुती सुझुकी कमर्शियल वर्कशॉपमध्ये त्याची चर्जिंग सिस्टिम त्वरित तपासून घ्यावी.


## ड्रायव्हरचा सीट बेल्ट वॉर्निंग लाईट / समोरच्या प्रवाश्याचा सीट बेल्ट वॉर्निंग लाईट (असल्यास)



60G049

जेव्हा ड्रायव्हर किंवा समोरचा प्रवासी त्याच्या सीट बेल्ट बकल करीत नाही, तेव्हा हा दिवा लागेल आणि / किंवा लुकलुकेल.
सीट बेल्ट रिमाइंडरच्या तपशीलांसाठी, या विभागात "सीट बेल्ट्स आणि चाइल्ड रेस्ट्रन्ट सिस्टम" चा संदर्भ घ्या.

## इंज़िन कूलंटचे तापमान वाढले असल्याचे दर्शवणारी वॉर्निंग लाइट (लाल रंगाचा)




54G344

जेव्हा इग्निशन स्विच फिरवून "ON" स्थितीवर आणले जाते, तेव्हा हा लाइट अगदी थोडा वेळ चालू होतो, म्हणजे तो चालू असल्याचे तुम्ही पाहू शकाल. वाहन चालवताना जर हा लाइट उघडमीट करु लागला, तर याचा अर्थ, इंजिन गरम झाले आहे. अशा परिस्थितीमध्ये वाहन चालवणे टाळा की जेव्हा इंजिन फार गरम होऊ शकेल. जर लाईट उघडमीट न करता तसाच सुरु राहिला, तर याचा अर्थ, इंजिन फार गरम होत आहे. "आपत्कालीन सेवा" भागामधील "इंजिन फार गरम झाल्यास" मधील सूचनांचे पालन करा.

**सूचना**

**इंजिनचे तापमान फार वाढत असल्याचे दर्शवल्यानंतरही वाहन चालवत राहिल्यास इंजिनचे मोठे नुकसान होऊ शकते.**


### वळण्याच्या



50G055

तुम्ही जेव्हा डाव्या किंवा उजव्या बाजूला वळण्याचे सिग्नल चालू करता, तेव्हा इन्स्ट्रुमेंट पॅनेलवर असलेला तुम्ही वळत ती बाजू दर्शवणारा हिरवा बाण आणि सिग्नल लाइट एकाच वेळी उघडमीट करु लागेल. जेव्हा तुम्ही हॅझार्ड वॉर्निंग स्विच चालू कराल, तेव्हा दोन्ही बाण आणि वळण्याच्या सिग्नलचे सर्व लाइट्स एकाच वेळी उघडमीट करु लागतील.

### मेन बीम (हाय बीम) इंडिकेटर लाइट



50G056

जेव्हा हेडलाइटचे मेन बीम्स (हाय बीम्स) चालू केले जातात, तेव्हा हा लाइट चालू होतो.

### फ्युएल फिल्टर वॉर्निंग लाइट (असल्यास)




60A541

जेव्हा इग्निशन स्विच जेव्हा फिरवून “ON” स्थितीवर आणले जाते, तेव्हा हा लाइट काही सेकंद चालू होतो, म्हणजे तो चालू असल्याचे तुम्ही पाहू शकाल.

वाहन चालवताना जर हा लाइट चालू झाला, तर फ्युएल फिल्टरमध्ये पाणी असू शकते. लवकरात लवकर हे पाणी काढून टाका. पाणी काढून टाकण्याबाबतच्या अधिक माहितीसाठी “तपासणी आणि देखभाल” भागातील “फ्युएल फिल्टर” हा भाग पहा.


### ग्लो प्लग इंडिकेटर लाइट (असल्यास)



60A543

कूलंटचे तापमान जर पुरेसे थंड असेल, तर जेव्हा इग्निशन स्विच जेव्हा फिरवून “ON” स्थितीवर आणले जाते, तेव्हा हा लाइट चालू होतो, आणि इंजिन सुरु करण्यासाठी ग्लो प्लग पुरेसा गरम झाल्यावर तो बंद होतो.

### सीएनजी माल्फंक्शन वॉर्निंग लाईट (असल्यास)




77PMC015

इग्निशन स्विच “ON” केल्यावर हा सीएनजी माल्फंक्शन वॉर्निंग लॅम्प निर्दोष असल्याचे तपासण्यासाठी तो काही क्षण सुरु होतो.

- इग्निशन स्विच “ON” केल्यावर हा सीएनजी माल्फंक्शन वॉर्निंग लॅम्प लागूनच राहिला, तर याचा अर्थ, सीएनजी सिस्टिममध्ये काही तरी समस्या आहे. अधिकृत मारुती सुझुकी कमर्शियल वर्कशॉपमध्ये तुमचे वाहन त्वरित तपासून घ्या.
- हा सीएनजी माल्फंक्शन वॉर्निंग लॅम्प जर इंजिन सुरु असताना उघडमीट करत असेल, तर याचा अर्थ, सीएनजी सिस्टिममध्ये काही तरी समस्या आहे. आणि अशा वेळी वाहन सीएनजी मोडमध्ये चालू शकणार नाही आणि पेट्रोल मोडवर आपोआप चेंजओव्हर करु शकणार नाही. अधिकृत मारुती सुझुकी कमर्शियल वर्कशॉपमध्ये तुमचे वाहन त्वरित तपासून घ्या.

*टीप:*
*हा सीएनजी माल्फंक्शन वॉर्निंग लॅम्प जर इग्निशन स्विच “ON” असताना आणि इंजिन सुरु नसताना उघडमीट करत असेल, तर याचा अर्थ, फ्युएल टँकचे झाकण उघडे आहे. अशा स्थितीत वाहन सुरु होणार नाही. वाहन सुरु करण्यासाठी झाकण बंद करा.*

## लाइटिंग कंट्रोल लिव्हर

उदाहरण




65D611

**⚠ इशारा**

**संभाव्य दुखापत टाळण्यासाठी स्टीअरिंग व्हीलमधून हात घालून कंट्रोल्स चालवू नका.**

### लाइट्स चालू आणि बंद करणे

उदाहरण




77PH110


लाइट्स चालू किंवा बंद करण्यासाठी लिव्हरच्या टोकाला असलेला नॉब फिरवा. याच्या तीन स्थिती आहेत:

**OFF (ऑफ)**
सर्व लाइट्स बंद असतात.

-00-
फ्रंट पोझिशन लाइट्स, टेल लाइट्स, लायसन्स प्लेट लाइट्स, आणि इन्स्ट्रुमेंट पॅनेलचे लाइट्स चालू असतात, पण हेडलाइट्स बंद असतात.

≣D
फ्रंट पोझिशन लाइट्स, टेल लाइट्स, लायसन्स प्लेट लाइट्स, इन्स्ट्रुमेंट पॅनेलचे लाइट्स आणि हेडलाइट्स चालू असतात.

उदाहरण




77PH111

हेडलाइट्स चालू असताना हाय बीम्स (मेन बीम्स) चालू करण्यासाठी लिव्हर पुढे ढकला, किंवा लो बीम्सवर येण्यासाठी लिव्हर तुमच्याकडे ओढा. जेव्हा हाय बीम्स (मेन बीम्स) चालू असतात, तेव्हा इन्स्ट्रुमेंट पॅनेलवरील मेन बीम (हाय बीम) इंडिकेटर लाइट चालू होतो. एक पासिंग सिग्नल म्हणून क्षणभर हाय बीम्स (मेन बीम्स) चालू करण्यासाठी लिव्हर किंचित तुमच्याकडे ओढा आणि सिग्नल पूर्ण झाल्यावर सोडून द्या.

## हेडलाइट लेव्हलिंग स्विच

उदाहरण




77PH010

हे स्विच फिरवून तुमच्या वाहनातील वजनाच्या स्थितीनुसार हेडलाइट बीम आडव्या पातळीत आणा. खालील तालिकेमध्ये वाहनाच्या वेगवेगळ्या वजनाच्या स्थितींनुसार योग्य ती स्विचची स्थिती दाखवली आहे.

**(पेट्रोल आणि द्वि-इंधन इंजिनच्या मॉडेलसाठी)**

| वाहनाची वजनाची स्थिती | स्विचची स्थिती |
|---|---|
| | 0 |
| ड्रायव्हर+ पूर्ण क्षमतेपर्यंत भरलेला माल (लोड प्लॅटफॉर्मवर वजन समान पद्धतीने ठेवलेले). | 2 |

**(डिझेल इंजिनच्या मॉडेलसाठी)**

| वाहनाची वजनाची स्थिती | स्विचची स्थिती |
|---|---|
| | 0 |
| ड्रायव्हर+ पूर्ण क्षमतेपर्यंत भरलेला माल (लोड प्लॅटफॉर्मवर वजन समान पद्धतीने ठेवलेले). | 3 |

## वळण्याच्या सिग्नलची कंट्रोल लिव्हर

उदाहरण




65D611

**⚠ इशारा**

**संभाव्य दुखापत टाळण्यासाठी स्टीअरिंग व्हीलमधून हात घालून कंट्रोल्स चालवू नका.**

### वळण्याचे सिग्नल्स चालवणे


इग्निशन स्विच “ON” स्थितीवर असताना उजव्या किंवा डाव्या बाजूला वळण्याचे सिग्नल्स चालवण्यासाठी लिव्हर वर किंवा खाली करा.




77PH112

सिग्नल देण्यासाठी लिव्हर वर किंवा खाली करा. वळणे पूर्ण झाल्यानंतर सिग्नल आपोआप बंद होईल आणि लिव्हर तिच्या सामान्य स्थितीवर परत येईल.

## हॅझार्ड वॉर्निंग स्विच





77PH028

(1) चालू
(2) बंद

हॅझार्ड वॉर्निंग लाइट्स चालू करण्यासाठी हॅझार्ड वॉर्निंग स्विच वर ओढा. सर्व वळण्याचे सिग्नल देणारे लाइट्स आणि दोन्ही वळण्याचे सिग्नल इंडिकेटर्स एकाच वेळी उघडमीट करु लागतील. हे लाइट्स बंद करण्यासाठी स्विच खाली ढकला.

संकटकाळी वाहन उभे केले असताना किंवा इतर कारणासाठी जेव्हा तुमचे वाहन रहदारीसाठी धोका बनू शकते अशा वेळी इतर रहदारीला इशारा देण्यासाठी हॅझार्ड वॉर्निंग लाइट्स चालू करा

## विंडशील्ड वायपर आणि वॉशर लिव्हर




65D611

**⚠ इशारा**


**संभाव्य दुखापत टाळण्यासाठी स्टीअरिंग व्हीलमधून हात घालून कंट्रोल्स चालवू नका.**

### वायपर चालवणे

इग्निशन स्विच “ON” स्थितीवर असताना तुम्ही वायपर लिव्हर वापरु शकता.

### विंडशील्ड लेबल

उदाहरण





77PM02015

विंडशील्ड वायपर्स चालू करण्यासाठी लिव्हरच्या टोकाला असलेला नॉब फिरवून तीनपैकी एका स्थितीवर आणा. “LO” स्थितीमध्ये वायपर्स एकाच ठराविक, मंद गतीने चालतील. “HI” स्थितीमध्ये वायपर्स एकाच ठराविक, जलद गतीने चालतील. वायपर्स बंद करण्यासाठी लिव्हरवरचा नॉब फिरवून “OFF” स्थितीवर आणा.

### विंडशील्ड वॉशर (असल्यास)

उदाहरण

पुढचे दार




77PM02016

विंडशील्ड वॉशर मधील फ्लुइड फवारण्यासाठी लीव्हर तुमच्याकडे खेचा.


**⚠ इशारा**

**विंडशील्ड वॉशर च्या टाकीत रेडिएटर अँटिफ्रीझ वापरु नका. ते विंडशील्डवर फवारले तर समोरचे नीट दिसेनासे होऊ शकते, तसेच तुमच्या वाहनाच्या रंगाचेही नुकसान करु शकते.**

***सूचना***

**विंडशील्ड वायपर आणि वॉशर सिस्टिमच्या कम्पोनंट्सचे नुकसान न होण्यास मदत करण्यासाठी खालील खबरदार्या घ्याव्या:**
- **विंडशील्ड वॉशर फ्लुइड फवारले जात नसताना लीव्हर ओढून धरु नका, कारण त्यामुळे वॉशर मोटर खराब होऊ शकते.**
- **कोरड्या विंडशील्डवरुन वायपर वापरुन धूळ साफ करायचा प्रयन करु नका, त्याने विंडशील्ड आणि वायपर ब्लेड्सचेही नुकसान होऊ शकते. वायपर्स चालवण्यापूर्वी नेहमी विंडशील्ड वॉशर फ्लुइड फवारुन ओले करा.**
- **वायपर्स वापरण्यासाठी विंडशील्डवर जमलेले बर्फ किंवा हिम काढून टाका.**
- **वॉशर फ्लुइड लेव्हल नियमितपणे तपासून पहा. हवामान खराब असताना ती वरचेवर तपासत जा.**
- **थंड हवेत वॉशर फ्लुइड ची टाकी ¾ इतकीच भरा, किंवा बाहेरचे तापमान जर फ्लुइड गोठवण्याइतके उतरले, तर गोठलेले फ्लुइड प्रसरण पावण्यासाठी मोकळी जागा सोडा.**


## हॉर्न



77PH029

हॉर्न वाजवण्यासाठी स्टीअरिंग व्हीलवरचे हॉर्न बटन दाबा. इग्निशन स्विच कोणत्याही स्थितीत असले तरी हॉर्न वाजेल.

## सीएनजी सिलिंडर वॉर्निंग (असल्यास)





77PM02006

हे लेबल तुम्हाला कदाचित सीएनजी सिलिंडरवर दिसू शकेल.

## सीएनजी वॉर्निंग (असल्यास)


### ड्रायव्हरचे





77PM02007

सीएनजी वॉर्निंग लेबल उजवीकडचा पुढच्या दारावर असते.

## सीएनजी मॅन्युअल शट ऑफ व्हॉल्व (असल्यास)





77PM02011





77PM02014

### उजवी बाजू (RHS)




77PM02012

### डावी बाजू (LHS)




77PM02013

मॅन्युअल शट ऑफ व्हॉल्व हा सीएनजी सिलिंडर्सवर असतो, जे वाहनाच्या बॉडीच्या खालच्या बाजूला बसवलेले असतात.
वाहनाच्या बॉडीच्या खालच्या बाजूला दोन सीएनजी सिलिंडर बसवलेले असतात, आणि प्रत्येकावर एकेक मॅन्युअल शट ऑफ व्हॉल्व असतो.
मॅन्युअल शट ऑफ व्हॉल्व 1 आणि व्हॉल्व 2 पर्यंत अनुक्रमे वाहनाच्या उजव्या (RHS) आणि डाव्या (LHS) बाजूकडून पोहोचता येते.

दोन्ही सिलिंडरवरील मॅन्युअल शट ऑफ व्हॉल्व बंद करुन सीएनजी सिलिंडर बंद केले जाऊ शकतात.

**व्हॉल्व बंद करणे:** इंजिनचा सीएनजीचा पुरवठा बंद करण्यासाठी नॉब घड्याळाच्या काट्याच्या दिशेने पूर्ण फिरवा (दृश्य अ नुसार).

**व्हॉल्व सुरु करणे:** इंजिनचा सीएनजीचा पुरवठा सुरु करण्यासाठी नॉब घड्याळाच्या काट्याच्या उलट्या दिशेने पूर्ण फिरवा (दृश्य अ नुसार).

**⚠ सावधानीचा इशारा**

**मॅन्युअल शट ऑफ व्हॉल्व 2 (LHS) पर्यंत जाताना तुमचा हात एक्झॉस्ट पाईपला स्पर्श करणार नाही याची काळजी घ्या. वाहन चालवल्यामुळे एक्झॉस्ट पाईप तुमचा हात भाजण्याइतका गरम झालेला असू शकतो.**

*टीप:*
- *मॅन्युअल शट ऑफ व्हॉल्व पूर्णपणे उघडला गेला नाही तर इंजिन व्यवस्थित चालू शकणार नाही.*
- *मॅन्युअल शट ऑफ व्हॉल्व बंद स्थितीत असताना सिलिंडरमध्ये सीएनजी भरणे शक्य होत नाही.*

*टीप:*
- *शासनाच्या नियमांनुसार सीएनजी सिलिंडर हा त्याच्या आयडेंटिफिकेशन प्लेटवर दिलेल्या प्रारंभिक तपासणीच्या दिनांकापासून दर तीन (3) वर्षांनी तपासून प्रमाणित करुन घ्यावा लागतो.*
- *ग्राहकाला त्याचे वाहन एका शासनमान्य टेस्टिंग एजन्सीकडे सादर करावे लागते.*
- *सिलिंडरची तपासणी न करुन घेतल्यास सीएनजी पुरवठादार स्टेशन्स सीएनजी भरण्यास नकार देऊ शकतात किंवा वाहन अंमलबजावणी अधिकाऱ्यांकडून जप्त केले जाऊ शकते.*
- *सीएनजी सिलिंडरच्या तपासणीचा सर्व खर्च ग्राहकाला करावा लागतो.*
- *शासनाच्या नियमांनुसार सीएनजी सिलिंडरची त्याच्या आयडेंटिफिकेशन प्लेटवर दिलेल्या प्रारंभिक तपासणीच्या दिनांकापासून 20 वर्षांनी विल्हेवाट लावावी लागते.*
- *ग्राहकाला अशा सिलिंडरची विल्हेवाट स्वखर्चाने शासनमान्य स्क्रॅप एजन्सीजमार्फत लावावी लागते.*
- *ज्या सिलिंडरची उपनियम (2) अन्वये दुरुस्ती व चाचणी घेतल्याचा पूर्ण अहवाल आणि दुरुस्ती करणाऱ्या व्यक्तीचे चाचणीचे प्रमाणपत्र प्रमुख नियंत्रकांना सादर करुन सिलिंडर पुन्हा भरण्यासाठी त्यांची परवानगी मिळवलेली नसेल, अशा कोणत्याही सिलिंडरमध्ये कोणीही व्यक्ती कोणताही वायू भरणार नाही.*


**⚠ इशारा**

- **सिलिंडर व्हॉल्व सिलिंडर असेंब्लीमधून कधीही वेगळा करु नका. कोणत्याही मदतीसाठी अधिकृत मारुती सुझुकी कमर्शियल वर्कशॉपचा सल्ला घ्या.**
- **सिलिंडर कधीही साफ करण्याचा प्रयत्न करु नका. काही समस्या झाल्यास अधिकृत मारुती सुझुकी कमर्शियल वर्कशॉपशी संपर्क साधा.**
- **सिलिंडर असेंब्लीमधून सिलिंडर व्हॉल्व बदलल्यास/काढून टाकल्यास तो सिलिंडर व्हॉल्व कधीही वापरु नका.**
- **जरी सिलिंडरमधील सीएनजी इंजिन थांबेपर्यंत वापरला गेला, तरी टँकमध्ये काही प्रमाणात सीएनजी दाबाखाली शिल्लक असेल.**

# तुमचे वाहन चालवणे


एक्झॉस्ट गॅस वॉर्निंग ........ 3-1
रोजच्या तपासण्यांची यादी ........ 3-1
इंजिन ऑईलचे कंझम्प्शन ........ 3-2
इग्निशन स्विच ........ 3-2
पार्किंग ब्रेक लिव्हर ........ 3-4
पेडल ........ 3-5
इंजिन सुरु करणे ........ 3-5
ट्रान्समिशनचा वापर करणे ........ 3-7
पार्किंग सेन्सर्स (असल्यास)........ 3-9
ब्रेक ........ 3-12

## एक्झॉस्ट गॅस वॉर्निंग




82DY03

**⚠ इशारा**

**एक्झॉस्ट गॅसेस (वाहनामधून बाहेर पडणारे (उत्सर्जित) वायू) श्वासामधून शरीरात जाऊ देण्याचे टाळा. एक्झॉस्ट गॅसेसमध्ये कार्बन मोनॉक्साईड हा वायू असतो, जो रंगहीन आणि गंधहीन असतो आणि संभवतः प्राणघातक असतो. कार्बन मोनॉक्साईडचे अस्तित्व वेगळे दाखवता येणे कठीण असल्यामुळे कार्बन मोनॉक्साईड हा तुमच्या वाहनात शिरू नये यासाठी मदत करण्यासाठी खालील खबरदारीचे उपाय करण्याची खात्री करा.**

- **गॅरेज किंवा इतर बंदिस्त जागांमध्ये इंजिन चालू ठेवू नका.**

(पुढे चालू)


**⚠ इशारा**

(पुढे चालू)

- **उघड्या ठिकाणीसुद्धा इंजिन चालू ठेवून फार वेळ वाहन उभे करु नका.**
- **तुमच्या वाहनाच्या व्हेंटिलेशन सिस्टिमचे काम योग्य प्रकारे व्हावे यासाठी वाहनाच्या पुढच्या बाजूच्या एअर इनलेट ग्रिलमध्ये कधीही हिम, पाने किंवा अडथळा करणार्या इतर गोष्टी जमू देऊ नका.**
- **वाहनाच्या खालच्या बाजूला एक्झॉस्ट गॅसेस जमू नयेत यासाठी एक्झॉस्ट पाईपच्या भागामध्ये हिम आणि इतर गोष्टी राहू देऊ नका. वादळी परिस्थितीत वाहन उभे केले असताना हे विशेष महत्वाचे आहे.**
- **ठराविक काळानंतर एक्झॉस्ट सिस्टिमची कुठे हानी किंवा गळती झाली नाही ना याची तपासणी करुन घ्या. कोणतीही हानी किंवा गळत्या त्वरित दुरुस्त करुन घ्याव्या.**

## रोजच्या तपासण्यांची यादी

### वाहन चालवण्यापूर्व




77PM03001

1) विंडोज, मिरर्स, लाइट्स आणि रिफ्लेक्टर्स हे स्वच्छ आहेत आणि त्यात कुठेही अडथळे नाहीत याची खात्री करा.
2) खालील मुद्द्यांसाठी टायर्स डोळ्यांनी तपासून पहा:
   - ट्रेड ग्रूव्हची खोली
   - असामान्य झीज, चिरा आणि हानी
   - ढिले झालेले व्हील नट्स
   - बाहेरच्या वस्तू, जसे खिळे, खडे इ. अडकले आहेत का ते पाहणे

अधिक तपशिलासाठी “तपासणी आणि देखभाल” मधील “टायर्स” हा भाग पहा.

3) फ्लुइड किंवा ऑईल गळले आहे का ते पहा.
4) इंजिन कंपार्टमेंट पूर्णपणे घट्ट बंद असल्याची खात्री करा.

5) हेडलाइट्स, वळण्याच्या सिग्नलचे लाइट्स, ब्रेक लाइट्स आणि हॉर्न व्यवस्थित चालत असल्याचे पहा.
6) ड्रायव्हरचे सीट हवे तसे सरकवून घ्या.
7) ब्रेक पेडल आणि पार्किंग ब्रेक लिव्हर तपासा.
8) मिरर्स हवे तसे सरकवून घ्या.
9) तुम्ही आणि प्रवाशाने सीट बेल्ट व्यवस्थित लावल्याची खात्री करा.
10) चावी “ON” या स्थितीवर फिरवल्यानंतर सर्व वॉर्निंग लाइट्स चालू होत असल्याची खात्री करा.
11) सर्व गेजेस तपासा.
12) पार्किंग ब्रेक सोडल्यावर ब्रेक सिस्टिम वॉर्निंग लाइट बंद होत असल्याची खात्री करा.

आठवड्यातून एकदा, किंवा प्रत्येक वेळी फ्युएल टँक भरल्यानंतर खालील गोष्टी तपासा:

आठवड्यातून एकदा, किंवा प्रत्येक वेळी फ्युएल टँक भरल्यानंतर खालील गोष्टी तपासा:

1) इंजिन ऑईलची पातळी
2) कूलंटची पातळी
3) ब्रेक फ्लुइडची पातळी
4) विंडशील्ड वॉशर फ्लुइड (असल्यास) पातळी
5) बॅटरी इलेक्ट्रोलाइटची पातळी
6) लॅचचे काम
   लुब्रिकेशन करुन घेण्याच्या वेळापत्रकासाठी “तपासणी आणि देखभाल” मधील “ठराविक कालावधीनंतर करण्याच्या देखभालीचे वेळापत्रक” मधील “चासी आणि बॉडी” भागातील “सर्व लॅचेस, हिंजेस आणि लॉक्स” पहा.

आठवड्यातून एकदा, किंवा प्रत्येक वेळी फ्युएल टँक भरल्यानंतर टायर प्रेशर गेज घेऊन टायरमधील हवेचे प्रेशर तपासा. जादा दिलेल्या टायरमधील हवेचे प्रेशरही तपासा.

## इंजिन ऑईलचे कंझम्प्शन

नेहमीच्या वाहनाच्या वापरामध्ये इंजिन हे काही प्रमाणात इंजिन ऑईलचा वापर करते, ही गोष्ट योग्यच आहे.


वापरलेल्या इंजिन ऑईलचे प्रमाण हे ऑईलचा चिकटपणा, ऑईलचा दर्जा आणि ज्या परिस्थितीत वाहन चालवले गेले, त्या परिस्थितीवर अवलंबून असते.
जास्त वेगाने वाहन चालवल्यास आणि ब्रेक दाबणे आणि वेग वाढवणे या क्रिया सतत कराव्या लागल्यास अधिक प्रमाणात ऑईल वापरले जाते. जास्त वजने घेऊन वाहन चालवले तरी तुमचे इंजिन अधिक ऑईल वापरेल.
नवीन इंजिनही जास्त ऑईल वापरते, कारण त्याचे पिस्टन्स, पिस्टन रिंग्ज आणि सिलिंडर वॉल्स अजून कामासाठी व्यवस्थित रुळलेल्या नसतात. नवीन इंजिन सुमारे 5000 किमी (3000 मैल) चालवल्यानंतरच त्यांच्या ऑईलच्या वापराचे प्रमाण सामान्य होते.

**ऑईलचे कंझम्प्शन:**
**अधिकतम 1.0 लि. प्रति 1000 किमी**
**(1 क्वार्ट प्रति 600 मैल)**

इंजिन ऑईलचा वापर किती झाला याचा अंदाज घेताना हे लक्षात ठेवा की ऑईलमध्ये भेसळ होऊन ते सौम्य होऊ शकते आणि त्यामुळे ऑईलच्या नेमक्या पातळीचा अंदाज करणे कठीण होते.
उदाहरणार्थ, एखादे वाहन सतत फक्त छोट्या अंतराच्या प्रवासांसाठी वापरले गेले, आणि त्याचा ऑईलचा वापर सामान्य प्रमाणातच झाला, तर 1000 किमी (600 मैल) किंवा अधिक चालवल्यानंतरही त्याच्या डिपस्टिकद्वारे ऑईलची पातळी काहीच खाली गेली नाही असे दिसू शकेल. याचे कारण असे, की त्या ऑईलमध्ये इंधन किंवा ओलावा मिसळून ते हळू हळू सौम्य होते आणि त्यामुळे ऑईलची पातळी तशीच राहिल्यासारखे दिसते.

तसेच हेही लक्षात ठेवा, की नंतर वाहन मोठ्या वेगाने चालवले असता, जसे द्रुतगती मार्गावरुन, ऑईलमध्ये मिसळून त्याला सौम्य करणार्या घटकांची वाफ होते आणि त्यामुळे वाहन मोठ्या वेगाने चालवले असता ऑईल जास्त प्रमाणात वापरले गेले असे भासते.

## इग्निशन





65D611

**⚠ इशारा**

**संभाव्य दुखापत टाळण्यासाठी स्टीअरिंग व्हीलमधून हात घालून कंट्रोल्स चालवू नका.**

उदाहरण




77PH002

77PH002

इग्निशन स्विचच्या खालील चार स्थिती असतात:

**LOCK (लॉक)**
ही नेहमीची पार्किंगची स्थिती असते. फक्त याच स्थितीत असताना चावी काढता येते.

स्टीअरिंग लॉक काढण्यासाठी चावी आत सरकवा आणि ती घड्याळाच्या काट्याच्या दिशेने फिरवून बाकीच्यापैकी एका स्थितीमध्ये आणा. स्टीअरिंगचे लॉक उघडण्यामध्ये तुम्हाला जर अडचण आली, तर चावी फिरवताना स्टीअरिंग व्हील किंचित डाव्या किंवा उजव्या बाजूला फिरवायचा प्रयत्न करा.

**ACC (एसीसी)**
ऍक्सेसरी सॉकेटसारख्या ऍक्सेसरीज काम करु शकतात, पण इंजिन बंद राहते.

**ON (ऑन)**
ही वाहन सुरु करण्याची सामान्य स्थिती असते. सर्व इलेक्ट्रिकल सिस्टिम्स सुरु होतात.

**START (स्टार्ट)**
ही स्टार्टर मोटर चालू करुन इंजिन चालू करण्याची स्थिती असते. इंजिन सुरु होताच चावी या स्थितीमधून हलवली पाहिजे.

उदाहरण



82DY04


**⚠ इशारा**

- **वाहन चालले असताना कधीही इग्निशनची चावी काढू नका. स्टीअरिंग व्हील लॉक होईल आणि तुम्ही वाहनाची दिशा बदलू शकणार नाही.**
- **वाहनामधून अगदी थोड्या वेळासाठी बाहेर जातानासुद्धा नेहमी इग्निशनची चावी काढून घ्या. तसेच उभ्या केलेल्या वाहनात लहान मुलांना एकटे सोडू नका. त्यांना गरम हवामानात उष्माघाताचा झटकासुद्धा येऊ शकतो. यामुळे गंभीर दुखापत किंवा मृत्यूसुद्धा होऊ शकतो.**

***सूचना***

- **स्टार्टर मोटर एका वेळी 30 सेकंदांहून जास्त वापरु नका. इंजिन सुरु न झाल्यास 15 सेकंद थांबून मग पुन्हा प्रयत्न करा. अनेकदा प्रयत्न करुनही इंजिन सुरु झाले नाही, तर इंधन आणि इग्निशन सिस्टिम तपासा किंवा तुमच्या अधिकृत मारुती सुझुकी कमर्शियल वर्कशॉपचा सल्ला घ्या.**
- **इंजिन सुरु नसताना इग्निशन स्विच “ON” स्थितीत ठेवू नका, कारण बॅटरी डिस्चार्ज होईल.**

## पार्किंग ब्रेक लिव्हर




77PH030

(1) लावण्यासाठी
(2) सोडण्यासाठी
(3) सोडण्यासाठी

पार्किंग ब्रेक लिव्हर ही दोन सीट्सच्या मध्ये असते. पार्किंग ब्रेक लावण्यासाठी ब्रेक पेडल खाली धरुन ठेवा आणि पार्किंग ब्रेक लिव्हर पूर्णपणे वर ओढा. पार्किंग ब्रेक सोडण्यासाठी पार्किंग ब्रेक लिव्हर किंचित वर ओढा, लिव्हरच्या टोकाशी असलेले बटन दाबा, आणि पार्किंग ब्रेक लिव्हर तिच्या मूळ स्थितीत खाली न्या.

**⚠ इशारा**

- **पार्किंग ब्रेक लावलेल्या स्थितीत तुमचे वाहन कधीही चालवू नका: रिअर ब्रेक फार गरम होऊन त्याचा परिणाम कमी होऊ शकतो, ब्रेकचे आयुष्य कमी होऊ शकते, किंवा ब्रेकचे कायमस्वरुपी नुकसान होऊ शकते.**
- **जर पार्किंग ब्रेकमुळे तुमचे वाहन एका जागी सुरक्षित राहत नसले, किंवा तो पूर्णपणे सुटत नसला, तर तुमचे वाहन अधिकृत मारुती सुझुकी कमर्शियल वर्कशॉपमधून त्वरित तपासून घ्या.**

**⚠ इशारा**


**वाहनातून बाहेर जाताना नेहमी पार्किंग ब्रेक पूर्णपणे लावा, नाही तर ते चालू लागेल आणि त्यामुळे दुखापत किंवा नुकसान होऊ शकेल. वाहन उभे करताना गिअरशिफ्ट लिव्हर रिव्हर्स किंवा पहिल्या गिअरमध्ये असल्याची खात्री करा. लक्षात ठेवा, की जरी ट्रान्समिशन गिअरमध्ये असले, तरी तुम्ही पार्किंग ब्रेक पूर्णपणे लावला पाहिजे.**

**⚠ इशारा**

**अत्यंत थंड हवेत वाहन उभे करताना खालील पद्धत वापरा:**

**1) पार्किंग ब्रेक लावा.**
**2) इंजिन बंद करा, गिअरशिफ्ट रिव्हर्स किंवा पहिल्या गिअरमध्ये न्या.**
**3) वाहनामधून बाहेर पडा आणि चाकांखाली चॉक्स लावा.**
**4) पार्किंग ब्रेक काढा.**
**वाहनाकडे परत आल्यानंतर आधी पार्किंग ब्रेक लावून नंतरच चाकांखालचे चॉक्स काढण्याचे लक्षात ठेवा.**

## पेडल




80J2121

**क्लच पेडल (1)**
क्लच पेडल हे इंजिन सुरु करताना, थांबताना, किंवा गिअरशिफ्ट लिव्हर हलवताना चाकांना जोडलेला ड्राईव्ह डिसएंगेज करण्यासाठी वापरले जाते. पेडल खाली दाबल्याने क्लच डिसएंगेज होतो.

**⚠ इशारा**

**क्लच पेडलवर पाय ठेवून वाहन चालवू नका. त्यामुळे क्लचची मोठ्या प्रमाणात झीज, क्लचचे नुकसान होऊ शकते, किंवा इंजिन ब्रेकिंग अनपेक्षितपणे कमी होऊ शकते.**

**ब्रेक पेडल (2)**
तुमच्या वाहनाला फ्रंट डिस्क ब्रेक्स आणि रिअर ड्रम ब्रेक्स आहेत. ब्रेक पेडल दाबल्याने दोन्ही ब्रेक सेट लागतात.

ब्रेक्स लावताना तुम्हाला अधूनमधून ब्रेकमधून कुई कुई असा आवाज ऐकू येऊ शकतो. हे सामान्य असून ही गोष्ट थंडी, ओलावा, हिम इ. सारख्या वातावरणातील गोष्टींमुळे होते.

**⚠ इशारा**

**जर ब्रेक्समधून फार जास्त कुई कुई असा आवाज येत असेल आणि तो प्रत्येक वेळी ब्रेक दाबल्यानंतर येत असेल, तर वाहनाचे ब्रेक्स अधिकृत मारुती सुझुकी कमर्शियल वर्कशॉपमधून तपासून घ्यावे.**


**⚠ इशारा**

**ब्रेक्स सतत लावून किंवा पेडलवर पाय ठेवून वाहन चालवू नका. यामुळे ब्रेक्स जास्त गरम होतील, आणि त्यामुळे ब्रेकिंग ॲक्शन कशीही होऊ शकेल, थांबण्याचे अंतर वाढू शकेल, किंवा ब्रेक्सचे कायमचे नुकसान होऊ शकेल.**

**ॲक्सिलरेटर पेडल (3)**
हे पेडल वाहनाचा वेग नियंत्रित करते. हे पेडल दाबल्याने पॉवर आऊटपुट आणि वेग वाढतो.

## इंजिन सुरु करणे

### इंजिन सुरु करण्यापूर्व




77PH014

1) पार्किंग ब्रेक पूर्णपणे लावला असल्याची खात्री करा.
2) गिअरशिफ्ट “N” (न्युट्रल) वर आणा आणि क्लच पेडल पूर्णपणे खाली दाबा.
   इंजिन सुरु करताना क्लच पेडल खालीच दाबून ठेवा.

**⚠ इशारा**

**इंजिन सुरु करण्याचा प्रयत्न करण्यापूर्वी पार्किंग ब्रेक पूर्णपणे लावलेला आहे आणि ट्रान्समिशन न्युट्रलमध्ये आहे याची खात्री करा.**

### (पेट्रोल आणि द्वि-इंधन इंजिनच्या मॉडेलसाठी)

**थंड पडलेले आणि गरम इंजिन सुरु करणे**
तुमचा पाय ॲक्सिलरेटर पेडलवरुन काढा आणि इग्निशनची चावी “START” वर फिरवून इंजिन क्रँक करा. इंजिन सुरु झाल्यावर चावीवरील हात काढा.

*सूचना*

- **इंजिन सुरु झाल्याबरोबर लगेच स्टार्टर फिरवणे थांबवा, नाही तर स्टार्टर सिस्टिमचे नुकसान होऊ शकते.**
- **इंजिन एका वेळी 12 सेकंदांपेक्षा जास्त वेळ क्रँक करु नका. पहिल्या प्रयत्नात इंजिन सुरु झाले नाही, तर सुमारे 15 सेकंद थांबून मग पुन्हा प्रयत्न करा.**

12 सेकंद क्रँक केल्यावरही इंजिन सुरु न झाल्यास सुमारे 15 सेकंद थांबा, ॲक्सिलरेटर पेडल 1/3 अंतर खाली दाबा आणि पुन्हा इंजिन क्रँक करण्याचा प्रयत्न करा. इंजिन सुरु झाल्यावर चावी आणि ॲक्सिलरेटर पेडल सोडा.
तरीही इंजिन सुरु झाले नाही तर क्रँक करताना ॲक्सिलरेटर पेडल पूर्णपणे खाली दाबून ठेवायचा प्रयत्न करा. यामुळे, इंजिन फ्लड झाले असल्यास ते क्लिअर होईल.

*टीप:*
- *पेट्रोल मोडवरुन सीएनजी मोडवर चेंजओव्हर करण्यासाठी ॲक्सिलरेटर पेडल दाबू नका.*
- *इग्निशन “ON” असून इंजिन सुरु नसताना सीएनजी माल्फंक्शन लॅम्प उघडमीट करत राहणे याचा अर्थ इंधनाच्या टाकीचे झाकण उघडे राहिले आहे. अशा स्थितीत वाहन सुरु होणार नाही.*
- *नेहमी शिफारस केली जाते की इंजिनचे आयुष्यमान वाढवण्यासाठी वाहन ऑटो मोड किंवा पेट्रोल मोडमध्येच सुरु करावे.*
- *ॲम्बियंट / इंजिनचे तापमान शून्य अंश सेल्सियसच्या खाली असताना वाहन सुरु केल्यास इंधनपद्धतीत बदल होऊन सीएनजी सुरु होण्याची क्रिया कदाचित होणार नाही. अशा परिस्थितीत इंजिन गरम होईपर्यंत ते पेट्रोल मोडमध्ये सुरु ठेवा आणि नंतर सीएनजीवर चेंजओव्हर करण्यासाठी ते पुन्हा सुरु करण्याचा प्रयत्न करा.*
- *शिफारस करण्यात येते की पेट्रोल टँकमध्ये पुरेशा प्रमाणात पेट्रोल ठेवावे.*
- *ॲम्बियंट / इंजिनचे तापमान शून्य अंश सेल्सियसच्या खाली असल्यास वाहन फोर्स्ड सीएनजी मोडमध्ये कदाचित सुरु होणार नाही. शिफारस केली जाते की वाहन अशा वेळी ऑटो मोडमध्ये सुरु करावे.*
- *शिफारस केली जाते की सीएनजी मोडवरुन आपोआप पेट्रोल मोडवर चेंजओव्हर होताना वाहनाचे इंजिन स्टॉल होऊ नये म्हणून पेट्रोल टँकमध्ये पुरेसे पेट्रोल ठेवावे.*
- *जर चेंजओव्हर स्विच दाबूनही सीएनजी माल्फंक्शन वॉर्निंग लॅम्प उघडमीट करत राहिला, तर जवळच्या अधिकृत मारुती सुझुकी कमर्शियल वर्कशॉपमध्ये वाहनाची तपासणी करुन घ्या.*

### (डिझेल इंजिनच्या मॉडेलसाठी)

**थंड इंजिन**
इग्निशन स्विच फिरवून “ON” स्थितीवर आणा, आणि जर ग्लो प्लग इंडिकेटर चालू झाला तर तो बंद होईपर्यंत थांबा. इग्निशनची चावी फिरवून “START” वर आणून इंजिन क्रँक करा. इंजिन सुरु झाल्यावर चावी सोडा.

*सूचना*

- **इंजिन सुरु झाल्याबरोबर लगेच स्टार्टर फिरवणे थांबवा, नाही तर स्टार्टर सिस्टिमचे नुकसान होऊ शकते.**
- **इंजिन एका वेळी 30 सेकंदांपेक्षा जास्त वेळ क्रँक करु नका. पहिल्या प्रयत्नात इंजिन सुरु झाले नाही, तर सुमारे 15 सेकंद थांबून मग पुन्हा प्रयत्न करा.**

**गरम इंजिन**
इग्निशनची चावी फिरवून “START” वर आणून इंजिन क्रँक करा. इंजिन सुरु झाल्यावर चावी सोडा.

### टर्बोचार्जरसहित इंजिन बंद करताना घेण्याची खबरदारी

वाहनाने चढ चढल्यावर किंवा भरपूर वेगाने प्रवास केल्यावर इंजिन बंद करण्यापूर्वी ते एक मिनिट किंवा जास्त वेळ चालू राहू द्या (तसे करण्यास मनाई नसेल तर), म्हणजे टर्बोचार्जर आणि इंजिन ऑईल थंड होतील. इंजिन ऑईलची अतिरिक्त खराबी होऊ नये म्हणून असे करावे. खराब झालेल्या इंजिन ऑईलमुळे टर्बोचार्जरच्या बेअरिंग्जचे नुकसान होईल.

### इंधन पूर्ण संपल्यानंतर बंद झालेले इंजिन पुन्हा सुरु करणे

इंजिन बंद झाले आणि इंधन कमी असल्याचे सांगणारा लो फ्युएल वॉर्निंग लाइट आणि बिघाड असल्याचे सांगणारा माल्फंक्शन इंडिकेटर लाइट लागले, तर खाली पद्धत वापरा:


1) इंधनाची टाकी भरा.
2) इंधन पोचण्यासाठी इग्निशन चावी “ON” स्थितीमध्ये 5-10 सेकंद तशीच ठेवा.
3) इंजिन सुरु करण्यासाठी वरील स्टार्टिंगची पद्धत वापरा.

इंजिन सुरु झाल्यावरही जर माल्फंक्शन इंडिकेटर लाइट लागला, तर याचा अर्थ इंजिनमध्ये काही तरी समस्या आहे. तुमच्या अधिकृत मारुती सुझुकी कमर्शियल वर्कशॉपला इंजिन तपासायला सांगा.

## ट्रान्समिशनचा वापर करणे

### मानवी हातांनी ट्रान्समिशन वापरणे

उदाहरण




65D038

### वाहन चालवण्यास सुरुवात करणे

वाहन चालवायला सुरु करण्यासाठी क्लच पेडल पूर्णपणे खाली दाबा आणि गिअरशिफ्ट 1 ल्या किंवा 2 रा गिअरमध्ये आणा. पार्किंग ब्रेक सोडल्यावर क्लच सावकाश सोडा. इंजिनच्या आवाजात फरक ऐकू आल्यानंतर एकीकडे क्लच हळू हळू सोडत त्याच वेळी ॲक्सिलरेटर दाबत रहा.

*टीप:*

- नित्याच्या वाहन चालवण्यासाठी सुरुवात करण्यासाठी शिफारस केलेली गिअरची स्थिती 2 रा गिअर ही आहे.
- ओबडधोबड जमिनीवरुन किंवा सावकाश, भरपूर वजन असताना वाहन चालवण्यासाठी शिफारस केलेली गिअरची स्थिती 1 ला गिअर ही आहे.

### गिअर बदलणे

सर्व फॉरवर्ड गिअर्स हे सिंक्रोनाइज केलेले असल्यामुळे गिअर सहज आणि आवाज न होता बदलले जातात. गिअर बदलताना नेहमी क्लच पूर्णपणे खाली दाबा.

### डाऊनशिफ्ट करण्यासाठी अधिकतम वेगमर्यादा

**(पेट्रोल आणि द्वि-इंधन इंजिनच्या मॉडेलसाठी)**

| डाऊनशिफ्ट करणे | किमी/तास |
|---|---|
| 2 रा ते 1 ला | 20 |
| 3 रा ते 2 रा | 70 |
| 4 था ते 3 रा | 80 |
| 5 वा ते 4 था | 80 |

**(डिझेल इंजिनच्या मॉडेलसाठी)**

| डाऊनशिफ्ट करणे | किमी/तास |
|---|---|
| 2 रा ते 1 ला | 15 |
| 3 रा ते 2 रा | 40 |
| 4 था ते 3 रा | 60 |
| 5 वा ते 4 था | 90 |

**टीप:*

*वाहन ज्या परिस्थितीत चालवत आहात ती परिस्थिती आणि/किंवा वाहनाची परिस्थिती हे लक्षात घेऊनच अधिकतम वेगमर्यादेपर्यंत वेग वाढवावा.*

## सूचना

अधिक खालच्या गिअरवर डाऊनशिफ्ट करताना वाहन अधिकतम वेगमर्यादेपेक्षा जास्त वेगाने जात नसल्याची खात्री करा, नाही तर इंजिनचे अतिशय नुकसान होऊ शकते.

## ⚠ इशारा

- मोठ्या किंवा तीव्र उतारावरुन जाण्यापूर्वी वेग कमी करा आणि अधिक खालच्या गिअरवर डाऊनशिफ्ट करा. खालच्या गिअरमुळे वाहनाच्या वेगाला ब्रेक मिळेल. ब्रेक्स दाबून वाहन चालवण्याचे टाळा, नाही तर ते अतिशय गरम होतील, आणि निकामी होतील.
- निसरड्या रस्त्यांवरुन वाहन चालवताना डाऊनशिफ्ट करण्यापूर्वी वाहनाचा वेग कमी केल्याची खात्री करा. इंजिनाच्या वेगामध्ये फार प्रमाणात किंवा अचानक बदल केल्यामुळे ट्रॅक्शन जाऊ शकते आणि त्यामुळे वाहनावरील ताबा जाऊ शकतो.

## सूचना

रिव्हर्स गिअर टाकण्यापूर्वी वाहन पूर्णपणे थांबले असल्याची खात्री करा.

## सूचना

- क्लचचे नुकसान टाळण्यास मदत करण्यासाठी क्लच पेडलचा वापर पाय ठेवण्याची जागा म्हणून करु नका, किंवा उतारावरुन चालवताना वाहन स्थित ठेवण्यासाठी क्लच वापरु नका. गिअर बदलताना क्लच पूर्णपणे दाबा.
- गिअर बदलताना किंवा वाहन (इंजिन सुरु केल्यानंतर) सुरु करताना इंजिन रेस करु नका. इंजिन विनाकारण रेस केल्याने त्याचे आयुष्य कमी होते आणि गिअर सहज बदलण्यामध्ये समस्या येऊ शकतात.

## पार्किंग सेन्सर्स (असल्यास)

- पार्किंग सेन्सर सिस्टीम रियर बम्पर जवळ असलेले अडथळे शोधण्यासाठी अल्ट्रासोनिक सेन्सर्स वापरते. आपण व्हेईकल पार्किंग करत असताना किंवा हळू हळू हलवित असताना अडथळ्यांना जाणवत असल्यास, सिस्टीम आपल्याला बज़र वाजवून चेतावणी देते.
- सिस्टीम अल्ट्रासोनिक वेव उत्सर्जित करते आणि संबंधित सेन्सर अडथळ्याद्वारे प्रतिबिंबित लाट परत मिळवते. सिस्टम अल्ट्रासोनिक वेवने घेतलेल्या अडथळ्यापर्यंत पोहचण्यासाठी आणि त्यातून परत येण्यासाठी घेतलेला वेळ मोजतो, ज्यामधून ते अडथळाची स्थिती निश्चित करते.
- जेव्हा आपण इग्निशन स्विचला "चालू" स्थितीत चालू करता आणि गियरशिफ्ट लीव्हर "आर" स्थितीत असतो तेव्हा पार्किंग सेन्सर कार्य वापरले जाऊ शकते. हे कार्य पुढील प्रकरणांमध्ये उपयुक्त आहे: कर्बवर ओढणे; समांतर व्हेईकल पार्किंग; गॅरेजमध्ये व्हेईकल स्टीयरिंग करणे; कडेने चालावताना; आणि अडथळ्यांसह एका ठिकाणी हळू चालावताना.

**⚠ इशारा**

- **पार्किंग सेन्सर आपल्याला बज़र्स सह अडथळ्यांविषयी चेतावणी देते. तथापि, तरीही आपल्याला विशिष्ट काळजीने वाहन चालवावे लागेल.**
- **सेन्सर्स केवळ मर्यादित क्षेत्रातच आणि व्हेईकल मर्यादित स्पीड श्रेणीमध्ये फिरत असतानाच अडथळे शोधू शकतात. तर, अवघड भागात, आपण आपल्या थेट दृष्टी किंवा मागील दृश्यास्पद मिरर्सचा वापर करून व्हेईकल सुमारे फिरत असताना हळू हळू हलविले पाहिजे. आपण केवळ पार्किंग सेन्सर वर अवलंबून असलेल्या व्हेईकल वर कंट्रोल ठेवला तर अपघाताची शक्यता वाढते.**


*टीप :*

*जेव्हा गियरशिफ्ट लीव्हरला “R” स्थानावर स्थानांतरित केले जाते, तेव्हा एकदा बज़र वाजेल.*

***सूचना***

**पार्किंग सेन्सर्स फक्त ड्रायव्हरच्या मदतीसाठी असतात**

## सेन्सर्स ठिकाणी
## रियर बम्परवर




77PM03002

(1) रियर सेन्सर्स (2 ठिकाणी)

***सूचना***

- **सेन्सर भागावर आपटणे किंवा सेन्सरच्या भागावर हाय-प्रेशर कार वॉशरचे नोजल निर्देशित करण्याचे टाळा. अन्यथा, सेन्सर खराब होऊ शकतात.**
- **जर बम्पर हार्ड ऑब्जेक्टला मारला तर त्यावरील सेन्सर्स योग्य प्रकारे कार्य करू शकत नाहीत. असे झाल्यास मारुती सुजुकीची अधिकृत वर्कशॉप द्वारे सेन्सर्स तपासणी करा.**


## कार्यरत सेन्सर्स

खालीलप्रमाणे गियरशिफ्ट लीव्हर स्थानावर अवलंबून सेन्सर्स कार्य करतात:

| गियरशिफ्ट लीव्हर स्थिती | R | N, 1- 5 |
|---|---|---|
| रियर सेन्सर्स | चालू | बंद |

## अंदाजे क्षेत्र जिथे अडथळे ओळखले जाऊ शकतात

उदाहरण



78MM05003

- सेन्सर पासून सुमारे 20 cm (8 in) आत किंवा सेन्सर च्या अगदी खाली असलेला अडचण शोधण्यायोग्य नाह.
- सेन्सर्स व्हेईकलच्या मागील बाजूस 1.5 m (5 ft) पर्यंतच्या भिंतीसारख्या अडथळ्यांना ओळखू शकतात.

**⚠ इशारा**

**खालील अटींनुसार, पार्किंग सेन्सर सिस्टीम सामान्यपणे कार्य करू शकत नाही कारण सेन्सर्स अडथळे योग्यरित्या शोधू शकत नाहीत.**

- **सेन्सर्स चिखल, बर्फ किंवा इतर सामग्रीसह संरक्षित आहेत. (सामान्य ऑपरेशनसाठी अशी सामग्री काढली पाहिजे.)**
- **सेन्सर्स पाण्याची टाकी किंवा अतिवृष्टीमुळे ओले असतात.**
- **सेन्सर्स हाताने, स्टिकरने, अक्सेसरीसाठी इत्यादीने झाकलेले असतात.**
- **सेन्सर्सच्या सेन्सिंग एरियामध्ये आकक्सेसरी किंवा इतर वस्तू संलग्न आहे.**
- **टॉपर हुक, व्यावसायिकदृष्ट्या उपलब्ध कोपराचे पोल, रेडिओ अंटिना इत्यादी वस्तू बम्पर वर स्थापित केल्या आहेत.**
- **निलंबन किंवा इतर कारणांमुळे बदलामुळे बम्परची उंची बदलली जाते.**
- **अतिशीत हवामानामुळे सेन्सर क्षेत्रे थेट सूर्यप्रकाशापासून किंवा थंड पासून अत्यंत गरम असतात.**
- **व्हेईकल खडबडीत पृष्ठभाग, उतार, रेव रोड किंवा गवत फील्डवर आहे.**
- **व्हेईकल एका उंच कोनात आहे.**

(क्रमश)

**⚠ इशारा**

(क्रमश)

- **सेन्सर्सने दुसऱ्या व्हेईकल्स हॉर्न, इंजिन, एअर ब्रेकिंग सिस्टीम (मोठी व्हेईकल्स) किंवा पार्किंग सेन्सर मधून प्रचंड कंपनसंख्या असलेल्या अल्ट्रासोनिक नॉइज़ला रोखले.**
- **अडथळे सेन्सर्सच्या अगदी जवळ असतात.**
- **काचेच्यासारख्या अत्यंत परावर्तित वस्तूच्या कोनात सेन्सर्स असतात. (अल्ट्रासोनिक वेव्स अडथळा पासून परत प्रतिबिंबित नाहीत.)**

• **खालील प्रकारचे अडथळे सेन्सर्स योग्यरित्या शोधण्यात सक्षम होऊ शकत नाहीत:**

- **वायर जाळी आणि दोरी यासारख्या पातळ सामग्रीने बनविलेल्या वस्तु**
- **चौरस-आकाराचे कर्बस्टोन किंवा तीक्ष्ण कडा असलेल्या इतर वस्तू**
- **रस्त्याच्या चिन्हासारख्या मोठ्या वरच्या भागासह उंच वस्तू**
- **कर्बस्टोनसारख्या लो-प्रोफाइल वस्तू**
- **कापूस आणि बर्फ यासारख्या ध्वनी-शोषक वस्तू**

*टीप :*

- *सेन्सर्स पेक्षा कमी असलेले पातळ पोल्स किंवा अडथळे ज्ञानीही होऊ शकतात कारण व्हेईकल लांब अंतरावरुन जरी सापडला असला तरीही वाहन त्यांच्या जवळ जाते.*
- *सिस्टीम रस्ताच्या चिन्हापासून किंवा वास्तविक अंतरापेक्षा लहान असण्यासाठी समान अडथळ्याची गणना करू शकते.*

**पार्किंग सेन्सर द्वारे अडथळा दर्शविणारा**

एखादा अडथळा ओळखल्यानंतर पार्किंग सेन्सर मुळे अंतर्गत बज़र वाजतो.

- मागील सीटवर मागे असलेल्या बज़र वाजतो तेव्हा मागील बाजूस सेन्सर अडथळा आणतो.
- सेन्सर्स द्वारे भिंतीसारख्या अडथळ्यांचा शोध घेतल्यास चेतावणी


| अंतर (अंदाजे) | बज़र |
|---|---|
| 100 – 150 cm (39 – 59 in) | थोड्या अंतराने लहान बीप |
| 60 – 100 cm (24 – 39 in) | अगदी छोट्या अंतरावर लहान बीप |
| 60 cm कमी (24 in) | सतत बीप |

**चेतावणी आणि सूचक संदेश**

पार्किंग सेन्सर सिस्टीम संदर्भात कोणतीही समस्या किंवा चेतावणी असल्यास बज़र ने त्यास सूचित केले. त्याच्या सूचनांचे अनुसरण करा.

- बज़र मधूनमधून आवाज येतो. दर्शविलेले सेन्सर दूषित आहे. मऊ कापडाने ते स्वच्छ पुसून घ्या. पुसल्यानंतर बज़र बंद झाला नाही तर पार्किंग सेन्सर सिस्टीम मध्ये समस्या उद्भवू शकते. आपल्या व्हेईकलची मारुती सुजुकीची अधिकृत कार्यशाळेद्वारे तपासणी करा.

## ब्रेक



60G165S

वाहनाच्या वेगानुसार ते थांबवण्यासाठी लागणारे अंतरही वाढते. उदाहरणार्थ, 60 किमी/तास (37 मैल/तास) वेगाने वाहन जात असताना ते थांबण्यासाठी लागणारे अंतर हे 30 किमी/तास (19 मैल/तास) वेगाने वाहन जात असताना ते थांबण्यासाठी लागणार्या अंतराच्या मानाने सुमारे 4 पट जास्त असते. तुमचे वाहन आणि थांबण्याचे ठिकाण यामध्ये भरपूर अंतर असताना ब्रेक लावायला सुरुवात करा, आणि हळू हळू वेग कमी करा.

**⚠ इशारा**

**ब्रेक ड्रम्समध्ये पाणी गेले तर ब्रेक्स नीट काम करणार नाहीत, किंवा ते कसे लागतील हे सांगता येणार नाही.**

**पाण्यामधून वाहन गेल्यानंतर किंवा वाहनाची खालची बाजू धुतल्यानंतर ब्रेक्स नेहमीसारखे काम देत असल्याच्या खात्रीसाठी वाहन सावकाश चालले असताना ब्रेक्स लावून पहा. जर ब्रेक्स नेहमीपेक्षा कमी परिणामकारक असले, तर वाहन सावकाश चालले असताना ब्रेक्स नेहमीप्रमाणे काम करु लागेपर्यंत पुन्हा पुन्हा लावत रहा.**

### पॉवर-असिस्टेड

तुमच्या वाहनाला पॉवर-असिस्टेड ब्रेक्स आहेत. जर इंजिन बंद पडल्यामुळे किंवा इतर बिघाडामुळे पॉवरची मदत नाहीशी झाली, तरी सिस्टिम रिझर्व्ह पॉवरच्या सहाय्याने पूर्णपणे कार्यक्षम राहते, आणि तुम्ही ब्रेक पेडल एकदाच दाबून ठेवून वाहन पूर्णपणे थांबवू शकता. तुम्ही ब्रेक पेडल दाबल्यावर रिझर्व्ह पॉवर काही प्रमाणात वापरली जाते आणि प्रत्येक वेळी ब्रेक पेडल दाबल्यावर कमी कमी होत जाते. ब्रेक पेडलवर एकसमान आणि सहज दाब द्या. ते पंप करु नका.


**⚠ इशारा**

**ब्रेक सिस्टिममध्ये जरी रिझर्व्ह पॉवर नसली, तरी तुम्ही नेहमीपेक्षा जास्त जोराने ब्रेक पेडल दाबून वाहन थांबवू शकता. मात्र अशा वेळी वाहन थांबण्यासाठी जास्त अंतर लागू शकते.**

# वाहन चालवण्यासाठी टिप्स

रनिंग-इन ........ 4-1
कॅटॅलिटिक कन्व्हर्टर ........ 4-1
इंधन बचत वाढवणे ........ 4-2
हायवेवर वाहन चालवणे........ 4-3
घाटरस्त्यांवर वाहन चालवणे ........ 4-3
निसरड्या रस्त्यांवर वाहन चालवणे ........ 4-4
ओल्या रस्त्यांवर वाहन चालवणे ........ 4-5
सुरक्षित वाहन चालवण्यासाठी काय करा आणि काय करु नका... 4-5
मार्जिन फॉर सेफ्टी ........ 4-7

उदाहरण



52D078S

**⚠ इशारा**

- तुमचे सीट बेल्ट्स कायम लावून ठेवा. वाहनचालक आणि प्रवासी, दोघांनीही वाहनातील सीट बेल्ट्स लावून कायम स्वतःला बसल्या जागी घट्ट ठेवले पाहिजे. सीट बेल्ट्सच्या योग्य वापरासाठीच्या सूचनांसाठी “सीट बेल्ट्स” हा भाग पहा.
- मद्य किंवा इतर अमली पदार्थांच्या अमलाखाली असताना कधीही वाहन चालवू नका. मद्य आणि अमली पदार्थांमुळे तुमची सुरक्षितपणे वाहन चालवण्याची क्षमता खूप कमी होते आणि स्वतःला आणि इतरांना दुखापत होण्याचा धोका मोठ्या प्रमाणात वाढतो. तसेच तुम्ही थकलेले, आजारी, चिडलेले किंवा तणावाखाली असतानासुद्धा वाहन चालवणे टाळले पाहिजे.

## रनिंग-इन


***सूचना***

**इंजिनची पुढील कामगिरी आणि विश्वासार्हता ही त्याच्या सुरुवातीच्या काळात घेतलेली काळजी आणि पाळलेल्या संयमावर अवलंबून असते. वाहनाच्या प्रवासातील पहिल्या 960 किमी मध्ये खालील खबरदार्या घेणे विशेष महत्वाचे आहे.**

- **इंजिन सुरु केल्यावर ते रेस करु नका. ते सावकाश गरम करा.**
- **एकाच वेगात फार वेळ वाहन चालवणे टाळा. तुम्ही त्याचा वेग बदलता ठेवला, तर हलते भाग लवकर रुळतील.**
- **थांबलेल्या जागेवरुन सावकाश निघा. सुरुवातीलाच पूर्ण थ्रॉटल देण्याचे टाळा.**
- **वाहनाच्या विशेषतः पहिल्या 320 किमी मध्ये एकदम जोरात ब्रेक लावणे टाळा.**
- **ट्रान्समिशन हाय गिअरमध्ये असताना सावकाश वाहन चालवू नका.**
- **इंजिनचा वेग मध्यम ठेवून वाहन चालवा.**
- **मागे ट्रेलर बांधून नेऊ नका.**

## कॅटॅलिटिक कन्व्हर्टर

उदाहरण



77PH201

तुमच्या वाहनाच्या एक्झॉस्टमध्ये अपायकारक प्रदूषणकारक घटकांचे प्रमाण किमान पातळीवर ठेवणे हा कॅटॅलिटिक कन्व्हर्टरचा उद्देश असतो. कॅटॅलिटिक कन्व्हर्टर असलेल्या वाहनांमध्ये शिसेयुक्त (लेडेड) इंधनाचा वापर करण्यावर बंदी आहे, कारण शिशामुळे कॅटॅलिस्ट सिस्टिममधील प्रदूषण कमी करणारे घटक निष्क्रिय होतात.

कन्व्हर्टरची रचना अशा रीतीने केलेली असते, की वाहनाचा सामान्य वापर केल्यास आणि लेडेड इंधन न वापरल्यास तो वाहनाच्या आयुष्यभर चालतो. कन्व्हर्टरसाठी कोणतीही वेगळी देखभाल आवश्यक नसते. मात्र इंजिनचे ट्यूनिंग व्यवस्थित ठेवणे फार महत्वाचे असते. व्यवस्थित ट्यूनिंग न केल्यामुळे इंजिनचे जे मिसफायरिंग होते, त्यामुळे कॅटॅलिस्ट फार जास्त गरम होऊ शकतो. यामुळे कॅटॅलिस्ट आणि वाहनाच्या इतर भागांचे उष्णतेमुळे कायमचे नुकसान होऊ शकते.

**सूचना**


**कॅटॅलिस्ट किंवा वाहनाच्या इतर भागांचे नुकसान टाळण्यासाठी:**

- **इंजिन चालवण्याच्या योग्य स्थितीत राखा.**
- **इंजिनमध्ये बिघाड झाल्यास, विशेषतः इंजिनचे मिसफायरिंग किंवा इतर प्रकारे त्याचे कार्य बिघडण्याशी संबंधित बिघाड झाल्यास वाहनाचे त्वरित सर्व्हिसिंग करुन घ्या.**
- **ट्रान्समिशन गिअरमध्ये असताना आणि वाहन चाललेले असताना इंजिन बंद करु नका किंवा इग्निशनमध्ये व्यत्यय आणू नका.**
- **वाहन ढकलून किंवा ओढून नेऊन, किंवा उतारावरुन सोडून देऊन इंजिन सुरु करण्याचा प्रयत्न करु नका.**
- **कोणत्याही स्पार्क प्लगच्या वायर काढलेल्या असताना इंजिन आयडल करु नका, जसे डायग्नॉस्टिक टेस्टिंगदरम्यान.**
- **आयडलिंग रफ वाटत असले किंवा इतर काही बिघाड असले तर वाहनाचे फार जास्त काळ आयडलिंग करु नका.**
- **फ्युएल टँक पूर्णपणे रिकामा होऊ देऊ नका.**
- **इंजिनचा वेग प्रचंड ठेवून वाहन चालवणे टाळा.**

**⚠ इशारा**

**तुम्ही जेथे वाहन उभे करता आणि घेऊन जाता, त्या भागांमध्ये काळजी घ्या; कॅटॅलिटिक कन्व्हर्टर आणि एक्झॉस्टचे इतर भाग अत्यंत गरम होऊ शकतात. इतर वाहनांप्रमाणे याही वाहनाच्या बाबतीत, जेथे वाळलेले गवत किंवा पाने किंवा इतर ज्वलनशील पदार्थांचा स्पर्श अत्यंत गरम झालेल्या एक्झॉस्ट सिस्टिमला होऊ शकेल, अशा ठिकाणी वाहन उभे करु नका किंवा घेऊन जाऊ नका.**

**उदाहरण**



82DY05

## इंधन बचत वाढवणे

खालील सूचनांचा उपयोग तुम्हाला इंधन बचतीत सुधारणा करण्यासाठी होऊ शकतो.

**फार जास्त आयडलिंग करणे टाळा**

वाहन उभे केले असताना तुम्हाला एका मिनिटाहून जास्त वेळ थांबावे लागणार असेल, तर इंजिन बंद करा आणि निघताना पुन्हा सुरु करा. थंड इंजिन गरम करताना, इंजिनचे तापमान त्याच्या कामासाठी आवश्यक तितके वाढेपर्यंत आयडलिंग सुरु ठेवू नका किंवा त्याची थ्रॉटल पूर्णपणे वाढवू नका. वाहन चालवतानाच इंजिन गरम होऊ द्या.

**अचानक वाहनाचा वेग वाढवण्याचे टाळा**

शून्यावरुन अचानक वाहन भर वेगात नेणे किंवा वाहन चालू असताना वेग अचानक वाढवणे यामुळे विनाकारण इंधन जास्त जळेल आणि इंजिनचे आयुष्य कमी होईल. मंद गतीने वाहन सुरु करा.

**गरज नसताना वाहन थांबवणे टाळा**


गरज नसताना वाहनाचा वेग कमी करणे आणि ते थांबवणे टाळा. शक्य असेल तेव्हा नेहमी सावकाश, एकच वेग ठेवण्याचा प्रयत्न करा. वेग कमी करणे आणि पुन्हा वाढवण्यात जास्त इंधन खर्च होते.

**वाहनाचा वेग एकच ठेवा**

रस्ता आणि रहदारी यानुसार वाहनाचा एकच योग्य तो वेग राखा.

**एअर क्लीनर साफ ठेवा**

उदाहरण



60A183S

एअर क्लीनरमध्ये धूळ जमली तर हवा आत येण्यासाठी जास्त विरोध होतो, त्यामुळे पॉवर आऊटपुट कमी होतो आणि इंधनाचा वापर वाढतो.

**वजन कमीत कमी ठेवा**

जितके वजन जास्त, तितके वाहनाला इंधन जास्त लागते. आवश्यक नसेल ते सामान बाहेर काढा.

**टायर प्रेशर योग्य ठेवा**

टायर्स कमी फुगलेली असली तर टायर्सच्या विरोधामुळे वाहन चालायला जास्त विरोध होतो आणि इंधन जास्त वाया जाते. ड्रायव्हरच्या डोअर लॉक पिलरवरील लेबलमध्ये दिल्यानुसार टायर्समध्ये हवेचे प्रेशर योग्य ठेवा.

## हायवेवर वाहन चालवणे


हायवेसाठीच्या वेगाने वाहन चालवताना खालील गोष्टींकडे लक्ष ठेवा:

- वाहनाच्या वेगाबरोबर ते थांबायला लागणारे अंतर वाढत जाते. थांबायला लागणारे अंतर जास्त ठेवण्यासाठी, जेथे थांबायचे असेल त्या ठिकाणापासून पुरेशा आधीपासून ब्रेक्स लावू लागा.
- पावसाच्या दिवसांमध्ये हायड्रोप्लेनिंग होऊ शकते. रस्त्याचा पृष्ठभाग आणि टायर्स यांच्यादरम्यान पाण्याचा पातळ थर तयार होतो, त्यामुळे त्यांचा एकमेकांशी थेट स्पर्श कमी होतो, याला हायड्रोप्लेनिंग म्हणतात. हायड्रोप्लेनिंग असताना वाहनाची दिशा बदलणे आणि ब्रेक्स लावणे फार कठीण होऊ शकते, आणि वाहनावरील ताबा जाऊ शकतो. त्यामुळे रस्ता ओला असताना वेग कमी ठेवा.
- वेग जास्त असताना बाजूंनी येणार्या वार्यांचा वाहनावर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे वेग कमी करा आणि अनपेक्षितपणे वाहनाला धक्के बसू शकतील याच्या तयारीत रहा. असे हवेचे धक्के बोगद्यांमधून बाहेर पडताना, डोंगर संपून अचानक रस्त्याची एक बाजू मोकळी झाल्यास, किंवा तुमच्या वाहनाला मोठी वाहने ओव्हरटेक करुन जाताना, इ. परिस्थितीत बसू शकतात.

## घाटरस्त्यांवर वाहन चालवणे

- तीव्र चढाच्या घाटरस्त्यांवरुन चढत असताना वाहनाचा वेग कमी होऊ लागू शकतो आणि पॉवर कमी पडत असल्याचे दिसू शकते. अशा वेळी वाहन अधिक खालच्या गिअरमध्ये घ्यावे, म्हणजे इंजिन त्याच्या सामान्य पॉवरने चालत राहील. वाहनाची गती कमी होऊ नये म्हणून गिअर भराभर बदला.
- घाटरस्त्यांवरुन खाली उतरताना आणखी खालच्या गिअरमध्ये घेऊन इंजिनचा उपयोग ब्रेक्ससारखा वेग रोखण्यासाठी करावा.

उदाहरण




77PH003

**⚠ इशारा**

**घाटरस्त्याच्या तीव्र किंवा लांब उतारावरुन खाली जाताना ब्रेक पेडल एका वेळी फार काळ किंवा वारंवार न दाबून ठेवण्याचा प्रयत्न करा. कारण यामुळे ब्रेक्स अतिशय गरम होऊ शकतात, त्यामुळे ब्रेकिंगची कार्यक्षमता कमी होते. ही खबरदारी घेतली नाही तर वाहनावरील ताबा जाऊ शकतो.**


**वाहन पूर्णपणे एका जागी उभे असताना चढावरुन नेणे सुरु करताना**

- पार्किंग ब्रेक घट्ट लावा म्हणजे वाहन मागे जाणार नाही.
- क्लच पेडल खाली दाबा आणि गिअरशिफ्ट 1 ल्या सिलेक्ट स्थितीत आणा.
- क्लच सोडू नका.
- वाहन सुरु करायला तयार झाल्यावर ऍक्सिलरेटर पेडल दाबून त्याच वेळी क्लच पेडल सोडा. वाहन पुढे निघाल्यानंतर पार्किंग ब्रेक सावकाश काढा.

***सूचना***

**घाटरस्त्यावरुन उतारावरुन खाली जाताना कधीही इग्निशनची चावी फिरवून "LOCK" स्थितीत आणू नका. यामुळे एमिशन कंट्रोल सिस्टिमचे नुकसान होऊ शकते.**

## निसरड्या रस्त्यांवर वाहन चालवणे



उदाहरण

82DY06

रस्ते ओले असताना तुम्ही कोरड्या रस्त्यांवरुन वाहन चालवता, त्यापेक्षा कमी वेगाने वाहन चालवले पाहिजे, कारण ब्रेक्स लावताना टायर्स घसरु शकतात. बर्फ, हिम किंवा चिखल रस्त्यावर असताना वेग कमी करा आणि वेग अचानक वाढवणे, अचानक ब्रेक लावणे, किंवा स्टीअरिंग झपाट्याने वळवणे टाळा.

**तुमचे वाहन रुतून बसले तर**

तुमचे वाहन जर हिम, चिखल किंवा वाळूमध्ये रुतून बसले, तर खालील सूचनांचे पालन करा:

1) ट्रान्समिशन पहिला गिअर आणि रिव्हर्स यांच्यामध्ये आळीपाळीने बदलत रहा. यामुळे एक मागे-पुढे हलण्याची हालचाल निर्माण होईल आणि यामुळे तुम्हाला वाहन बाहेर काढण्यासाठी पुरेसा जोर आणि वेग मिळू शकेल. यावेळी ऍक्सिलरेटर हळूच दाबा, म्हणजे चाक एका किमान आरपीएम वेगाने फिरत राहील. गिअर बदलताना ऍक्सिलरेटरवरुन पाय काढा. इंजिन रेस करु नका. चाके वेगाने फिरल्यास ती आणखी खोल रुतून बसतील आणि वाहन बाहेर काढणे अधिक कठीण होईल.
2) तुमचे वाहन काही मिनिटे मागे-पुढे केल्यावरही रुतलेले राहिले, तर दुसर्या वाहनाला मदतीसाठी बोलावून त्याच्यामागे तुमचे वाहन बांधून ओढून बाहेर काढा.

**⚠ इशारा**

**तुम्ही वाहन मागे-पुढे करत असताना कोणालाही जवळ उभे राहू देऊ नका, आणि चाके स्पीडोमीटरवर 40 किमी/तास वेगापेक्षा जास्त वेगाने फिरवू नका. चाके फार वेगाने फिरवल्यास व्यक्तिगत दुखापत आणि/किंवा वाहनाचे नुकसान होऊ शकते.**

***सूचना***


**काही मिनिटांपेक्षा जास्त वेळ वाहन मागे-पुढे करु नका. फार वेळ ते मागे-पुढे करत राहिल्यास इंजिन जास्त गरम होऊ शकते किंवा ट्रान्समिशनचे नुकसान होऊ शकते.**

## ओल्या रस्त्यांवर वाहन चालवणे

**सूचना**

- ओल्या रस्त्यांवरुन वाहन चालवताना रस्त्यावर मोठ्या प्रमाणात जमलेल्या पाण्यातून वाहन नेणे टाळा. इंजिन कंपार्टमेंटमध्ये मोठ्या प्रमाणात पाणी आल्यास इंजिन आणि/किंवा इलेक्ट्रिकल भागांचे नुकसान होऊ शकते.
- खोल पाण्यात अडकल्यास पाण्याची पातळी उतरेपर्यंत वाहन सुरु करु नका.
- पाणी दाबले जाऊ शकत नाही, इंजिनमध्ये पाणी गेल्यास इंजिनची खराबी होते.

उदाहरण



82DY07

**⚠ इशारा**

या भागातील वाहन चालवण्याबाबतच्या टिप्सचे पालन करण्याव्यतिरिक्त खालील खबरदार्या घेणेही महत्वाचे आहे.

- टायर्स चांगल्या स्थितीत असल्याची खात्री करा आणि नेहमी टायर्समध्ये सूचनांनुसार हवेचे प्रेशर कायम ठेवा. अधिक माहितीसाठी “तपासणी आणि देखभाल” मधील “टायर्स ” विभाग पहा.
- मारुती सुझुकीने सुचवलेले टायर्स सोडून इतर कोणतेही टायर्स वापरु नका. मागच्या आणि पुढच्या चाकांवर कधीही वेगळ्या आकारमानाचे किंवा प्रकारचे टायर्स लावू नका. सुचवलेल्या टायर्सबाबतच्या माहितीसाठी ड्रायव्हरच्या डोअर लॉक पिलरवर असलेले टायरबाबतच्या माहितीचे लेबल पहा.
- तुमचे वाहन वर उचलण्यासाठी (जॅक अप करण्यासाठी) कधीही मोठ्या आकाराचे टायर्स किंवा खास शॉक ऍब्सॉर्बर्स वापरु नका. यामुळे वाहनाची हाताळणी बदलेल. तसेच मोठ्या आकाराचे टायर्स उंचवट्यांवरुन जाताना वाहनाच्या बॉडीला घासू शकतात आणि यामुळे वाहनाचे नुकसान किंवा टायरची हानी होऊ शकते, किंवा ते फुटू शकते.
- पाण्यामधून गेल्यानंतर वाहन सावकाश चालवत ब्रेक्स तपासा, आणि ते नेहमीप्रमाणे काम करत आहेत ना हे पहा. ते कमी लागत असले तर वाहन सावकाश चालवत ते नेहमीप्रमाणे काम करु लागेपर्यंत पुन्हा पुन्हा लावून कोरडे करा.

## सुरक्षित वाहन चालवण्यासाठी काय करा आणि काय करु नका


तुमचे वाहन काळजीपूर्वक हाताळा. तुमच्या स्वतःबरोबरच रस्त्यावरील इतरांच्या सुरक्षिततेचे भान ठेवा, आणि या सर्वोत्तम आणि आरामदायक वाहन चालवण्याच्या अनुभवाचा आनंद घ्या.

सुरक्षित वाहन चालवण्यासाठी खालील प्राथमिक नियम आहेत. ते नीट समजण्यासाठी काळजीपूर्वक वाचा, म्हणजे तुम्ही तुमचे वाहन सुरक्षितपणे आणि आनंददायकपणे चालवून त्याची मजा घेऊ शकाल.

**वाहन सुरु करणे**

1) वाहन चालवण्यासाठी व्यवस्थित बैठक होण्यासाठी ड्रायव्हरचे सीट हवे तसे सरकवून घ्या.
2) मागच्या बाजूचे दृश्य सर्वात चांगले दिसेल अशा रीतीने रिअरव्ह्यू मिरर हलवून घ्या.

उदाहरण





77PM04002

3) वाहन जागचे हलण्यापूर्वी सुरक्षिततेची खात्री करण्यासाठी आजूबाजूला एक नजर टाका.
4) अचानक वेग वाढवू नका, ते धोकादायक आहे आणि त्याने इंधन वाया जाते.

### सर्वसाधारण

1) एखाद्या स्टॉप लाइट किंवा स्टॉप पाटीच्या आधीच थांबा. कोणतेही ट्राफिक लाईट किंवा पाट्या नसलेल्या चौकामधून जाताना सुरक्षिततेच्या खात्रीसाठी सावकाश जा.
2) पुढील वाहन अचानक थांबल्यास त्याला मागून धडक बसू नये म्हणून नेहमी पुढील वाहनापासून सुरक्षित अंतर ठेवा.
3) वाहन वळवण्यापूर्वी किंवा लेन बदलण्यापूर्वी वळण्याचा सिग्नल किमान 30 मीटर आधी सुरु करा, म्हणजे तुमच्या वाहनावर दुसरे वाहन आदळणार नाही.
4) कोपर्यावर वळण्यापूर्वी वेग पुरेसा कमी करा. कोपर्यावरुन वळताना ब्रेक्स लावू नका, नाही तर वाहन घसरु शकेल.
5) इतर वाहनांना ओव्हरटेक करताना समोरुन येणार्या वाहनांवर लक्ष ठेवा आणि सुरक्षितपणे पुढे जा.
6) सरळ रस्त्यावर वाकडीतिकडी वळणे घेत वाहन चालवू नका, कारण तुमचा वाहनावरील ताबा जाऊन अपघात होऊ शकतो.
7) बेफाम वेगाने वाहन चालवणे टाळा आणि रस्त्याच्या परिस्थितीनुसार योग्य तितका वेग कायम ठेवून सुरक्षितपणे वाहन चालवायचा प्रयत्न करा.
8) जितका वेग जास्त, तितकी चालकाची दृष्टिमर्यादा अरुंद होते. अशा वेळी कोणत्याही धोक्याचे पूर्वानुमान करणे कठीण असते आणि चालकही मनाने थकतो.



77PM04001

9) मोठ्या वेगाने वाहन चालवत असताना अचानक वळणे घेण्याचा प्रयत्न करु नका. तुमचा वाहनावरील ताबा जाऊ शकतो.
10) मोठ्या वेगाने वाहन चालवत ओव्हरटेक करताना किंवा लेन बदलताना दोन वाहनांमध्ये पुरेसे अंतर ठेवा.

### ब्रेक लावणे

1) सुरक्षिततेसाठी, तुमचे वाहन उभे करताना पार्किंग ब्रेक वापरा आणि गिअरशिफ्ट लिव्हर पहिल्या गिअरमध्ये किंवा रिव्हर्स गिअरमध्ये आणून ठेवा.
2) अगदीच पर्याय नसल्याशिवाय हँड-ब्रेक वापरु नका. यामुळे वाहन घसरते आणि अपघात होऊ शकतो. टायर्स झिजले असताना हे विशेष धोक्याचे असते कारण झिजलेले टायर्स जास्त घसरतात.

फूट ब्रेक
1. मागच्या वाहनाला सूचना द्या
2. सावकाश ब्रेक लावा.
3. वाहन पूर्ण थांबवा.

3) उतारावरुन वाहन चालवताना ब्रेक लावण्याऐवजी इंजिनचा वापर परिणामकारक पद्धतीने ब्रेकसारखा करा. फूट ब्रेकचा अतिवापर केल्यास ब्रेकच्या परिणामकारकतेमध्ये घट होऊ शकते.

### दूर अंतराचे प्रवास

1) प्रवास सुरु करण्यापूर्वी सुरक्षिततविषयक तपासण्या केल्याची खात्री करा.
2) झोप येत असल्यामुळे किंवा थकव्यामुळे होणारे अपघात टाळण्यासाठी ठराविक अंतराने विश्रांती घ्या.

### रात्रीच्या वेळी वाहन चालवणे

1) दिवसापेक्षा रात्री वाहन अधिक सावकाश चालवा, कारण रात्री दृष्टिमर्यादा कमी होते.
2) रात्री इतर वाहनांना ओव्हरटेक करणे टाळा. अंधारामुळे तुमच्या वेगाच्या जाणिवेवर परिणाम होतो आणि दोन वाहनांमधील अंदाजावरही परिणाम होतो.
3) पर्यायच नसल्याशिवाय हेडलाइट्स किंवा हाय बीम वापरु नका. समोरुन येणार्या किंवा तुमच्या पुढे असलेल्या वाहनाच्या चालकाचे डोळे दिपू शकतात आणि अपघात होऊ शकतो.
4) विंडोच्या काचा नेहमी साफ ठेवा. विंडशील्डची काच कोरडी असताना वायपर चालवू नका, अशाने वायपर ब्लेड आणि काच या दोन्हीचे नुकसान होऊ शकते

## मार्जिन फॉर सेफ्टी

वाहन चालवताना स्वतःसाठी एक मार्जिन फॉर सेफ्टी (सुरक्षिततेसाठी राखीव अंतर) राखून ठेवणे महत्वाचे आहे, जेणेकरुन तुम्ही इतर वाहन चालकांच्या चुका किंवा अनपेक्षित कृतींना तोंड देऊ शकाल. यासाठी खालील गोष्टींचे पालन करा:

- सुरक्षित वेगाने वाहन चालवा.
- तुमचे वाहन आणि समोरचे किंवा पुढचे वाहन यांच्यात पुरेसे अंतर ठेवा.
- बळजबरीने इतर वाहनांना ओव्हरटेक करु नका.
- अचानक वेग वाढवणे, वाहन वळवणे किंवा थांबणे या गोष्टी करु नका.
- वाहन चालवण्याच्या प्रसंगांमध्ये, वेळांमध्ये पुरेसे अंतर ठेवा.
- रहदारीचे नियम पाळा.

**अंततः**

आदर्श वाहन चालक असे काही नसते. प्रत्येक वाहनचालकाचा प्रयत्न निर्दोष बनण्याचा असावा. सुरक्षिततेच्या जाणिवेमुळे तुमची स्वतःची तसेच रस्त्यावरील बाकीच्यांच्याही सुरक्षिततेची खात्री होते, शिवाय त्यामुळे तुमच्या वाहनाची झीज कमी होण्यास मदत होते, त्याचे आयुष्य वाढते, इंधन बचत जास्त होते आणि वाहन चालवण्याची क्रिया आरामदायक आणि आनंददायक होते.

**वर दिलेल्या करण्याच्या आणि न करण्याच्या गोष्टींचे पालन करा, म्हणजे वाहन चालवण्याची क्रिया पूर्णपणे बदलून जाईल.**


# इतर कंट्रोल्स आणि सामुग्री

फ्युएल फिलर कॅप ........ 5-1
इंजिन कंपार्टमेंट ........ 5-3
सन व्हायजर ........ 5-5
वाहनातील लाइट ........ 5-5
ऍक्सेसरी सॉकेट ........ 5-5
ग्लोव्ह बॉक्स ........ 5-6
सामान ठेवण्याची जागा ........ 5-6
एअर व्हेंट ........ 5-7
फ्रेम हूक ........ 5-7
असिस्ट ग्रिप ........ 5-8

## इंधन भरणे


### (पेट्रोल आणि द्वि-इंधन इंजिनच्या मॉडेलसाठी))

**सीएनजी फिलर व्हॉल्व**





77PM05003

सीएनजी फिलर व्हॉल्व वाहनाच्या उजव्या बाजूला असतो.





77PM05001

सीएनजी फिलरचे दार (1) अनलॉक करण्यासाठी चावी आत सरकवा आणि तिची वरची बाजू वाहनाच्या पुढच्या बाजूच्या दिशेने फिरवा.




77PM05005

सीएनजी फिलर व्हॉल्व चे कव्हर काढण्यासाठी:
1) सीएनजी फिलरचे दार (1) उघडा.
2) सीएनजी फिलर व्हॉल्व चे कव्हर (2) घड्याळाच्या उलट दिशेने फिरवून काढा.




77PM05006

*टीप:*
*जर फ्युएल फिलरच्या दारासह कॅप होल्डर (3) दिलेला असेल, तर इंधन भरताना फ्युएल फिलर कॅप धरुन ठेवण्यासाठी कॅप होल्डर वापरा.*

सिलिंडरमधील दाब डिस्पेन्सरमधील दाबाइतका होताच इंधन भरणे आपोआप बंद होते.


सीएनजी फिलर व्हॉल्व चे कव्हर परत बसवण्यासाठी:
1) सीएनजी फिलर व्हॉल्व चे कव्हर (2) पूर्ण बंद होईपर्यंत घड्याळाच्या उलट दिशेने फिरवा.
2) सीएनजी फिलरचे दार (1) बंद करा.

*टीप:*
- *सीएनजी फिलरचे कव्हर (2) व्यवस्थित बंद झाले नसेल तर तुम्ही वाहन सुरु करु शकणार नाही.*
- *वाहन जागेवर उभे असताना सीएनजी फिलरचे कव्हर (2) उघडल्यास इंजिन बंद होईल.*

*टीप:*
*वाहन सुरु असताना सीएनजी फिलर बॉक्समध्ये धुळीचे कण आत येऊ शकतात. ते जेव्हा कधी दिसतील तेव्हा साफ करा.*


### (पेट्रोल इंजिनच्या मॉडेलसाठी)

**पेट्रोल फिलिंग कॅप**




77PM05002

फ्युएल फिलर कॅप ही वाहनाच्या उजव्या बाजूला असते.




68KN048

फ्युएल फिलर कॅप काढण्यासाठी घड्याळाच्या उलट दिशेने फिरवा. फ्युएल फिलर कॅप परत बसवण्यासाठी तुम्हाला काही वेळा क्लिक असे आवाज ऐकू येईपर्यंत ती घड्याळाच्या दिशेने फिरवा.

**⚠ सावधानीचा इशारा**

**फ्युएल फिलर कॅप सावकाश उघडा. इंधन हवेच्या दाबाखाली असू शकते आणि त्याचा फवारा बाहेर येऊन दुखापत होऊ शकते.**

**⚠ इशारा**


**इंधन अत्यंत ज्वलनशील असते. टाकीत इंधन भरताना धूम्रपान करु नका, आणि आसपासच्या भागात कुठेही उघड्या ज्वाला किंवा ठिणग्या नसल्याची खात्री करा.**

**⚠ इशारा**

**फ्युएल कॅप बदलावी लागणार असल्यास मारुती सुझुकीची खरी कॅप बसवा. अयोग्य कॅप वापरल्यास फ्युएल सिस्टिम किंवा एमिशन कंट्रोल सिस्टिममध्ये बिघाड होऊ शकतो. तसेच अपघात झाल्यास इंधनाची गळतीही होऊ शकते.**


### (डिझेल इंजिनच्या मॉडेलसाठी)

**डिझेल फिलिंग कॅप**




77PH031

फ्युएल फिलर कॅप ही वाहनाच्या उजव्या बाजूला असते.




68KN048

फ्युएल फिलर कॅप काढण्यासाठी घड्याळाच्या उलट दिशेने फिरवा. फ्युएल फिलर कॅप परत बसवण्यासाठी तुम्हाला काही वेळा क्लिक असे आवाज ऐकू येईपर्यंत ती घड्याळाच्या दिशेने फिरवा.

**⚠ सावधानीचा इशारा**

**फ्युएल फिलर कॅप सावकाश उघडा. इंधन हवेच्या दाबाखाली असू शकते आणि त्याचा फवारा बाहेर येऊन दुखापत होऊ शकते.**


**⚠ इशारा**

**इंधन अत्यंत ज्वलनशील असते. टाकीत इंधन भरताना धूम्रपान करु नका, आणि आसपासच्या भागात कुठेही उघड्या ज्वाला किंवा ठिणग्या नसल्याची खात्री करा.**

**⚠ इशारा**

**फ्युएल कॅप बदलावी लागणार असल्यास मारुती सुझुकीची खरी कॅप बसवा. अयोग्य कॅप वापरल्यास फ्युएल सिस्टिम किंवा एमिशन कंट्रोल सिस्टिममध्ये बिघाड होऊ शकतो. तसेच अपघात झाल्यास इंधनाची गळतीही होऊ शकते.**

## इंजिन कंपार्टमेंट




77PH094

इंजिन कंपार्टमेंट उघडण्यासाठी:
1) ड्रायव्हरच्या सीट बेल्टचे बकल (1) सीटबॅक स्थितीला वर घ्या. प्रवाशाच्या सीट बेल्टचे बकल (2) ठेवून द्या.
2) ड्रायव्हरच्या सीटसाठी, सीट जास्तीत जास्त मागच्या दिशेला सरकवा.

**⚠ सावधानीचा इशारा**

**ड्रायव्हरचे सीट पाठीमागे सरकवल्यानंतर सीटबॅक (सीटची पाठ) मागे दाबा.**

**तुम्ही जर सीटच्या पाठीचा वरचा भाग धरला, तर तुमचा हात सीटची पाठ आणि केबिनचे मागचे पॅनेल यांच्यामध्ये सापडून तुम्हाला दुखापत होऊ शकते.**




77PH093

3) ड्रायव्हरच्या सीटसाठी, लॉक लिव्हर (3) ओढा आणि सीटची पाठ पुढे पडू द्या.

*टीप:*
*सीटची पाठ ही फक्त स्टीअरिंग व्हीलला टेकेपर्यंतच पुढे पाडता येते.*


4) प्रत्येक सीटच्या पुढच्या बाजूच्या टोकाला असलेली लॉक हँडल्स (4) हूकमधून काढा.




77PH081


- लॉक हँडल हूकमधून काढण्यासाठी “PULL” हा भाग (5) ओढा आणि रिंग (7) हूकमधून (8) काढा.
- लॉक हँडल लॉक करण्यासाठी रिंग (7) हूकवर ठेवा (8) आणि “PUSH” हा भाग (6) दाबा.

**ड्रायव्हरची बाजू**




77PH102

**प्रवाशाची बाजू**




77PH103


*टीप:*
*स्ट्रॅप्स (11) प्रवाशाच्या सीटच्या पाठीच्या मागे उपलब्ध असतात.*

5) सीट वर करा आणि स्ट्रॅप (11) हकला अडकवा (9). हा हक (10) सीट स्ट्रॅप लावण्यसाठी वापरला जात नाही.

## सूचना

**स्ट्रॅप हा ड्रायव्हरच्या सीट पोझिशन ॲडजस्टमेंटला अडकवू नका किंवा सीट्स स्ट्रॅप्समध्ये अडकली जाताना नको इतका जोर सीट्सवर देऊ नका. असे केल्यास स्ट्रॅप्स, हुक्स आणि/किंवा ड्रायव्हरची सीट पोझिशन ॲडजस्टमेंट तुटू शकते.**

- इंजिन कंपार्टमेंट बंद करण्यासाठी तुम्ही ती जशी उघडली, त्याच्या उलटी पद्धत वापरा.
- बंद केल्यानंतर सीट्स जागेवर व्यवस्थित बसली असल्याच्या खात्रीसाठी ती हलवण्याचा प्रयत्न करा.
- चित्रात दाखवल्यानुसार स्ट्रॅप्स प्रवाशाच्या सीटच्या मागे ठेवून द्या.




77PH097


## ⚠ इशारा

**स्ट्रॅप्स प्रवाशाच्या सीटच्या मागे असलेल्या जागेत ठेवून द्या. एखाद्या प्रवाशाचे शरीर स्ट्रॅप्समध्ये अडकले, तर श्वास गुदमरण्यासारख्या गंभीर दुखापतीची शक्यता आहे. असे झाल्यास स्ट्रॅप्स कात्रीने कापून टाका.**

## ⚠ सावधानीचा इशारा

**इंजिन कंपार्टमेंट बंद करताना सीट्समध्ये तुमचा हात किंवा ड्रायव्हरच्या सीट बेल्टचे बकल अडकणार नाही, किंवा ती तुमच्या अंगावर आपटणार नाहीत याची काळजी घ्या.**

## सन व्हायजर





77PH004

सन व्हायजर वाहनाच्या ड्रायव्हरच्या बाजूला उपलब्ध आहे. सन व्हायजर हा विंडशील्डमधून येणारा सूर्यप्रकाश अडवण्यासाठी खाली ओढता येऊ शकतो, किंवा सोडवून बाजूला वळवून, बाजूच्या खिडकीतून येणारा सूर्यप्रकाश अडवण्यासाठी वापरता येऊ शकतो.

**सूचना**

**सन व्हायजर सोडवताना आणि जागेवर परत लावताना तो त्याच्या बाजूला धरुन हाताळण्याची खात्री करा, नाही तर त्याचे नुकसान होऊ शकते.**

## वाहनातील लाइट





77PH074

वाहनाच्या आतील बाजूच्या या लाइटच्या स्विचला दोन स्थिती आहेत. नॉब (3) वापरुन त्या निवडता येतील. या स्थितींची कार्ये अशी आहेत:

**चालू (1)**
लाइट लागतो आणि लागलेला राहतो.

**बंद (2)**
लाइट बंद राहतो.

## ऍक्सेसरी सॉकेट





77PH044

ऍक्सेसरी सॉकेट हे इग्निशन स्विच “ACC” किंवा “ON” या स्थितीला असताना काम करते. हे सॉकेट इलेक्ट्रिकल ऍक्सेसरीजसाठी 12 व्होल्ट/120 वॅट पॉवर पुरवण्यासाठी वापरता येते.

**सूचना**

**अयोग्य इलेक्ट्रिक ऍक्सेसरीजच्या वापरामुळे तुमच्या वाहनाच्या इलेक्ट्रिक सिस्टिमचे नुकसान होऊ शकते. तुम्ही वापरत असलेल्या इलेक्ट्रिक ऍक्सेसरीज या प्रकारच्या सॉकेटमध्ये जोडण्यासाठी योग्य असल्याची खात्री करा.**

## ग्लोव्ह बॉक्स





77PH045

ग्लोव्ह बॉक्स उघडण्यासाठी नॉब घड्याळाच्या काट्याच्या उलट दिशेने फिरवा. ती बंद करण्यासाठी झाकण व्यवस्थित बसेपर्यंत दाबा. ग्लोव्ह बॉक्स लॉक करण्यासाठी चावी नॉबमध्ये सरकवून घड्याळाच्या काट्याच्या दिशेने फिरवा. ग्लोव्ह बॉक्स अनलॉक करण्यासाठी चावी नॉबमध्ये सरकवून घड्याळाच्या काट्याच्या उलट दिशेने फिरवा.

**⚠ इशारा**

**ग्लोव्ह बॉक्सचे झाकण उघडे असताना कधीही वाहन चालवू नका. अपघात झाल्यास त्यामुळे दुखापत होऊ शकते.**

## सामान ठेवण्याची जागा




77PH104


(1) इन्स्ट्रुमेंट पॅनेल पॉकेट (ड्रायव्हरच्या बाजूला)
(2) इन्स्ट्रुमेंट पॅनेल ट्रे (मध्यभागी) / इन्स्ट्रुमेंट पॅनेल पॉकेट (मध्यभागी)
(3) इन्स्ट्रुमेंट पॅनेल ट्रे (प्रवाशाच्या बाजूला)
(4) सेंटर पॉकेट

### इन्स्ट्रुमेंट पॅनेल पॉकेट (1)/(2) / इन्स्ट्रुमेंट पॅनेल ट्रे (2)/(3) / सेंटर पॉकेट (4)

**⚠ इशारा**

**वाहन चालू असताना ज्या पॉकेट/ट्रे मधून बाहेर पडू शकतील अशा कोणत्याही वस्तू ठेवू नका.**
**ही खबरदारी घेतली नाही तर एखादी वस्तू पेडल्समध्ये अडकून वाहनावरचा ताबा जाऊ शकतो किंवा अपघात होऊ शकतो.**

## एअर व्हेंट





77PM502

वाहनाच्या ड्रायव्हरच्या आणि प्रवाशाच्या, अशा दोन्ही बाजूंना एअर व्हेंट्स असतात. एअर व्हेंट उघडणे किंवा बंद करण्यासाठी, फ्लॅप (2) उघडण्यासाठी किंवा बंद करण्यासाठी नॉब (1) उभ्या दिशेने वर-खाली करा. "उघडे" असताना बाहेरुन ताजी हवा केबिनमध्ये येईल.

## फ्रेम हूक

### पुढील




77PH035

वाहनाच्या पुढच्या बाजूला असलेला फ्रेम हूक (1) फक्त संकटकाळी आणि शिपिंगसाठीच वापरण्यासाठी आहे.

रस्त्यावर किंवा हायवेवर तुमचे वाहन ओढून नेण्यासाठी "संकटकालीन सेवा" भागातील "टोइंग" मधील सूचनांचे पालन करा.

**⚠ इशारा**

**फ्रेम हूकचा वापर रस्त्यावर किंवा हायवेवर दुसरे वाहन ओढून नेण्यासाठी किंवा तुमचे वाहन ओढून नेण्यासाठी करु नका.**


**हा हूक (1) फक्त संकटकाळात वापरण्यासाठी दिलेला आहे, जसे तुमचे किंवा दुसरे वाहन चिखल किंवा हिमामध्ये खोल रुतून बसले, तर.**

***सूचना***

**फ्रेम हूकचा (1) वापर करताना ज्यामुळे हूकला मोठे धक्के बसतील अशा रीतीने वाहन चालवण्याचे टाळा. अशामुळे हूक किंवा वाहनाच्या बॉडीचे नुकसान होऊ शकते.**

**अचानक वेग वाढवू नका.**

## असिस्ट ग्रिप




77PM501

असिस्ट ग्रिप्स (1) वाहनाच्या ड्रायव्हरच्या आणि प्रवाशाच्या, अशा दोन्ही बाजूंना उपलब्ध आहेत. असिस्ट ग्रिप्स या वाहन चालक/प्रवासी अशा दोघांना वाहनात चढणे उतरणे सोपे जावे यासाठी आहेत.

# वाहनात माल भरणे आणि ट्रेलर  ओढून नेणे

वाहनात माल भरणे ........................................................................ 6-1
ट्रेलर  ओढून नेणे ........................................................................ 6-1

## वाहनात माल भरणे

तुमच्या वाहनाची रचना विशिष्ट वजने वाहून नेण्याच्या क्षमतांसाठी करण्यात आली आहे. तुमच्या वाहनाच्या वजन वाहून नेण्याच्या क्षमता ग्रॉस व्हेईकल वेट रेटिंग (जीव्हीडब्ल्यूआर) आणि पर्मिसिबल मॅक्सिमम ऍक्सल वेट (पीएडब्ल्यू, फ्रंट ऍंड रिअर) या दोन्हीद्वारे दाखवल्या आहेत. जीव्हीडब्ल्यूआर आणि पीएडब्ल्यू (फ्रंट ऍंड रिअर) हे “विनिर्देशने ” भागात दिले आहेत.

जीव्हीडब्ल्यूआर – संपूर्ण क्षमतेपर्यंत माल भरलेल्या वाहनाचे अधिकतम परवानगी असलेले वजन (आतील सर्व व्यक्ती, ऍक्सेसरीज आणि माल, अधिक ट्रेलर नोजचे वजन, ट्रेलर ओढून नेत असल्यास, यांच्यासहित).

पीएडब्ल्यू – (फ्रंट ऍंड रिअर) प्रत्येक ऍक्सलवरचे अधिकतम परवानगी असलेले वजन.

माल भरलेल्या वाहनाचे प्रत्यक्ष वजन आणि पुढच्या व मागच्या ऍक्सलवरील वजन हे फक्त वाहनाचे वजन करुनच ठरवता येऊ शकते. या वजनांची तुलना जीव्हीडब्ल्यूआर आणि पीएडब्ल्यू (फ्रंट ऍंड रिअर) यांच्याशी करा. जर वाहनाचे ढोबळ वजन किंवा कोणत्याही ऍक्सलवरील वजन या रेटिंग्जपेक्षा जास्त असेल, तर तुम्ही पुरेसे वजन काढून टाकून ते संबंधित क्षमतेच्या इतके केले पाहिजे.

**⚠ इशारा**

**तुमच्या वाहनात कधीही क्षमतेहून जास्त वजन भरु नका. वाहनाचे ढोबळ वजन (वाहनाचे वजन, सर्व प्रवाशांचे वजन, ऍक्सेसरीजचे वजन, मालाचे वजन अधिक ट्रेलर नोजचे वजन, ट्रेलर ओढून नेत असल्यास, या सर्वांची एकत्रित बेरीज) कधीही ग्रॉस व्हेईकल वेट रेटिंग (जीव्हीडब्ल्यूआर) पेक्षा जास्त होता कामा नये. तसेच वजन अशा रीतीने विखरु नका की ज्यामुळे पुढच्या किंवा मागच्या ऍक्सलवरील वजन पर्मिसिबल मॅक्सिमम ऍक्सल वेट (पीएडब्ल्यू) पेक्षा जास्त होईल.**

**⚠ इशारा**

**नेहमी माल सर्वत्र समान वजन असेल अशा रीतीने ठेवा. व्यक्तिगत दुखापत किंवा तुमच्या वाहनाचे नुकसान टाळण्यासाठी नेहमी माल बांधून ठेवा, म्हणजे तो वाहन अचानक हलले तर जागा सोडणार नाही. जड वस्तू खाली आणि माल ठेवण्याच्या जागेत शक्य तितक्या पुढे ठेवा. मालाची उंची सीटच्या पाठीपेक्षा जास्त होईल अशा रीतीने तो रचू नका.**


## ट्रेलर ओढून नेणे

तुमच्या वाहनाची रचना मुळात एक ड्रायव्हर, एक प्रवासी आणि विशिष्ट प्रमाणात माल नेण्यासाठी केली होती, ट्रेलर ओढून नेण्यासाठी नाही. मारुती सुझुकी, तुम्ही तुमच्या वाहनाचा वापर ट्रेलर ओढून नेण्यासाठी करावा अशी शिफारस करत नाही. ट्रेलर ओढून नेण्यामुळे वाहनाची हाताळणी, टिकाऊपणा आणि इंधन बचत यावर अनिष्ट परिणाम होऊ शकतो.

# तपासणी आणि देखभाल


देखभालीचे वेळापत्रक ........ 7-1
ठराविक कालावधीनंतर करण्याच्या देखभालीचे वेळापत्रक ........ 7-2
ग्राहकाने करण्याची तपासणी आणि देखभाल कार्ये ........ 7-6
ड्राइव्ह बेल्ट ........ 7-8
इंजिन ऑईल आणि फिल्टर ........ 7-8
इंजिन कूलंट ........ 7-13
एअर क्लीनर ........ 7-14
स्पार्क प्लग्ज ........ 7-15
गिअर ऑईल ........ 7-16
क्लच पेडल ........ 7-17
फ्युएल फिल्टर (असल्यास) ........ 7-18
ब्रेक्स ........ 7-18
स्टीअरिंग ........ 7-20
प्रॉपेलर शाफ्ट युनिव्हर्सल जॉइंट ........ 7-20
टायर्स ........ 7-21
बॅटरी ........ 7-22
फ्युजेस ........ 7-23
बल्ब बदलणे ........ 7-26
वायपर ब्लेड्स ........ 7-28
विंडशील्ड वॉशर फ्लुइड (असल्यास) ........ 7-30

उदाहरण



77PM07008

**⚠ इशारा**

**तुमच्या वाहनावर कार्य करताना अचानक दुखापत टाळण्यासाठी तुम्ही अतिशय काळजी घेतली पाहिजे. येथे काही विशेष खबरदार्या दिल्या आहेत, ज्या तुम्ही विशेष काळजीपूर्वक पाळल्या पाहिजेत:**

- **गॅरेज किंवा इतर बंदिस्त जागांमध्ये इंजिन चालू ठेवू नका.**
- **इंजिन चालू असताना तुमचे हात, कपडे, उपकरणे आणि इतर वस्तू इंजिनच्या फॅन आणि ड्राइव्ह बेल्टपासून दूर ठेवा. जरी फॅन चालू नसला, तरी तो कधीही अचानक सुरु होऊ शकतो.**

(पुढे चालू)

**⚠ इशारा**

(पुढे चालू)

- **जेव्हा इंजिन चालू स्थितीत असताना सर्व्हिसिंगचे कार्य करणे आवश्यक असते, तेव्हा पार्किंग ब्रेक पूर्णपणे लावल्याची आणि ट्रान्समिशन न्यूट्रलमध्ये असल्याची खात्री करा.**
- **इंजिन सुरु करताना किंवा सुरु असताना इग्निशन वायर्स किंवा इग्निशन सिस्टिमच्या इतर भागांना स्पर्श करु नका, नाही तर तुम्हाला विजेचा धक्का बसू शकतो.**
- **गरम इंजिन, एक्झॉस्ट मॅनिफोल्ड आणि पाईप्स, मफलर, रेडिएटर आणि पाण्याच्या होजेसना स्पर्श न होईल याची काळजी घ्या.**
- **इंधन किंवा बॅटरीच्या आसपास धूम्रपानाला परवानगी देऊ नका, ठिणग्या किंवा ज्वाळा येऊ देऊ नका. येथे ज्वालाग्राही वाफा असतात.**
- **तुमचे वाहन जर बरोबर दिलेल्या पोर्टेबल जॅकवरच उभे असेल, तर त्याच्या खालच्या बाजूला जाऊ नका.**
- **बॅटरीच्या पॉझिटिव्ह आणि निगेटिव्ह टर्मिनल्समध्ये चुकून शॉर्ट सर्किट्स होणार नाहीत याची काळजी घ्या.**
- **वापरलेले ऑईल, कूलंट आणि इतर फ्लुइड्स लहान मुले आणि पाळीव प्राण्यांपासून दूर ठेवा. वापरलेल्या बॅटरी फ्लुइड्सची व्यवस्थित विल्हेवाट लावा; ती कधीही जमिनीवर किंवा गटारात इ. टाकून देऊ नका.**

## देखभालीचे वेळापत्र

खालील तालिकेमध्ये, तुम्ही तुमच्या वाहनाची नित्याची देखभाल केव्हा करावी याच्या वेळा दिल्या आहेत. तुम्ही केव्हा तपासण्या, ॲडजस्टमेंट्स, लुब्रिकेशन आणि इतर सर्व्हिसिंग करुन घ्यायची याचे किलोमीटर आणि महिने तालिकेत दिले आहेत.

**⚠ इशारा**

**मारुती सुझुकी शिफारस करते की तुमच्या वाहनाची देखभाल तुमच्या अधिकृत मारुती सुझुकी कमर्शियल वर्कशॉपने करावी.**

***सूचना***

**तुमच्या वाहनातील भाग बदलण्याची जेव्हा कधी गरज भासेल, तेव्हा प्रत्येक वेळी तुम्ही मारुतीचे खरे भाग किंवा त्यांच्याशी समान भाग वापरावे अशी शिफारस केली जाते.**

## ठराविक कालावधीनंतर करण्याच्य देखभालीचे वेळापत्रक

**"C": साफ करणे**
**"R": बदलून त्या जागी नवीन वापरणे**
**"I": आवश्यकतेनुसार तपासणे, साफ करणे, ॲडजस्ट करणे, किंवा बदलणे**
**"L": लुब्रिकेट करणे**
**"T": विनिर्देशित टॉर्कला घट्ट करणे**
**"O": फिरवणे**

*टीप:*
*या तालिकेत 90,000 किमी प्रवासापर्यंत वेळापत्रकानुसार करण्याच्या सेवा आहेत. 90,000 किमी नंतर याच सेवा त्याच कालावधींनी करत जा.*

| कालावधी: हा कालावधी ओडोमीटरवरील आकडे किंवा महिना, यापैकी जे आधी होईल ते, यानुसार ठरवावा. | | | मोफत तपासणी | | | | ठराविक कालावधीनंतर करण्याची देखभाल स्वखर्चाने | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | किमी (x1000) | 5 | 10 | 20 | 30 | 40 | 50 | 60 | 70 | 80 | 90 |
| | | महिने | 2 | 4 | 8 | 12 | 16 | 20 | 24 | 28 | 32 | 36 |
| **इंजिन** | | | | | | | | | | | | |
| 1-1. | वॉटर पंप ड्राइव्ह, अल्टर्नेटर बेल्ट (ताण, झीज) | | – | – | – | – | I | – | – | – | R | – |
| 1-2. | इंजिन कूलंट (पातळी, गळती) | | I | I | R | I | R | I | R | I | R | I |
| 1-3. | इंजिन ऑईल आणि इंजिन ऑईल फिल्टर | | – | R | R | R | R | R | R | R | R | R |
| 1-4. | कूलिंग सिस्टिम होजेस आणि कनेक्शन्स (ढिले होणे, नुकसानी) | | I | I | I | I | I | I | I | I | I | I |
| 1-5. | इंजिन सिलिंडर हेड कव्हर बोल्ट्स (ढिले होणे, नुकसानी) | | – | T | T | T | T | T | T | T | T | T |
| 1-6. | इंजिन माउंटिंग आणि मॅनिफोल्ड फिक्सिंग (ढिले होणे, नुकसानी) | | I | I | I | I | I | I | I | I | I | I |
| 1-7. | व्हॉल्व क्लिअरन्स | | – | – | – | I | – | – | I | – | – | I |
| 1-8. | एक्झॉस्ट सिस्टिम (आवाज, गळती किंवा इतर दोष) | | I | – | I | – | I | – | I | – | I | – |
| 1-9. | पॉझिटिव्ह क्रँक केस व्हेंटिलेशन सिस्टिम | (पेट्रोल आणि बाय-फ्युएल) | I | – | I | – | I | – | I | – | I | – |
| 1-10. | एक्झॉस्ट गॅस रिसर्क्युलेशन व्हॉल्व | | – | – | – | C | – | – | C | – | – | C |
| **इग्निशन** | | | | | | | | | | | | |
| 2-1. | इग्निशन वायर (नुकसान, झीज) | (पेट्रोल आणि बाय-फ्युएल) | – | – | I | – | I | – | I | – | I | – |
| 2-2. | स्पार्क प्लग | (पेट्रोल आणि बाय-फ्युएल) | – | I | R | I | R | I | R | I | R | I |
| **फ्युएल** | | | | | | | | | | | | |
| 3-1. | एअर क्लीनर फिल्टर एलिमेंट | चांगला रस्ता | दर 5,000 किमी. ने साफ करा. दर 40,000 किमी नंतर बदला. | | | | | | | | | |
| | | धुळीची परिस्थिती | दर 2,500 किमी. ने साफ करा. दर 40,000 किमी नंतर बदला.<br>परिस्थिती फारच खराब असल्यास अधिक वारंवार बदलणे. | | | | | | | | | |
| 3-2. | फ्युएल टँक कॅप, फ्युएल लाईन्स आणि कनेक्शन्स (गळती आणि नुकसान) | | I | – | – | – | I | – | – | – | I | – |
| 3-3. | फ्युएल फिल्टर आणि वॉटर ड्रेनिंग | डिझेल | I | I | R | I | R | I | R | I | R | I |
| 3-4. | फ्युएल फिल्टर (गळती) | (पेट्रोल आणि बाय-फ्युएल) | I | I | I | I | R | I | I | I | R | I |
| 3-5. | सीएनजी फ्युएल लाईन जॉइंट्स (गॅस गळती) | (बाय-फ्युएल) | I | I | I | I | I | I | I | I | I | I |
| 3-6. | सीएनजी लो प्रेशर फिल्टर कार्ट्रिज, ओ-रिंग सह | (बाय-फ्युएल) | – | – | R | – | R | – | R | – | R | – |
| 3-7. | सीएनजी सिलिंडर गळतीची चाचणी आणि प्रमाणीकरण | (बाय-फ्युएल) | शासनमान्य चाचणी संस्थेद्वारे प्रारंभिक चाचणीच्या दिनांकानंतर दर 3 वर्षांनी | | | | | | | | | |
| 3-8. | सीएनजी फिलर रिसेप्टॅकल ओ-रिंग | (बाय-फ्युएल) | दर 4 वर्षे किंवा 300,000 किमी, यापैकी जे आधी होईल तेव्हा बदला | | | | | | | | | |

| कालावधी: हा कालावधी ओडोमीटरवरील आकडे किंवा महिना, यापैकी जे आधी होईल ते, यानुसार ठरवावा. | | मोफत तपासणी | | | | ठराविक कालावधीनंतर करण्याची देखभाल स्वखर्चाने | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | किमी (x1000) | 5 | 10 | 20 | 30 | 40 | 50 | 60 | 70 | 80 | 90 |
| | महिने | 2 | 4 | 8 | 12 | 16 | 20 | 24 | 28 | 32 | 36 |
| **क्लच आणि ट्रान्समिशन** | | | | | | | | | | | |
| 4-1. | क्लच पेडल (प्ले) | I | I | I | I | I | I | I | I | I | I |
| 4-2. | क्लच स्लिपिंग (ड्रॅग करणे किंवा अतिरिक्त नुकसान) | I | I | I | I | I | I | I | I | I | I |
| 4-3. | गिअर शिफ्टर (कार्य) | I | I | I | I | I | I | I | I | I | I |
| 4-4. | मॅन्युअल ट्रान्समिशन ऑईल (पातळी, गळती) | 1,60,000 किमी किंवा 10 वर्षे यापैकी जे आधी होईल तेव्हा बदला | | | | | | | | | |
| | | I | I | I | I | I | I | I | I | I | I |
| 4-5. | रिअर डिफरन्शियल ऑईल (पातळी, गळती) | 80,000 किमी किंवा 4 वर्षे यापैकी जे आधी होईल तेव्हा बदला | | | | | | | | | |
| | | I | I | I | I | I | I | I | I | I | I |
| 4-6. | प्रॉपेलर शाफ्ट/युनिव्हर्सल जॉइंट (ढिले, नुकसानी) | I | I&L | I&L | I&L | I&L | I&L | I&L | I&L | I&L | I&L |
| **ब्रेक** | | | | | | | | | | | |
| 5-1. | ब्रेक फ्लुइड (पातळी, गळती) | I | I | R | I | R | I | R | I | R | I |
| 5-2. | ब्रेक पेडल (पेडल – फ्रंट पॅनेल क्लिअरन्स) | I | I | I | I | I | I | I | I | I | I |
| 5-3. | पार्किंग ब्रेक लिव्हर आणि केबल (प्ले, नुकसान) | I | I | I | I | I | I | I | I | I | I |
| 5-4. | ब्रेक डिस्क आणि पॅड (झीज) | I | I | I | I | I | I | I | I | I | I |
| 5-5. | ब्रेक ड्रम आणि शूज (झीज) | – | I | I | I | I | I | I | I | I | I |
| 5-6. | मास्टर सिलिंडर, व्हील सिलिंडर आणि कॅलिपर पिस्टन (फ्लुइडची गळती, बूट/सीलचे नुकसान) | I | I | I | I | I | I | I | I | I | I |
| 5-7. | ब्रेक होजेस आणि पाईप्स (गळती, नुकसान) | I | I | I | I | I | I | I | I | I | I |
| **चाक** | | | | | | | | | | | |
| 6-1. | टायर्स (हवेचे प्रेशर, असामान्य झीज, फटी आणि रोटेशन) | I&O | I&O | I&O | I&O | I&O | I&O | I&O | I&O | I&O | I&O |
| 6-2. | चाके (नुकसान) | I | I | I | I | I | I | I | I | I | I |
| 6-3. | फ्रंट/रिअर व्हील बेअरिंग (ढिले, नुकसान) | I | I | I | I | I | I | I | I | I | I |
| **फ्रंट/रिअर सस्पेन्शन** | | | | | | | | | | | |
| 7-1. | फ्रंट सस्पेन्शनचा स्ट्रट आणि शॉक ऍबसॉर्बर (ऑईल गळती, नुकसान) | I | I | I | I | I | I | I | I | I | I |
| 7-2. | फ्रंट सस्पेन्शन आर्म्स, नकल सपोर्ट आणि टेन्शन रॉड्स (ढिले, नुकसान) | I | I | I | I | I | I | I | I | I | I |
| 7-3. | रिअर लीफ स्प्रिंग (नुकसान) | I | I | I | I | I | I | I | I | I | I |
| 7-4. | रिअर शॉक ऍबसॉर्बर (ऑईल गळती, नुकसान) | I | I | I | I | I | I | I | I | I | I |
| 7-5. | सर्व बोल्ट्स आणि नट्स (ढिले) | T | T | T | T | T | T | T | T | T | T |

| कालावधी: हा कालावधी ओडोमीटरवरील आकडे किंवा महिना, यापैकी जे आधी होईल ते, यानुसार ठरवावा. | | | मोफत तपासणी | | | | ठराविक कालावधीनंतर करण्याची देखभाल स्वखर्चाने | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | किमी (x1000) | 5 | 10 | 20 | 30 | 40 | 50 | 60 | 70 | 80 | 90 |
| | | महिने | 2 | 4 | 8 | 12 | 16 | 20 | 24 | 28 | 32 | 36 |
| **स्टीअरिंग** | | | | | | | | | | | | |
| 8-1. | स्टीअरिंग व्हील (प्ले, ढिले) | | I | I | I | I | I | I | I | I | I | I |
| 8-2. | स्टीअरिंग कॉलम रॉड्स आणि आर्म्स (ढिले, नुकसान, झीज) | | I | I | I | I | I | I | I | I | I | I |
| **इलेक्ट्रिकल्स** | | | | | | | | | | | | |
| 9-1. | बॅटरी - इलेक्ट्रोलाईट (पातळी, गळती) आणि व्होल्टेज | | I | I | I | I | I | I | I | I | I | I |
| 9-2. | वायरिंग हार्नेस कनेक्शन (ढिले, नुकसान) | | I | I | I | I | I | I | I | I | I | I |
| 9-3. | लाइटिंग सिस्टिम (कार्य) | | I | I | I | I | I | I | I | I | I | I |
| 9-4. | वायपर (कार्य, डाग, नुकसान) | | I | I | I | I | I | I | I | I | I | I |
| 9-5. | हॉर्न (कार्य) | | I | I | I | I | I | I | I | I | I | I |
| 9-6. | ऍक्सेसरी सॉकेट (कार्य) | | I | I | I | I | I | I | I | I | I | I |
| **बॉडी** | | | | | | | | | | | | |
| 10-1. | सर्व चासी बोल्ट्स आणि नट्स (घट्ट करा) | | I | T | T | T | T | T | T | T | T | T |
| 10-2. | सर्व लॅचेस, हिंजेस आणि लॉक्स (कार्य) | | I&L | I&L | I&L | I&L | I&L | I&L | I&L | I&L | I&L | I&L |
| 10-3. | माल ठेवण्याची जागा (तपासणी करा) | | I | I | I | I | I | I | I | I | I | I |
| **रस्त्यावर चाचणी** | | | | | | | | | | | | |
| 11-1. | ब्रेक्स, गिअर शिफ्टिंग आणि स्पीडोमीटर | | I | I | I | I | I | I | I | I | I | I |
| 11-2. | बॉडी आणि चासीमधील आवाज | | I | I | I | I | I | I | I | I | I | I |

## ग्राहकाने करण्याची तपासणी व देखभालीची कार्ये

तुम्ही जी करु शकता अशी तपासणी व देखभालीची कामे खालील तालिकेत दिली आहेत.
या तालिकेत तुम्ही किती वारंवार तपासणी, ग्रीसिंग, लुब्रिकेशन आणि इतर सर्व्हिसिंग करावे हे दिले आहे.

| वारंवारता | अनु क्र. | कार्य | संदर्भ |
|---|---|---|---|
| दररोज | 1 | हवेचे प्रेशर, असामान्य झीज, फटी आणि नुकसान यासाठी सर्व टायर्स तपासा (जादा चाकासहित). | पान क्र. 7-21 |
| साप्ताहिक | 2 | इंजिन ऑईलची पातळी तपासा, गरज असल्यास मारुतीचे खरे डिझेल ऑईल घाला. | पान क्र. 7-9 |
| | 3 | कूलंटच्या टाकीतील कूलंटची पातळी तपासा आणि गरज असल्यास शिफारस केलेले मारुतीचे खरे कूलंट आणि डिस्टिल्ड वॉटर 30/70 या विनिर्देशित प्रमाणात घाला. | पान क्र. 7-13 |
| | 4 | ट्रान्समिशन ऑईलची आणि डिफरन्शियल ऑईलची पातळी तपासा. | पान क्र. 7-13 |
| | 5 | ब्रेक फ्लुइडच्या टाकीतील ब्रेक फ्लुइडची पातळी तपासा आणि गरज असल्यास मारुतीचे खरे ब्रेक फ्लुइड घाला. | पान क्र. 7-18 |
| | 6 | वाहनाची यासाठी तपासणी करा<br>• इंजिन ऑईलची गळती<br>• कूलंटची गळती<br>• ब्रेक फ्लुइडची गळती<br>• फ्रंट सस्पेन्शन स्ट्रटची गळती<br>• रिअर शॉक ॲबसॉर्बरची गळती<br>• इंधनाची गळती<br>• ट्रान्समिशन ऑईलची आणि डिफरन्शियल ऑईलची गळती | तपासणी आणि देखभाल भाग |
| | 7 | बॅटरी इलेक्ट्रोलाईटची पातळी, टर्मिनल्स आणि ब्रॅकेट तपासा. | पान क्र. 7-23 |
| | 8 | व्हील माउंटिंगचे नट्स तपासा आणि गरज असल्यास घट्ट करा. | पान क्र. 8-5 |

| | | | |
|---|---|---|---|
| मासिक | 9 | ड्राइव्ह बेल्टची तपासणी नुकसान किंवा झीजेसाठी करा. | पान क्र. 7-8 |
| | 10 | एअर फिल्टर एलिमेंट साफ करा. | पान क्र. 7-14 |
| | 11 | सर्व लॅचेस, हिंजेस आणि लॉक्सचे मल्टिपर्पज ग्रीस वापरुन ग्रीसिंग करा. | पान क्र. 7-5 |
| | 12 | ग्रीस गनने प्रॉपेलर शाफ्ट युनिव्हर्सल जॉइंटचे ग्रीसिंग करा. | पान क्र. 7-20 |
| | 13 | पाणी आणि जमलेली माती काढून टाकण्यासाठी फ्युएल फिल्टरचा ड्रेन स्क्रू ढिला करा. | पान क्र. 7-18 |
| आवश्यक असेल तेव्हा | 14 | क्लच पेडलचा प्ले तपासा. | पान क्र. 7-17 |
| | 15 | इंजिन सुरु असताना ब्रेक्स लावून ब्रेक पेडल फ्लोअर पॅनेलपासून किती अंतरावर राहते हे तपासा. | पान क्र. 7-19 |
| | 16 | पार्किंग ब्रेकची ॲडजस्टमेंट बरोबर आहे का हे तपासा. | पान क्र. 7-20 |

*** वाहन जर एका बाजूला खेचत असले किंवा जास्त वेगात जाताना हादरत असले, तर व्हील अलाइनमेंट आणि बॅलन्सिंग तपासा आणि/किंवा ते ॲडजस्ट करा.**

## ड्राइव्ह बेल्ट

**⚠ इशारा**


**इंजिन चालू असताना चालत्या फॅन आणि ड्राइव्ह बेल्ट्सपासून हात, केस, कपडे, उपकरणे इ. दूर ठेवा.**

ड्राईव्ह बेल्टचे टेन्शन योग्य असल्याची खात्री करा. बेल्ट फार ढिला असेल तर बॅटरी अपुरी चार्ज होणे, इंजिन फार गरम होणे किंवा बेल्टची अधिक झीज या गोष्टी होऊ शकतात. तुम्ही जेव्हा दोन पुलींच्या मध्यभागी बेल्ट अंगठ्याने दाबाल, तेव्हा खालील कोष्टकानुसार डिफ़्लेक्शन दिसले पाहिजे.

तसेच बेल्ट्सचे नुकसान झालेले नाही याची खात्री करण्यासाठीही त्यांची तपासणी करावी.

तुम्हाला बेल्ट बदलायचा किंवा ऍडजस्ट करायचा असेल तर हे काम तुमच्या अधिकृत मारुती सुझुकी कमर्शियल वर्कशॉपमधून करुन घ्या.

**(पेट्रोल आणि द्वि-इंधन इंजिनच्या मॉडेलसाठी)**




77PM07001

**(डिझेल इंजिन मॉडेलसाठी)**

ड्राइव्ह बेल्ट्सचे टेन्शन आपोआप ऍडजस्ट होते.


तसेच बेल्ट्सचे नुकसान झालेले नाही याची खात्री करण्यासाठीही त्यांची तपासणी करावी.

तुम्हाला बेल्ट बदलायचा किंवा ऍडजस्ट करायचा असेल तर हे काम तुमच्या अधिकृत मारुती सुझुकी कमर्शियल वर्कशॉपमधून करुन घ्या.

## इंजिन ऑईल आणि फिल्टर

### विनिर्देशित ऑईल

**(पेट्रोल आणि द्वि-इंधन इंजिनच्या मॉडेलसाठी)**





77PM07002

(1) अधिक पसंतीचे

खात्री करा की तुम्ही वापरत असलेले इंजिन ऑईल एसजी+, एसएच, एसजे, एसएम किंवा एसएन या गुणवत्ता वर्गामधील आहे. वरील कोष्टकानुसार ऑईलचा योग्य चिकटपणा (व्हिस्कॉसिटी) निवडा. तुम्ही **SAE 5W-30** हे ऑईल वापरावे अशी जोरदार शिफारस करण्यात येते.

(डिझेल इंजिनच्या मॉडेलसाठी)




76MH024

(1) अधिक पसंतीचे

तुम्ही वापरत असलेले **5W-30** इंजिन ऑईल एसीईए ए5/बी5 या गुणवत्ता वर्गीकरणात येत असल्याची खात्री करा. वरील तक्त्यानुसार योग्य दाटपणा असलेले ऑईल वापरा.


## ऑईलच्या पातळीची तपासणी

**(पेट्रोल आणि द्वि-इंधन इंजिनच्या मॉडेलसाठी)**



77PM07023

**(डिझेल इंजिनच्या मॉडेलसाठी)**




77PH036

(1) इंजिन ऑईल डिपस्टिक

तुमच्या वाहनाच्या इंजिनच्या योग्य लुब्रिकेशनसाठी इंजिन ऑईलची पातळी बिनचूक ठेवणे महत्वाचे आहे. ऑईलची पातळी वाहन एखाद्या समतल जागी असताना तपासा. वाहन उतारावर असल्यास ऑईल पातळी चुकीची दिसू शकते. ऑईलची पातळी एक तर इंजिन सुरु करण्यापूर्वी किंवा इंजिन बंद केल्यावर किमान 5 मिनिटांनी तपासावी.

सहज ओळखता यावे म्हणून इंजिन ऑईलच्या डिपस्टिकचे हँडल पिवळ्या रंगाचे असते.



52D084

ऑईल डिपस्टिक बाहेर काढा, तिच्यावरचे ऑईल एका स्वच्छ फडक्याने पुसून काढा, डिपस्टिक इंजिनमध्ये पूर्णपणे घाला आणि परत बाहेर काढा. स्टिकवरचे ऑईल स्टिकवरच्या वरच्या आणि खालच्या मर्यादांच्या दरम्यान असले पाहिजे. ऑईलची पातळी खालची मर्यादा दाखवणार्या रेषेजवळ असेल, तर पुरेसे ऑईल घालून पातळी वरच्या मर्यादेपर्यंत आणा.

**सूचना**

**ऑईलची पातळी नियमितपणे न तपासल्यास ऑईल पुरेसे नसल्यामुळे इंजिनच्या अत्यंत गंभीर समस्या होऊ शकतात.**


**सूचना**

**ऑईल पातळी अधिकतम पातळीच्या वर जाऊ देऊ नका. अति जास्त ऑईलमुळेही इंजिनच्या अत्यंत गंभीर समस्या होऊ शकतात.**

### ऑईल भरणे

### (पेट्रोल आणि द्वि-इंधन इंजिनच्या मॉडेलसाठी)


**उदाहरण**



77PM07024

### (डिझेल इंजिनच्या मॉडेलसाठी)

**उदाहरण**



77PH037

ऑईल फिलर कॅप काढून फिलरच्या भोकामधून ऑईल भरा आणि त्याची पातळी डिपस्टिकवर वरच्या पातळीपर्यंत आणा. फार जास्त ऑईल भरले जाणार नाही याची काळजी घ्या. अति जास्त ऑईल हेसुद्धा जवळजवळ ऑईल नसण्याइतके वाईट असते. ऑईल भरल्यावर इंजिन सुरु करुन सुमारे एक मिनिट ते आयडलिंगवर ठेवा. इंजिन बंद करा, सुमारे 5 मिनिटे थांबा आणि ऑईलची पातळी पुन्हा पहा.

### ऑईल आणि फिल्टर बदलणे

इंजिन गरम असताना इंजिन ऑईल काढून टाका.


1) ऑईल फिलर कॅप काढा.
2) ड्रेन प्लगखाली ड्रेन पॅन ठेवा.
3) पकड घेऊन ड्रेन प्लग काढा आणि इंजिन ऑईल काढून टाका.

**⚠ सावधानीचा इशारा**

**ड्रेन प्लग ढिला करताना इंजिनचे तापमान तुमची बोटे भाजण्याइतके जास्त असू शकते. नुसत्या हातांनी ड्रेन प्लगला स्पर्श करण्याइतका तो थंड होईपर्यंत थांबा.**


### (पेट्रोल आणि द्वि-इंधन इंजिनच्या मॉडेलसाठी)

**उदाहरण**




77PM07007

**(डिझेल इंजिनच्या मॉडेलसाठी)**




77PH038

**ड्रेन प्लगसाठी घट्ट करण्याचा टॉर्क (1):**
**50 एनएम (5.1 केजीएफ-एम, 36.9 एलबीएफ-एफटी)**


**⚠ इशारा**

**नवीन आणि वापरलेले ऑईल अपायकारक असू शकते. लहान मुले आणि पाळीव प्राण्यांना नवीन आणि वापरलेले ऑईल गिळल्यामुळे अपाय होऊ शकतो. लहान मुले आणि पाळीव प्राण्यांपासून नवीन आणि वापरलेले ऑईल आणि वापरलेले ऑईल फिल्टर्स दूर ठेवा.**
**वापरलेल्या इंजिन ऑईलशी पुन्हा पुन्हा, दीर्घ काळ संपर्क आल्यास त्वचेचा कर्करोग होऊ शकतो.**
**वापरलेल्या इंजिन ऑईलशी अल्प काळ संपर्क आल्यास त्वचा चिडचिडी बनू शकते.**
**वापरलेल्या ऑईलशी कमीत कमी संपर्क यावा म्हणून ऑईल बदलताना पूर्ण बाह्यांचा शर्ट आणि न भिजणारे हातमोजे (डिशेस धुताना वापरतात तसे) वापरा. ऑईलचा त्वचेला स्पर्श झाला तर त्वचा साबण आणि पाण्याने स्वच्छ धुवून टाका.**
**ऑईलमध्ये ओले झालेले कोणतेही कपडे किंवा चिंध्या लॉंड्रीमध्ये धुण्यास द्या.**
**वापरलेले ऑईल आणि फिल्टर्सचा पुनर्वापर करा किंवा त्यांची व्यवस्थित विल्हेवाट लावा.**

4) ड्रेन प्लग आणि गास्केट परत बसवा. प्लग पकडीने विनिर्देशित टॉर्कपर्यंत घट्ट करा.

**ऑईल फिल्टर बदलणे**


1) ऑईल फिल्टरची पकड वापरुन ऑईल फिल्टर घड्याळाच्या काट्याच्या उलट दिशेने फिरवून काढा.
2) स्वच्छ चिंधी घेऊन इंजिनवरील माउंटिंग सरफेस साफ पुसून काढा, जेथे नवीन फिल्टर बसणार आहे.
3) नवीन ऑईल फिल्टरच्या रबर गास्केटच्या आसपास थोडे इंजिन ऑईल लावा.
4) फिल्टर गास्केटचा माउंटिंग सरफेसला स्पर्श होईपर्यंत नवीन फिल्टर हाताने फिरवून बसवा.




77PH017

(1) ढिला करा
(2) घट्ट करा

**घट्ट करणे (फिल्टरच्या वरच्या बाजूने दिसणारे दृश्य)**




(1) ऑईल फिल्टर
(2) 3/4 वळसा

**सूचना**

**ऑईल फिल्टर व्यवस्थित घट्ट करण्यासाठी, फिल्टर गास्केटचा माउंटिंग सरफेसशी प्रथम जेथे स्पर्श होईल, ती जागा अचूक ओळखणे महत्वाचे आहे.**

5) ऑईल फिल्टरची पकड वापरुन फिल्टर, माउंटिंग सरफेसशी जेथे स्पर्श झाला तेथपासून विनिर्देशित वळसे (किंवा विनिर्देशित टॉर्कपर्यंत) घट्ट करा.

**ऑईल फिल्टरसाठी घट्ट करण्याचा टॉर्क 3/4 वळसा किंवा**
**14 एनएम (1.4 केजीएफ-एम, 10.3 एलबीएफ-एफटी)**

**सूचना**

**ऑईल गळू नये म्हणून ऑईल फिल्टर घट्ट असल्याची खात्री करा, पण फार जास्त घट्ट करु नका.**

**ऑईल भरा आणि गळती नाही ना हे तपासा**

1) फिलरच्या भोकामधून ऑईल भरा आणि फिलर कॅप बसवा.
   ऑईलच्या अंदाजित क्षमतेसाठी “विनिर्देशने (स्पेसिफिकेशन्स) ” भागातील “क्षमता ” हा मुद्दा पहा.
2) इंजिन सुरु करुन ऑईल फिल्टर आणि ड्रेन प्लगमधून ऑईल गळत नाही ना हे काळजीपूर्वक पहा. किमान 5 मिनिटे इंजिन वेगवेगळ्या वेगांना चालवून पहा.
3) इंजिन बंद करुन 5 मिनिटे थांबा. पुन्हा एकदा ऑईलची पातळी तपासा आणि गरज असल्यास आणखी ऑईल भरा. ऑईल गळत नाही ना हे पुन्हा पहा.

**सूचना**

- **ऑईल फिल्टर बदलताना, तुम्ही मारुतीचा खरा ऑईल फिल्टर वापरावा अशी शिफारस करण्यात येते. तुम्ही दुसरा एखादा फिल्टर वापरल्यास त्याचा दर्जा समान असल्याची खात्री करा आणि निर्मात्याच्या सूचनांचे पालन करा.**
- **ऑईल फिल्टर किंवा ड्रेन प्लग जवळील भागामधून ऑईलची गळती होणे हे, हे भाग चुकीच्या पद्धतीने बसवल्याचे किंवा गास्केट खराब झाल्याचे लक्षण आहे. तुम्हाला काही गळती दिसली किंवा फिल्टर व्यवस्थित घट्ट बसवला असल्याची खात्री नसेल, तर तुमच्या अधिकृत मारुती सुझुकी कमर्शियल वर्कशॉपमधून वाहनाची तपासणी करुन घ्या.**

## इंजिन कूलंट

### कूलंटची निवड

तुमच्या इंजिनाचे कार्य व्यवस्थित चालण्यासाठी आणि टिकाऊपणा कायम राहण्यासाठी मारुतीचे खरे कूलंट किंवा तत्सम कूलंट वापरा.

या प्रकारचे कूलंट तुमच्या कूलिंग सिस्टिमसाठी सर्वोत्तम आहे, कारण ते:

- इंजिनचे तापमान योग्य राखण्यास मदत करते.
- गोठणे आणि उकळणे यांच्याविरुद्ध योग्य रक्षण पुरवते.
- करोजन आणि गंज यांच्याविरुद्ध योग्य रक्षण पुरवते.

योग्य कूलंट न वापरल्यास तुमच्या कूलिंग सिस्टिमची हानी होऊ शकते. तुमचे अधिकृत मारुती सुझुकी कमर्शियल वर्कशॉप तुम्हाला योग्य कूलंट निवडण्यासाठी मदत करु शकते.

**सूचना**

**तुमच्या कूलिंग सिस्टिमचे नुकसान टाळण्यासाठी :**

- **नेहमी उच्च दर्जाचे इथिलिन ग्लायकॉल बेस नॉन-सिलिकेट प्रकारचे कूलंट, त्यात योग्य प्रमाणात डिस्टिल्ड वॉटर मिसळून, योग्य संपृक्ततेचे मिश्रण करुन वापरा.**
- **योग्य मिश्रण हे 30/70 कूलंट-डिस्टिल्ड वॉटरचे असेल, आणि 70/30 पेक्षा जास्त प्रमाणात कधीच नसेल याची खात्री करा. 70/30 कूलंट-डिस्टिल्ड वॉटर पेक्षा जास्त संपृक्ततेची मिश्रणे असल्यास इंजिन फार गरम होऊ शकते.**
- **नुसते कूलंट किंवा नुसते पाणी कधीच वापरु नका.**
- **जादा इनहिबिटर्स किंवा ॲडिटिव्हज घालू नका. ते तुमच्या कूलिंग सिस्टिमला कदाचित योग्य नसतील.**
- **वेगवेगळ्या प्रकारचे बेस कूलंट्स एकत्र मिसळू नका. असे केल्यास सील लवकर झिजू शकेल आणि/किंवा इंजिन अत्यंत गरम होऊन इंजिनचे प्रचंड नुकसान होऊ शकेल.**

### कूलंटची पातळी तपासणे

कूलंटची पातळी रेडिएटरपाशी नाही, तर कूलंट टँकपाशी तपासा. इंजिन थंड असताना कूलंटची पातळी “पूर्ण ” आणि “कमी” या खुणांच्या दरम्यान असली पाहिजे. आवश्यक असेल तर हातात धरण्याचा लाइट वापरा.

### कूलंट ओतणे


**⚠ इशारा**

**इंजिन कूलंट गिळल्यास किंवा श्वासावाटे आत घेतल्यास अपायकारक किंवा प्राणघातकही असते. ॲंटिफ्रीझ किंवा कूलंटचे द्राव पिऊ नका. ते गिळल्यास उलटी काढू नका, त्वरित विषबाधा केंद्राशी किंवा डॉक्टराशी संपर्क साधा. त्याचे तुषार किंवा गरम वाफा श्वासावाटे आत घेण्याचे टाळा; श्वासावाटे आत गेल्यास मोकळ्या हवेत जा. कूलंट डोळ्यात गेल्यास डोळे भरपूर पाण्याने धुवा आणि वैद्यकीय मदत मागवा. हाताळणीनंतर हात स्वच्छ धुवा. हे द्रावण प्राण्यांसाठी विषारी असू शकते. लहान मुले आणि प्राण्यांपासून दूर ठेवा.**

**सूचना**


- **तुम्ही वापरलेल्या मिश्रणात 30% ॲंटिफ्रीझने संपृक्त द्राव असला पाहिजे.**
- **तुमच्या भागामधील किमान तापमान –35°C (–31°F) किंवा त्याहून खाली जाण्याची शक्यता असेल, तर ॲंटिफ्रीझच्या कंटेनरवरील सूचनांनुसार 60% पर्यंत अधिक संपृक्ततेच्या मिश्रणाचा वापर करा.**

**(पेट्रोल आणि द्वि-इंधन इंजिनच्या मॉडेलसाठी)**




77PM07010

**(डिझेल इंजिनच्या मॉडेलसाठी)**




77PH039

कूलंटची पातळी “L” (कमी) पातळीपेक्षा खाली असल्यास अधिक कूलंट ओतावे.
टँकची कॅप उघडून टँकची पातळी “F” (पूर्ण ) खुणेवर जाईपर्यंत कूलंट ओता. टँक कधीही “F” (पूर्ण ) खुणेपेक्षा जास्त भरु नका.


| सूचना |
| --- |
| **टँकवर कॅप परत बसवताना कॅपवरील खूण आणि टँकवरील खूण एका रेषेत आणा. असे न केल्यास कूलंटची गळती होऊ शकते.** |

**कूलंट बदलणे**
खास प्रक्रिया करण्याची गरज असल्यामुळे कूलंट बदलण्यासाठी तुमचे वाहन जवळच्या अधिकृत मारुती सुझुकी कमर्शियल वर्कशॉपमध्ये न्या.

## एअर क्लीनर


एअर क्लीनरमध्ये धूळ जमून तो बंद झाला असेल तर हवा आत येण्यासाठी जास्त विरोध होतो, त्यामुळे पॉवर आऊटपुट कमी होऊन इंधनाचा वापर वाढतो.

**(पेट्रोल आणि द्वि-इंधन इंजिनच्या मॉडेलसाठी)**





77PM07011

### (डिझेल इंजिनच्या मॉडेलसाठी)




77PH040

बाजूचे क्लॅम्प्स काढा आणि एअर क्लीनर केसमधून एलिमेंट बाहेर काढा.





60A183

एअर क्लीनर घाण दिसत असेल तर ठराविक काळाने करण्याच्या देखभाल वेळापत्रकानुसार तो साफ करा किंवा बदला.


## स्पार्क प्लग्ज

### (पेट्रोल आणि द्वि-इंधन इंजिनच्या मॉडेलसाठी)




77PM07003

तुम्ही ठराविक काळाने स्पार्क प्लग्ज तपासून कार्बन जमला आहे का, हे पाहिले पाहिजे. स्पार्क प्लगवर जेव्हा कार्बन जमतो, तेव्हा शक्तिशाली स्पार्क कधी कधी निर्माण होत नाही. एखाद्या वायर किंवा पिनच्या सहाय्याने कार्बन काढून टाका आणि स्पार्क प्लगची गॅप ॲडजस्ट करा.





77PM07004

स्पार्क प्लग्जची तपासणी करण्यासाठी

1. रिलीज लिव्हर दाबून कपलर डिस्कनेक्ट करा,
2. बोल्ट्स काढा, आणि
3. स्पार्क प्लग्जचे बूट ओढून काढा.

**सूचना**


- **स्पार्क प्लग्जच्या केबल्स डिस्कनेक्ट करताना बूट ओढा, प्रत्यक्ष ती केबल ओढू नका. केबल ओढल्यास ती खराब होऊ शकते.**




77PM07017

**सूचना**

- **स्पार्क प्लग्ज बसवताना त्यांचे थ्रेड्स खराब होऊ नयेत यासाठी ते तुमच्या बोटांनी फिरवून बसवा. स्पार्क प्लग्ज टॉक रेंचने 20.0 - 30.0 एनएम (2.0 - 3.0 किग्रॅ-मी, 15.0 - 22.0 पौंड-फूट) पर्यंत घट्ट करा. प्लग्ज काढले असताना स्पार्क प्लग होल्समधून इंजिनमध्ये कचरा जाऊ देऊ नका.**
- **अयोग्य थ्रेड साईजचे स्पार्क प्लग्ज कधीही वापरु नका.**




77PM07018

**स्पार्क प्लगची गॅप "क":**

**BOSCH-FR6DC**
**0.8 – 0.9 मिमी (0.031 – 0.035 इंच.)**

### *सूचना*


**स्पार्क प्लग्ज बदलताना तुम्ही तुमच्या वाहनासाठी विनिर्देशित केलेला स्पार्क प्लगचा ब्रँड आणि प्रकार वापरला पाहिजे. विनिर्देशित प्लग्जसाठी या पुस्तकाच्या शेवटचा "विनिर्देशने (स्पेसिफिकेशन्स) " हा भाग पहा. विनिर्देशित प्लग्जपेक्षा वेगळा स्पार्क प्लगचा ब्रँड वापरायचा असेल तर तुमच्या अधिकृत मारुती सुझुकी कमर्शियल वर्कशॉपचा सल्ला घ्या.**

## गिअर ऑईल

### मॅन्युअल ट्रान्समिशन ऑईल/डिफरन्शियल ऑईल

गिअर ऑईल घालत असताना खालील कोष्टकात दाखवल्यानुसार योग्य दाटपणाचे आणि ग्रेडचे गिअर ऑईल वापरा.


### मॅन्युअल ट्रान्समिशन ऑईल




68LM728

आम्ही जोरदार शिफारस करतो की:
मॅन्युअल ट्रान्समिशन गिअर ऑईलसाठी "मारुतीचे खरे गिअर ऑईल **75W-80**" वापरा.

### रिअर डिफरन्शियल ऑईल





77PH075

आम्ही जोरदार शिफारस करतो की:
रिअर डिफरन्शियल ऑईलसाठी
"टोटलफिनैल्फ ट्रांसेल्फ एलएल **85W-140**" वापरा.


### गिअर ऑईलची पातळी तपासणे

#### मॅन्युअल ट्रान्समिशन




77PH078

#### रिअर डिफरन्शियल




77PH047

1. ऑईल फिलर आणि लेव्हल प्लग (पुन्हा वापर करु नका).
2. ऑईल ड्रेन प्लग.

गिअर ऑईलची पातळी पाहण्यासाठी खालील पद्धत वापरा:

1) वाहन सपाट जमिनीवर उभे करा, पार्किंग ब्रेक लावा. नंतर इंजिन बंद करा.
2) ऑईल फिल्टर आणि लेव्हल प्लग (1) काढा.
3) भोकाची आतील बाजू बोटाने तपासून पहा. जर ऑईलची पातळी प्लग च्या भोकाच्या तळापर्यंत आली, तर ऑईलची पातळी बरोबर आहे. असे असल्यास प्लग लावून टाका.
4) ऑईलची पातळी खाली असली तर ऑईल फिलर प्लग होल (1) मधून, ऑईलची पातळी फिलरच्या भोकाच्या तळापर्यंत येईपर्यंत ऑईल भरा, नंतर प्लग लावून टाका.

**ऑईल फिलर आणि लेव्हल प्लग घट्ट करण्यासाठी टॉर्क**
**मॅन्युअल ट्रान्समिशन (1):**
**23 एनएम (2.3 केजीएफ-एम, 17.0 एलबीएफ-एफटी)**
**रिअर डिफरन्शियल (1):**
**25 एनएम (2.5 केजीएफ-एम, 18.5 एलबीएफ-एफटी)**

*टीप:*
*रिअर डिफरन्शियलसाठी नेहमी नवीन ऑईल फिलर आणि लेव्हल प्लग वापरा (1).*

**⚠ सावधानीचा इशारा**

**वाहन चालवल्यानंतर गिअर ऑईलचे तापमान तुमची त्वचा भाजण्याइतके जास्त असू शकते. ऑईल फिलर प्लगला तुम्ही नुसत्या हाताने स्पर्श करु शकाल, इतका ऑईल फिलर थंड होईपर्यंत थांबा, मगच गिअर ऑईलची पातळी तपासा.**

***सूचना***

**प्लग घट्ट करताना ऑईल गळू नये म्हणून प्लगला खालील सीलिंग कम्पाउंड किंवा तत्सम सीलिंग कम्पाउंड लावा.**


**मारुती सुझुकी बॉड नं. “1216E” किंवा “1217G”**

### गिअर ऑईल बदलणे

खास प्रक्रिया, वस्तू आणि साधने लागत असल्याने शिफारस करण्यात येते की हे काम तुम्ही तुमच्या अधिकृत मारुती सुझुकी कमर्शियल वर्कशॉपकडे सोपवावे.

## क्लच पेडल

### केबल कंट्रोल क्लच





54G274

**क्लच पेडल प्ले “डी”:**
**10 - 15 मिमी (0.4 - 0.6 इंच.)**

तुमच्या हाताने क्लच पेडल हलवा, आणि तुम्हाला जेथे किंचित विरोध जाणवेल तेथपर्यंतचे अंतर मोजा, म्हणजे क्लच पेडलचा प्ले किती आहे हे समजेल. क्लच पेडलचा प्ले हा विनिर्देशित मर्यादांच्या दरम्यान असावा. जर तो यापेक्षा जास्त किंवा कमी असेल तर, किंवा क्लच ड्रॅग करत असेल तर तुमच्या अधिकृत मारुती सुझुकी कमर्शियल वर्कशॉपमधून क्लच तपासून घ्या.

## फ्युएल फिल्टर (डिझेल इंजिनच्या मॉडेल)

उदाहरण




77PH089

फ्युएल फिल्टर हा वॉटर सेडिमेंटरचेही कार्य करतो.

ठराविक कालांतराने करण्याच्या देखभालीच्या वेळापत्रकानुसार पाणी काढून टाका. पाणी काढून टाकण्यासाठी :


1) फ्युएल फिल्टर ड्रेन नॉझलच्या खाली एक भांडे किंवा भरपूर चिंध्या ठेवा.
2) ड्रेन स्क्रू ढिला करा (1). पाणी बाहेर पडेल.
3) पाण्याच्या जागी डिझेल इंधन येताना दिसू लागल्यावर ड्रेन स्क्रू घट्ट करुन टाका.

**ड्रेन स्क्रू घट्ट करण्यासाठी टॉर्क**
**1.0 एनऐम (0.10 किग्रॅ-मी, 0.74 पौंड-फूट)**

## ब्रेक्स

### ब्रेक फ्लुइड

उदाहरण




77PM706

इन्स्ट्रुमेंट पॅनेलमधील टाकी बघून ब्रेक फ्लुइडची पातळी तपासा. ब्रेक फ्लुइडची टाकीतील पातळी पाहण्यासाठी स्टीअरिंग व्हीलच्या उजवीकडील कव्हर काढा. फ्लुइडची पातळी “MAX” आणि “MIN” या रेषांच्या दरम्यान असल्याचे पहा. पातळी “MIN” रेषेजवळ असल्यास मारुतीचे खरे (जेन्युइन) ब्रेक फ्लुइड (एमजीबीएफ) किंवा डॉट 3 घालून पातळी “MAX” वर आणा.
आम्ही मारुतीचे खरे (जेन्युइन) ब्रेक फ्लुइड (एमजीबीएफ) वापरण्याची जोरदार शिफारस करतो.

**⚠ इशारा**

**खालील मार्गदर्शक तत्वांचे पालन न केल्यास व्यक्तिगत दुखापत किंवा ब्रेक सिस्टिमचे मोठे नुकसान होऊ शकते.**

- **ब्रेक फ्लुइडची टाकीतील पातळी एका विशिष्ट मर्यादेच्या खाली गेली, तर इन्स्ट्रुमेंट पॅनेलमधील ब्रेक वॉर्निंग लाईट “ऑन” होईल (यासाठी पार्किंग ब्रेक पूर्ण काढलेला असताना इंजिन सुरु असले पाहिजे). हा लाईट सुरु झाल्यास तुमच्या अधिकृत मारुती सुझुकी कमर्शियल वर्कशॉपमधून ब्रेक सिस्टिम त्वरित तपासून घ्या.**
- **फ्लुइड वेगाने कमी झाल्यास हे ब्रेक सिस्टिममध्ये गळती झाल्याचे लक्षण आहे, आणि ही गोष्ट तुमच्या अधिकृत मारुती सुझुकी कमर्शियल वर्कशॉपमधून तपासून घ्यावी.**
- **मारुतीचे खरे (जेन्युइन) ब्रेक फ्लुइड (एमजीबीएफ) किंवा डॉट 3 या व्यतिरिक्त इतर कोणतेही फ्लुइड वापरु नका. आम्ही मारुतीचे खरे (जेन्युइन) ब्रेक फ्लुइड (एमजीबीएफ) वापरण्याची जोरदार शिफारस करतो. वापरलेले किंवा जुन्या किंवा उघड्या कंटेनर्समध्ये ठेवलेले फ्लुइड वापरु नका. बाहेरच्या वातावरणातील कण आणि इतर द्रव पदार्थ ब्रेक फ्लुइडच्या टाकीत न जाऊ देणे आवश्यक आहे.**

**⚠ सावधानीचा इशारा**

**ब्रेक फ्लुइड तुमच्या डोळ्यांना अपाय करु शकते आणि रंग दिलेल्या पृष्ठभागांचे नुकसान करु शकते. टाकीत ब्रेक फ्लुइड भरताना खबरदारी घ्या.**

**⚠ इशारा**

- **वाहन फार वजन भरलेले असताना चालवल्यास ब्रेक लागण्यासाठी लागणारे अंतर वाढू शकते आणि पेडलवर दाबही जास्त द्यावा लागू शकतो.**


**⚠ इशारा**

**ब्रेक फ्लुइड गिळल्यास किंवा श्वासावाटे आत घेतल्यास अपायकारक किंवा प्राणघातकही असते, आणि त्वचा किंवा डोळ्यांना स्पर्श झाला तर अपायकारक असते. ते गिळल्यास उलटी काढू नका. त्वरित विषबाधा केंद्राशी किंवा डॉक्टरांशी संपर्क साधा. ब्रेक फ्लुइड डोळ्यात गेल्यास डोळे भरपूर पाण्याने धुवा आणि वैद्यकीय मदत मागवा. हाताळणीनंतर हात स्वच्छ धुवा. हे द्रावण प्राण्यांसाठी विषारी असू शकते. लहान मुले आणि प्राण्यांपासून दूर ठेवा.**

*टीप:*
*डिस्क ब्रेक्स असल्यास, जसजसे ब्रेक पॅड्स झिजतील तसतशी फ्लुइडची पातळी हळू हळू कमी होऊ शकते.*

**ब्रेक पेडल**

तुम्ही ब्रेक पेडल दाबल्यावर कोणतीही स्पंज दाबल्यासारखी जाणीव न होता ब्रेक पेडल नेहमीच्याच उंचीवर थांबत असल्याचे पहा. असे होत नसल्यास तुमच्या अधिकृत मारुती सुझुकी कमर्शियल वर्कशॉपमधून ब्रेक सिस्टिम त्वरित तपासून घ्या. ब्रेक पेडल नेहमीच्याच उंचीवर थांबत नसल्याची शंका आल्यास खालीलप्रमाणे तपासणी करा:





54G108S

**पेडल ते फ्रंट पॅनेल किमान अंतर “अ”:**
**(बाय-फ्युएल इंजिन मॉडेल:**
**150 मिमी (6 इंच.)**
**डिझेल इंजिनच्या मॉडेलसाठी:**
**180 मिमी (7.1 इंच.)**

इंजिन चालू असताना ब्रेक पेडलवर सुमारे 30 किग्रॅ (66 पौंड) दाब देऊन ते खाली दाबले असताना ब्रेक पेडल आणि फ्रंट पॅनेलमधील अंतर मोजा. किमान अंतर किती आवश्यक आहे हे विनिर्दिशित आहे. तुमच्या वाहनाची ब्रेकिंग सिस्टिम ‘सेल्फ-ॲडजस्टिंग’ असल्यामुळे पेडलमध्ये ॲडजस्टमेंट करण्याची गरज नाही.

वर दिल्यानुसार पेडल ते फ्रंट पॅनेल हे अंतर जर किमान अंतरापेक्षा कमी असेल, तर तुमच्या अधिकृत मारुती सुझुकी कमर्शियल वर्कशॉपमधून तुमचे वाहन तपासून घ्या.

*टीप:*
*ब्रेक पेडल आणि फ्रंट पॅनेलमधील अंतर मोजताना तुमच्या मापनामध्ये फ्लोअरवरील मॅट किंवा फ्रंट पॅनेलवरील रबर विचारात घेऊ नका.*





77PM07013

**⚠ इशारा**

**तुमच्या वाहनाच्या ब्रेक सिस्टिमबाबत खालीलपैकी कोणत्याही समस्या आल्यास तुमच्या अधिकृत मारुती सुझुकी कमर्शियल वर्कशॉपमधून तुमचे वाहन त्वरित तपासून घ्या.**

- **ब्रेकचे सदोष कार्य**
- **असमान ब्रेक लागणे (ब्रेक्स सर्व चाकांवर समान न लागणे)**
- **फार जास्त पेडलची हालचाल**
- **ब्रेकचे ड्रॅगिंग**
- **मोठ्या प्रमाणात आवाज**
- **पेडलचे स्पंदन (पेडल खाली दाबल्यावर त्याचे स्पंदन होते)**

## पार्किंग ब्रेक




77PM702


**रॅचेट टूथ विनिर्देशन**
**6 वा – 9 वा दाता**
**लिव्हर ओढण्यासाठी शक्ती (1):**
**200 एन (20 केजीएफ, 44 एलबीएफ)**

पार्किंग ब्रेक पूर्ण लावण्यासाठी पार्किंग ब्रे क लिव्हर मागे ओढताना रॅचेट टीथचे क्लिक आवाज किती वेळा जाणवतात ते मोजा आणि अशा रीतीने पार्किंग ब्रेक मध्ये किती बदल करायचा हे तपासा. पार्किंग ब्रेक लिव्हर ही दिल्यानुसार टीथच्या संख्येच्या दरम्यान थांबली पाहिजे आणि वाहनाची मागची चाके व्यवस्थित लॉक झाली पाहिजेत. पार्किंग ब्रेक व्यवस्थित सेट केला नसेल किंवा लिव्हर सोडल्यानंतर ब्रेक्स ड्रॅग करत असले, तर तुमच्या अधिकृत मारुती सुझुकी कमर्शियल वर्कशॉपमधून पार्किंग ब्रेक तपासून आणि / किंवा व्यवस्थित सेट करुन घ्या.

**⚠ इशारा**

- **वाहनात क्षमतेहून जास्त वजन असल्यास पार्किंग ब्रेक कदाचित प्रभावी ठरणार नाही. वाहन जागेवर ठेवण्यासाठी आणखी चॉक्स वापरा.**

## स्टीअरिंग





77PH042

**स्टीअरिंग व्हीलचा प्ले "सी":**
**0 – 30 मिमी (0.0 – 1.2 इंच)**

स्टीअरिंग व्हीलमधील प्ले तपासण्यासाठी वाहन थांबलेले असताना, इंजिन "ऑफ" स्थितीत असताना चाके सरळ समोरच्या दिशेला असताना स्टीअरिंग व्हील हळूच डावीकडून उजवीकडे आणि उजवीकडून डावीकडे फिरवा. व्हील फिरत असताना तुम्हाला किंचित विरोध जाणवेपर्यंत ते किती अंतर फिरले, ते अंतर मोजा. हा प्ले विनिर्देशित मर्यादांच्या दरम्यान असला पाहिजे. एखाद्या उघड्या जागेवर सावकाश वाहन चालवत, स्टीअरिंग व्हील पूर्णपणे उजव्या आणि डाव्या बाजूला फिरवून पहा, आणि ते फिरताना सहज, न थरथरता फिरते ना हे तपासा. हे फ्री प्ले चे प्रमाण विनिर्देशित मर्यादांच्या बाहेर असेल तर तुमच्या अधिकृत मारुती सुझुकी कमर्शियल वर्कशॉपकडून यांची तपासणी झाली पाहिजे.


## प्रॉपेलर शाफ्ट युनिव्हर्सल जॉइंट

**पुढील**




77PM703

**मागील**





77PM704

सर्व्हिसिंगच्या वेळापत्रकानुसार प्रॉपेलर शाफ्ट युनिव्हर्सल जॉइंट (1) (पुढचा आणि मागचा) लुब्रिकेट करा.

प्रॉपेलर शाफ्ट युनिव्हर्सल जॉइंट लुब्रिकेट करण्यासाठी तुम्ही ग्रीस गन (2) आणि विनिर्देशित ग्रीस एनएलजीआय ग्रेड 2 वापरले पाहिजे.

## टायर्स




77PM705

तुमच्या वाहनाच्या पुढच्या आणि मागच्या टायर्समधील हवेच्या प्रेशरची विनिर्देशने टायर्सची माहिती असलेल्या लेबलवर दिलेली आहेत. पुढच्या आणि मागच्या सर्व टायर्समध्ये सांगितल्याप्रमाणेच हवेचा दाब असला पाहिजे.

वाहनात जर कॉम्पॅक्ट स्पेअर टायर असेल, तर हे आकडे त्याला लागू नाहीत.


### टायरची तपासणी

खालील तपासण्या करुन तुमच्या वाहनाच्या टायर्सची तपासणी किमान दर महिन्यात एकदा करा:

1) टायर प्रेशर गेजने टायरमधील हवेचे प्रेशर मोजा. आवश्यक असेल तर ते कमी-जास्त करा. जादा दिलेले टायरही तपासण्याचे लक्षात ठेवा.

**⚠ इशारा**

- **हवेचे प्रेशर टायर्स थंड असतानाच तपासावे, नाही तर तुम्हाला चुकीचे आकडे मिळू शकतात.**
- **टायरमध्ये सावकाश हवा भरत आत जाणार्या हवेचे प्रेशर अधून मधून तपासा. विनिर्देशित आकडा मिळेपर्यंत हवा भरत रहा.**
- **टायर्समध्ये कधीही जास्त किंवा कमी हवा भरु नका.**
- **कमी हवा भरल्यास वाहनाची हाताळणी सदोष बनते किंवा रिम टायरवर चढू शकते, ज्यामुळे अपघात किंवा टायरचे नुकसान होऊ शकते.**
- **जास्त हवा भरल्यास टायर फुटू शकतो, त्यामुळे व्यक्तिगत दुखापत होऊ शकते. तसेच जास्त हवा भरल्यास वाहनाची हाताळणी सदोष बनते, ज्यामुळे अपघात होऊ शकतो.**




52KM110

(1) ट्रेड वेअर इंडिकेटर
(2) इंडिकेटर लोकेशन ची खूण

2) ट्रेड ग्रूव्हची खोली 1.6 मिमी (0.06 इंच) पेक्षा जास्त असल्याचे तपासा. हे तपासण्यास मदत मिळण्यासाठी टायर्समध्ये ग्रूव्हजमध्ये मोल्ड केलेले ट्रेड वेअर इंडिकेटर्स असतात (ट्रेड किती झिजले आहेत याचे सूचक). हे सूचक जेव्हा पृष्ठभागावर येतात, तेव्हा ट्रेडची उरलेली खोली 1.6 मिमी (0.06 इंच) किंवा कमी असते आणि अशा वेळी असा टायर बदलावा.

3) अति प्रमाणात झीज, फटी आणि हानी दिसते का, हे तपासा. फटी किंवा इतर हानी झालेले कोणतेही टायर बदलले पाहिजेत. कोणत्याही टायर्सची अति प्रमाणात झीज झालेली दिसली तर तुमच्या अधिकृत मारुती सुझुकी कमर्शियल वर्कशॉपकडून त्यांची तपासणी करुन घ्या.

**⚠ सावधानीचा इशारा**

**वळणांवरील कठड्यांवर घासणे आणि खडकाळ जमिनीवरुन धावणे यामुळे टायर्सची आणि व्हील अलाईनमेंटची हानी होऊ शकते. ठराविक काळानंतर तुमच्या अधिकृत मारुती सुझुकी कमर्शियल वर्कशॉपकडून टायर्स आणि व्हील अलाईनमेंटची तपासणी करुन घ्या.**

4) व्हील नट्स ढिले झाले आहेत का ते तपासा.

5) टायर्समध्ये कोणतेही खिळे, खडे किंवा इतर वस्तू घुसलेल्या नाहीत हे तपासा.


**⚠ इशारा**

- तुमच्या वाहनाबरोबर दिलेले सर्व टायर्स एकाच प्रकारचे आणि आकारमानाचे आहेत. वाहनाचे स्टीअरिंग आणि हाताळणी योग्य होण्यासाठी हे महत्वाचे आहे. तुमच्या वाहनाच्या चार चाकांवर कधीही वेगवेगळ्या आकारमानाचे किंवा प्रकारांचे टायर्स लावू नका. टायर्सचा प्रकार आणि आकारमान हे तुमच्या वाहनासाठी मारुती सुझुकीने नेहमीचे किंवा पर्यायी सामुग्री म्हणून मान्यता दिलेले असले पाहिजे.
- तुमच्या वाहनाला असलेले टायर्स आणि व्हील्स बदलून त्या जागी कमी दर्जाची, मिश्र प्रकारची व्हील्स आणि टायर्स बसवल्यास तुमच्या वाहनाचे स्टीअरिंग आणि हाताळणी मोठ्या प्रमाणात बदलू शकते.
- त्यामुळे फक्त व्हील आणि टायर्सच्या जोड्या अशाच वापरा की ज्यांना तुमच्या वाहनासाठी मारुती सुझुकीने नेहमीचे किंवा पर्यायी सामुग्री म्हणून मान्यता दिलेली आहे.

***सूचना***

**मूळच्या टायर्सच्या जागी वेगळ्या आकारमानाचे टायर्स बसवण्यामुळे स्पीडोमीटर किंवा ओडोमीटरवरील आकडे चुकीचे दिसू शकतात. मूळच्या टायर्सच्या जागी वेगळ्या आकारमानाचे टायर्स बसवण्यापूर्वी ते खरेदी करण्यापूर्वी तुमच्या अधिकृत मारुती सुझुकी कमर्शियल वर्कशॉपचा सल्ला घ्या.**

## टायर रोटेशन




80JK7001

तुमच्या टायर्सची असमान झीज टाळण्यासाठी आणि त्यांचे आयुष्यमान वाढवण्यासाठी टायर्सच्या जागा येथे दाखवल्यानुसार बदला (टायर्स रोटेट करा). दर 10000 किमी नंतर टायर्स रोटेट केले पाहिजेत. रोटेशन केल्यानंतर पुढच्या आणि मागच्या चाकांमधील हवेचे प्रेशर तुमच्या वाहनाच्या, टायरची माहिती असलेल्या लेबलवर दिल्यानुसार कमी-जास्त करा.

### व्हील बॅलन्सिंग

जर सपाट आणि गुळगुळीत रस्त्यावर वाहन नको इतके थरथरत असले, तर मारुती सुझुकी कमर्शियलच्या अधिकृत वर्कशॉपमध्ये व्हील बॅलन्स करुन घ्या.

### व्हील अलाइनमेंट


टायर्सची असामान्य झीज झाली असल्यास किंवा वाहन एका बाजूला ओढत असल्यास मारुती सुझुकी कमर्शियलच्या अधिकृत वर्कशॉपमध्ये व्हील अलाइन करुन घ्या.

## बॅटरी

**⚠ इशारा**

- बॅटरी ज्वलनशील हायड्रोजन वायू तयार करतात. बॅटरी ज्वाळा किंवा ठिणग्यांपासून दूर ठेवा, नाही तर स्फोट होऊ शकेल. बॅटरीच्या जवळपास कार्य करताना कधीही धूम्रपान करु नका.
- बॅटरी तपासताना किंवा तिचे सर्व्हिसिंग करताना निगेटिव्ह केबल काढून ठेवा. बॅटरीचे पोस्ट्स आणि वाहन हे एकाच वेळी धातूच्या वस्तूमुळे जोडले जाणार नाहीत याची काळजी घ्या, नाही तर शॉर्ट सर्किट होऊ शकेल.
- तुम्हाला अपाय होणे, किंवा वाहन किंवा बॅटरीचे नुकसान होणे टाळण्यासाठी, तुमचे वाहन जर जंप स्टार्ट करण्याची गरज भासली तर या माहिती पुस्तिकेतील “संकटकालीन सेवा” भागात दिलेल्या जंप स्टार्टिंगसाठीच्या सूचनांचे पालन करा.

उदाहरण




54GM701

मेंटेनन्स-फ्री बॅटरीच्या (कॅप-लेस प्रकारची) बाबतीत तुम्हाला पाणी घालण्याची गरज नसते. पारंपरिक बॅटरीला पाणी भरण्याच्या जागांवर झाकणे असतात, आणि अशा बॅटरीमधील सोल्युशनची पातळी कायम वरच्या पातळीची रेषा (1) आणि खालच्या पातळीची रेषा (2) यादरम्यान ठेवली पाहिजे. तुम्ही ठराविक काळाने बॅटरी, केस बॅटरी टर्मिनल्स, आणि बॅटरी होल्ड-डाऊन ब्रॅकेट यांची तपासणी करुन काही नुकसान किंवा करोजन झाले आहे का हे पाहिले पाहिजे. एक कडक ब्रश आणि अमोनिया मिश्रित पाणी किंवा बेकिंग सोडामिश्रित पाणी वापरुन करोजन काढून टाका. करोजन काढून झाल्यावर स्वच्छ पाण्याने हात घासून धुवा.

तुमचे वाहन जर एक महिना किंवा अधिक काळ चालवले जाणार नसेल, तर नुकसान टाळण्यासाठी बॅटरीच्या निगेटिव्ह टर्मिनलपासून केबल काढून ठेवा.

**⚠ इशारा**

**बॅटरीची लेव्हल खालच्या लेव्हलच्या लाइनपेक्षा (2) कमी असताना जर बॅटरी वापरली गेली, तर त्यामुळे बॅटरीचे आयुष्य कमी होऊ शकते, एक्सौथर्मिक उष्णता निर्माण होऊ शकते, किंवा बॅटरीमध्ये हायड्रोजन वायू निर्माण होऊन स्फोट होऊ शकतो. बॅटरीची लेव्हले खालच्या लेव्हलच्या लाइनपेक्षा (2) कमी असताना बॅटरी वापरू नका.**

***सूचना***

**जर बॅटरीमध्ये वरच्या लेव्हलच्या लाइनपेक्षा (1) जास्त बॅटरी लिक्विड भरले, तर हे लिक्विड ड्राइव्हिंग करताना बसणार्या हादर्यांमुळे बाहेर सांडू शकते, किंवा काही बाबतींत बॅटरी चार्जिंगच्या कंडिशननुसार लिक्विड बॅटरीमधून बाहेर उडू शकते. यामुळे बॅटरीच्या आसपासच्या भागाची हानी होऊ शकते. बॅटरी लिक्विड बाहेर सांडले तर ते लगेच पाण्याने धुवून टाका. बॅटरीमध्ये वरच्या लेव्हलच्या लाइनपेक्षा (1) जास्त बॅटरी लिक्विड भरू नका.**

*टीप:*
*बॅटरी जेव्हा वापरली जात असते तेव्हा बॅटरी लिक्विड वापरले जाते. जर त्याची लेव्हल ही, वरची लेव्हल (1) आणि खालची लेव्हल (2) याच्या मध्यबिंदूपेक्षा कमी झालेली दिसली, तर, ही लेव्हल वरच्या लेव्हलच्या लाइनपर्यंत (1) येईपर्यंत डिस्टिल्ड वॉटर भरा.*

## फ्युजेस


तुमच्या वाहनात खाली दिलेले तीन प्रकारचे फ्युजेस आहेत:

**फ्युजिबल लिंक वायर आणि मेन फ्युज**
मेन फ्युज थेट बॅटरीकडून वीजप्रवाह घेतो.

**प्रायमरी**
हे फ्युजेस मेन फ्युज आणि बाकीच्या एकएकट्या वेगवेगळ्या फ्युजच्या दरम्यान आहेत आणि ते इलेक्ट्रिकल लोड ग्रुप्ससाठी आहेत.

**एकएकटे फ्युजेस**
हे फ्युजेस एकएकट्या वेगवेगळ्या इलेक्ट्रिकल सर्किटसाठी आहेत.


एखादा फ्युज काढण्यासाठी रिले बॉक्समध्ये दिलेला फ्युज पुलर (1) वापरा.





उदाहरण

77PM07012

## इंजिन कंपार्टमेंटमधील फ्युजेस




77PH076




77PH077


| मेन फ्युज/प्रायमरी फ्युज/रिले | | |
|---|---|---|
| **अनुक्र** | **रेटिंग** | **फ्युज / रिले** |
| (1) | – | स्टार्टिंग मोटर रिले (डिझेल) |
| | | सीएनजी व्हॉल्व रिले (बाय-फ्युएल) |
| (2) | – | रेडिएटर फॅन रिले |
| (3) | – | ग्लो प्लग 2 रिले (डिझेल) |
| | | फ्युएल पंप रिले (बाय-फ्युएल) |
| (4) | – | फ्युएल पंप रिले (डिझेल) |
| | | स्टार्टिंग मोटर रिले (बाय-फ्युएल) |
| (5) | 20A | फ्युएल पंप (डिझेल) |
| | 7.5A | सीएनजी व्हॉल्व (बाय-फ्युएल) |
| (6) | 30A | फ्युएल इंजेक्टर (डिझेल) |
| | 15A | फ्युएल इंजेक्टर (बाय-फ्युएल) |
| (7) | 30A | स्टार्टिंग मोटर |
| (8) | 15A | हॉर्न/हॅझार्ड |
| (9) | 70A | अल्टर्नेटो |
| (10) | 20A | ग्लो प्लग (डिझेल) |
| (11) | 20A | ग्लो प्लग 2 (डिझेल) |
| (12) | 40A | बॅटरी |
| (13) | 40A | इग्निशन स्विच |
| (14) | 30A | रेडिएटर फॅन |
| (15) | – | ग्लो प्लग रिले (डिझेल) |
| | | फ्युएल इंजेक्टर रिले (बॉय-फ्युएल) |
| (16) | – | ब्लँक (डिझेल) |
| (17) | – | ब्लँक (डिझेल) |
| (18) | – | फ्युएल इंजेक्टर मेन रिले (डिझेल) |
| (19) | 15A | फ्युएल इंजेक्टर 2 (डिझेल) |
| (20) | 20A | इंजेक्टर ड्रायव्हर (डिझेल) |
| (21) | 7.5A | सीएनजी |

मेन फ्युज, प्रायमरी फ्युजेस आणि काही एकएकटे फ्युजेस इंजिन कंपार्टमेंटमध्ये आहेत. मेन फ्युज उडाला तर एकही इलेक्ट्रिकल भाग कार्य करणार नाही. एखादा प्रायमरी फ्युज उडाला तर त्याच्याशी संबंधित लोड ग्रुपमधील एकही इलेक्ट्रिकल भाग कार्य करणार नाही. मेन फ्युज, एखादा प्रायमरी फ्युज किंवा एखादा एकएकटा फ्युज बदलताना मारुतीचा खरा फ्युजच वापरा.

एखादा फ्युज काढण्यासाठी रिले बॉक्समध्ये दिलेला फ्युज पुलर (1) वापरा. प्रत्येक फ्युजचे ॲम्पिअर फ्युज बॉक्सच्या कव्हरच्या आत दाखवले आहेत.

खालील फ्युजेस

उदाहरण




60G111


**⚠ इशारा**

**मेन फ्युज किंवा एखादा प्रायमरी फ्युज उडाला, तर तुमचे वाहन अधिकृत मारुती सुझुकी कमर्शियल वर्कशॉपकडून अवश्य तपासून घ्या. फ्युज बदलताना नेहमी मारुतीचा खरा फ्युजच वापरा. तात्पुरत्या दुरुस्तीसाठीसुद्धा कधीही एखाद्या वायरसारखी पर्यायी गोष्ट वापरु नका, नाही तर वाहनाचे भयंकर इलेक्ट्रिकल नुकसान होऊ शकते / आगही लागू शकते.**


*टीप:*
*फ्युज बॉक्समध्ये नेहमी जादा फ्युजेस आणि फ्युज पुलर असेल याची खात्री करा.*

**डॅश बोर्डच्या फ्युज**

उदाहरण



77PH048





77PH049

| मेन फ्युज/प्रायमरी | | |
|---|---|---|
| (1) | 10A | हेडलाईट (उजवा) |
| (2) | 10A | हेडलाईट (डावा) |
| (3) | 10A | टेल लाईट |
| (4) | 10A | स्टॉप लाईट |
| (5) | 15A | रेडिओ/डोम |
| (6) | 10A | एसटी एसआयजी |
| (7) | 10A | मीटर |
| (8) | 10A | इग्निशन (डिझेल) |
| | 15A | इग्निशन (बाय-फ्युएल) |
| (9) | 10A | बॅक-अप लाईट |
| (10) | 15A | वायपर |
| (11) | 15A | ॲक्सेसरी |

फ्युज बॉक्स डॅश बोर्डच्या खाली असते.

उदाहरण




65D046

**⚠ इशारा**

**नेहमी उडालेल्या फ्युजच्या जागी त्याच ऍम्पिअरेजचा फ्युज बसवा. उडालेल्या फ्युजच्या जागी ऍल्युमिनियम फॉईल किंवा वायरसारखी पर्यायी गोष्ट कधीही वापरु नका. तुम्ही एखादा फ्युज बदलला आणि नवीन फ्युज जर थोड्याच काळात उडाला, तर वाहनात काही तरी मोठी इलेक्ट्रिकल समस्या असू शकते. तुमचे वाहन अधिकृत मारुती सुझुकी कमर्शियल वर्कशॉपकडून त्वरित तपासून घ्या.**

## बल्ब बदलणे

**⚠ सावधानीचा इशारा**

- **लाइट बल्ब बंद केल्यानंतर त्यांना लगेच हात लावला तर ते तुमची बोटे भाजण्याइतके गरम असू शकतात. विशेषतः हॅलोजेन हेडलाइट बल्ब्ससाठी हे अधिक खरे आहे. बल्ब थंड झाल्यावरच बदला.**
- **हेडलाइट बल्ब्समध्ये दाबाखाली हॅलोजेन गॅस भरलेला असतो. त्यांच्यावर काही आपटल्यास किंवा ते पडल्यास ते फुटून तुम्हाला दुखापत होऊ शकते. त्यांना काळजीपूर्वक हाताळा.**

***सूचना***


**लाइट्स चालू असताना तुमच्या त्वचेमधील तेलांमुळे हॅलोजेन बल्ब जास्त गरम होऊन फुटू शकतो, नवीन बल्ब स्वच्छ फडक्याने पकडा.**

***सूचना***

**बल्ब वारंवार बदलावा लागत असल्यास इलेक्ट्रिकल सिस्टिमची तपासणी करावी लागेल असा त्याचा अर्थ असतो. ही तपासणी अधिकृत मारुती सुझुकी कमर्शियल वर्कशॉपकडून करुन घेतली पाहिजे.**


*टीप:*
*पावसात ड्रायव्हिंग केल्यानंतर किंवा गाडी धुतल्यानंतर एक्स्टीरिअर लाइट्सच्या लेन्सेसवर (हेडलाइट्स, रिअर कॉम्बिनेशन लाइट्स. इ.) धुके जम शकते. ही नैसर्गिक घटना असते, ती लॅम्पच्या आतील व बाहेरील तापमानातील फरकामुळे होते. लेन्सवर तात्पुरते धुके जमणे हे माल्फंक्शन नसते आणि त्यामुळे ड्रायव्हिंगमध्ये काहीही त्रास होणार नाही. हे धुके जेव्हा वातावरण बदलून सूर्यप्रकाश पडतो, तेव्हा किंवा हेडलॅम्प ऑन ठेवल्यावर निघून जाते. मात्र लॅम्पच्या आत पाणी शिरते, तेव्हा तुमच्या अधिकृत मारुती सुझुकी वर्कशॉपशी संपर्क साधा.*

### हेडलाइट्स





77PH050

1) स्क्रूज (1) काढा आणि एअर इन्लेट (2) बॉक्सकाढा




77PH051

2) कपलर (3) डिस्कनेक्ट करा. सीलिंग रबर (4) काढा.





77PH052

3) रिटेनिंग स्प्रिंग (5) पुढे दाबून सोडवा. नंतर बल्ब (6) बदला. नवीन बल्ब बसल्यावर नेमकी याच्या उलटी कृती करा.

**पुढचा वळण्याच्या सिग्नलचा लाइट**
**पुढचा पोझिशन लाइट**


यासाठी खास पद्धतींची गरज असल्याने आम्ही शिफारस करतो, की हे बल्ब बदलण्यासाठी तुम्ही वाहन तुमच्या अधिकृत मारुती सुझुकी कमर्शियल वर्कशॉपमध्ये न्यावे.

## मागचा कॉम्बिनेशन लाइट





77PH055

1) स्क्रूज (1) काढा आणि कव्हर (2) काढा.




77PH056

(1) काढा आणि कव्हर (2) काढा.





76MH0A123

(6) काढणे
(7) बसवणे


2) वळण्याच्या सिग्नलचा लाइट (3), टेल/ब्रेक लाइट (4) किंवा रिव्हर्सचा लाइट (5) काढण्यासाठी बल्ब आत ढकलून घड्याळाच्या उलट्या दिशेने फिरवा. नवीन बल्ब बसवण्यासाठी तो आत दाबून घड्याळाच्या दिशेने फिरवा.

**लायसन्स प्लेट लाइट**




77PH066

1) स्क्रूज





77PH063

(4) काढणे
(5) बसवणे

2) लायसन्स प्लेट लाइट (3) काढण्यासाठी आणि बसवण्यासाठी फक्त बल्ब बाहेर ओढा किंवा आत दाबा.


**वाहनाच्या आतील लाइट**

दाखवल्याप्रमाणे एका मऊ कापडात फ्लॅट ब्लेड स्क्रू ड्रायव्हर धरुन लेन्स काढा. बल्ब बसवण्यासाठी तो फक्त आत दाबा.




77PH057

## वायपर ब्लेड्स




82DY06


वायपर ब्लेड्स जर खरखरीत झाली किंवा खराब झाली, किंवा काचेवरुन पाणी पुसताना फराटे मारत असली, तर ती बदला.

नवीन वायपर ब्लेड्स बसवण्यासाठी खालील पद्धत वापरा:

| *सूचना* |
|---|
| **वायपर ब्लेड बदलताना खिडकीच्या काचेवर चरा उमटू नये किंवा ती फुटू नये म्हणून तिच्यावर वायपर आर्म आपटू देऊ नका.** |

*टीप:*
*वाहनाच्या विनिर्देशनानुसार काही ब्लेड्स ही येथे वर्णन केलेल्या ब्लेड्सपेक्षा वेगळी असू शकतात. असे असल्यास ती बदलण्यासाठी तुमच्या अधिकृत मारुती सुझुकी कमर्शियल वर्कशॉपचा सल्ला घ्या.*


**विंडशील्ड वायपर्ससाठ**




70G119

1) वायपर आर्म विंडशील्डपासून दूर धरा.


*टीप:*
*पुढच्या दोन्ही वायपर्सचे आर्म्स उचलताना आधी ड्रायव्हरच्या बाजूच्या वायपरचा आर्म उचला. वायपर्सचे आर्म्स खाली करताना आधी प्रवाशाच्या बाजूचा आर्म खाली करा. नाही तर दोन्ही वायपर आर्म्स एकमेकामध्ये अडथळा आणू शकतीत.*




54G130


2) लॉक (1) वायपर आर्मच्या (2) दिशेने दाबा आणि दाखवल्यानुसार वायपर आर्मपासून वायपर फ्रेम काढा.
3) वायपर ब्लेडचे लॉकच्या बाजूचे टोक उघडा आणि दाखवल्यानुसार सरकवून ब्लेड बाहेर काढा.

**काढणे**





60A260

**बसवणे**




54G132


(1) लॉक केलेले टोक





68PH00754

(3) रिटेनर

4) जर नवीन ब्लेडबरोबर दोन मेटल रिटेनर्स नसले, तर ते जुन्या ब्लेडवरुन काढून नवीन ब्लेडसाठी वापरा.




60MH071





60MH072

(अ) वर
(ब) खाली

*टीप:*
*मेटल रिटेनर्स (3) बसवताना मेटल रिटेनर्सची दिशा वरील चित्रांमध्ये दाखवल्यानुसार असल्याची खात्री करा.*

5) नवीन ब्लेड बसवताना, काढण्याच्या कृतीच्या उलट कृती करा. लॉक केलेले टोक वायपर आर्मच्या दिशेने असू द्या.
   सर्व हूक्सनी ब्लेड व्यवस्थित धरले असल्याची खात्री करा. ब्लेडचे टोक जागेवर बसवा.
6) वायपर फ्रेम आर्मवर परत बसवा. लॉक लिव्हर आर्ममध्ये व्यवस्थित बसल्याची खात्री करा.

## विंडशील्ड वॉशर फ्लुइड (असल्यास)




77PM07027

टाकीमध्ये वॉशर फ्लुइड असल्याची स्वतः पाहुन खात्री करा. आवश्यकता असल्यास ते पुन्हा भरा. उत्तम दर्जाचे, आवश्यकतेनुसार पाणी घालून सौम्य केलेले वॉशर फ्लुइड वापरा.

**⚠ इशारा**

**विंडशील्ड वॉशरच्या टाकीमध्ये रेडिएटर अँटिफ्रीझ वापरु नका. ते विंडशील्डवर फवारल्यास दृश्यमानतेची मोठ्या प्रमाणात हानी होऊ शकते, तसेच तुमच्या वाहनाच्या रंगाचीही हानी होऊ शकते.**

***सूचना***


**वॉशर टाकीमध्ये फ्लुइड नसताना वॉशर मोटर चालवल्यास हानी होऊ शकते.**

# संकटकालीन सेवा

टायर बदलण्याचे टूल ........ 8-1
जॅकिंगबाबत सूचना ........ 8-2
चाके बदलणे ........ 8-5
जंप स्टार्टिंगबाबत सूचना ........ 8-5
टोइंग........ 8-7
स्टार्टर न चालल्यास ........ 8-7
इंजिन फ्लड झाल्यास ........ 8-8
इंजिन फार गरम झाल्यास ........ 8-8
वाहनाच्या खालच्या बाजूने लागल्यामुळे होणारा त्रास .... 8-9
वॉर्निंग ट्रँगल ........ 8-9
आग विझवण्याचे यंत्र (असल्यास) ........ 8-10

8

## टायर बदलण्याचे टूल




77PH202

(1) जॅक
(2) व्हील ब्रेस
(3) जॅक हँडल
(4) स्पॅनर

टायर्स बदलण्याची टूल्स ड्रायव्हरच्या सीटच्या मागे ठेवलेली असतात.
जॅक काढण्यासाठी त्याचा शाफ्ट घड्याळाच्या काट्याच्या उलट दिशेने फिरवा आणि जॅक स्टोअरेज ब्रॅकेटमधून ओढून बाहेर काढा. जॅक परत ठेवण्यासाठी तो स्टोअरेज ब्रॅकेटमध्ये ठेवून, तो व्यवस्थित जागेवर बसेपर्यंत शाफ्ट घड्याळाच्या काट्याच्या दिशेने फिरवा.

जादा दिलेले टायर बेडच्या खाली ठेवलेले असते.
जादा दिलेले टायर काढण्यासाठी



77PH099

1) जादा दिलेल्या टायरच्या होल्डर हूकचा नट (1) ढिला करा.
2) जादा दिलेल्या टायरचा होल्डर हूकमधून काढून सावकाश खाली घ्या.
3) जादा दिलेल्या टायरच्या मध्यभागीचा स्क्रू काढून टायर काढा.

**⚠ इशारा**


**टायर बदलण्याची टूल्स वापरुन झाल्यावर ती परत जागेवर घट्ट बसल्याची खात्री करा, नाही तर एखादा अपघात झाल्यास त्यांच्यामुळे दुखापत होऊ शकते.**

**⚠ सावधानीचा इशारा**

**जॅक फक्त चाके बदलण्यासाठी वापरा. जॅक वापरण्याचा प्रयत्न करण्यापूर्वी या भागातील जॅकिंगबाबतच्या सूचना वाचणे महत्वाचे आहे.**

## जॅकिंगबाबत सूचना

उदाहरण




77PH054

1) सपाट, कठीण जमिनीवर वाहन उभे करा.
2) पार्किंग ब्रेक घट्ट लावा आणि शिफ्ट “R” (रिव्हर्स मध्ये आणा.

**⚠ इशारा**

- **वाहन जॅकवर घेताना शिफ्ट “R” (रिव्हर्स मध्ये आणल्याची खात्री करा.**
- **ट्रान्समिशन “N” (न्युट्रल मध्ये असताना कधीही वाहन जॅकवर घेऊ नका, नाही तर अस्थिर जॅकमुळे अपघात होऊ शकतो.**


3) वाहन रहदारीच्या आसपास असेल तर हॅझार्ड वॉर्निंग लाइट (फ्लॅशर) सुरु करा.
4) जे चाक वर उचलायचे आहे, त्याच्या तिरक्या रेषेतील चाकाच्या पुढे आणि मागे अडथळा लावा.
5) चित्रात दाखवल्यानुसार जादा चाक हे जॅक निघाल्यास असावे म्हणून जे चाक वर उचलायचे आहे, त्याच्या जवळ ठेवा.




उदाहरण

77PH802


उदाहरण



54G253

**पुढचा जॅकिंग पॉइंट**


उदाहरण



77PH084


**मागचा जॅकिंग पॉइंट**

उदाहरण



77PH106

उदाहरण



77PS052

6) जॅक उभा ठेवा आणि जॅकच्या डोक्यावरील ग्रूव्ह वाहनाच्या बॉडीच्या खालच्या जॅकिंग बारभोवती घट्ट बसेपर्यंत जॅकचे हँडल घड्याळाच्या काट्याच्या दिशेने फिरवा. चित्रे पहा.
7) टायर जमिनीवरुन उठेपर्यंत जॅक सावकाश, हिसके न देता फिरवत रहा. वाहन गरजेपेक्षा जास्त उचलू नका.


**⚠ इशारा**

- **जॅकचा वापर फक्त सपाट, कठीण जमिनीवरच चाके बदलण्यासाठी करा.**
- **वाहन कधीही उतारावर जॅकवर घेऊ नका.**
- **जे चाक बदलायचे, त्याच्याजवळचा जॅकिंग पॉइंट (चित्रात दाखवलेला) सोडून वाहनाच्या बाकी कोणत्याही जागेवर जॅक लावून वाहन वर घेऊ नका.**
- **वाहन जॅकवर उचलले असताना कधीही वाहनाच्या खाली जाऊ नका.**
- **वाहन जॅकवर उचलले असताना कधीही इंजिन सुरु करु नका आणि कधीही प्रवाशांना वाहनात रहायला परवानगी देऊ नका.**

**गॅरेज जॅकच्या सहाय्याने वाहन वर उचलणे**


- खाली दिलेल्या जागांपैकी एका जागेवर गॅरेज जॅक लावा.
- वर उचललेल्या वाहनाला नेहमी खाली दिलेल्या जागांवर जॅक्स स्टँड्सचा (बाजारात उपलब्ध असतात) आधार द्या.

**गॅरेज जॅकसाठी पुढचा जॅकिंग पॉइंट (1)**





77PH060

**गॅरेज जॅकसाठी मागचा जॅकिंग पॉइंट (2)**




77PH101

**जॅक स्टँड किंवा टू-कॉलम लिफ्ट लावण्याची जागा (3)**




77PS055 (2)

***सूचना***


- **गॅरेज जॅक कधीही एक्झॉस्ट पाईपला लावू नका.**
- **जॅक स्टँड किंवा टू-कॉलम लिफ्ट वाहनाच्या मागच्या बाजूच्या जागेवर लावताना आसपासच्या भागांना धक्का लागणार नाही याची काळजी घ्या, जसे पार्किंग केबल किंवा फ्युएल टँकची फ्लेंज.**

*टीप:*
*अधिक माहितीसाठी कृपया एखादया अधिकृत मारुती सुझुकी कमर्शियल वर्कशॉपशी संपर्क साधा.*

## चाके बदलणे

चाक बदलण्यासाठी खालील पद्धत वापरा:

1) सर्व प्रवासी आणि माल वाहनामधून बाहेर काढा.
2) वाहनामधून जॅक, टूल्स आणि जादा दिलेले चाक बाहेर काढा.
3) व्हील नट्स ढिले करा, पण काढू नका.
4) वाहन जॅकवर चढवा.
5) व्हील नट्स आणि चाक काढा.
6) नवीन चाक बसवण्यापूर्वी चाकावरुन आणि हबवरुन काही चिखल किंवा घाण असेल तर ते स्वच्छ फडक्याने साफ करा. हब काळजीपूर्वक साफ करा; तो वाहन चालवल्यामुळे गरम झालेला असू शकतो.
7) नवीन चाक बसवा आणि व्हील नट्स त्यांची कोनचा आकार असलेली टोके चाकाकडे तोंड करुन बसवा. प्रत्येक नट हाताने, चाक हबवर व्यवस्थित बसेपर्यंत घट्ट करा.




54G116

**व्हील नट घट्ट करण्यासाठी टॉर्क**
**100 एनएम (10.2 केजीएफ-एम, 73.8 एलबीएफ-एफटी)**

8) जॅक खाली करा आणि चित्रात दाखवल्याप्रमाणे एकमेकासमोरचे नट्स पकडीने पूर्णपणे घट्ट करा.

**⚠ इशारा**

**खरे (जेन्युइन) व्हील नट्स वापरा आणि चाके बदल्यानंतर शक्य तितक्या लवकर ते विर्देशित केलेल्या टॉर्कला घट्ट करा. अयोग्य व्हील नट्स किंवा अयोग्य रीतीने घट्ट केलेले व्हील नट्स पडून जाऊ शकतात व त्यामुळे अपघात होऊ शकतो. तुमच्याकडे टॉर्क रेंच नसल्यास व्हील नट्सचा टॉर्क एखाद्या अधिकृत मारुती सुझुकी कमर्शियल वर्कशॉपकडून तपासून घ्या.**

## जंप स्टार्टिंगबाबत सूचना

**⚠ इशारा**


- **बॅटरी गोठल्यासारखी वाटत असेल तर वाहन कधीही जंप स्टार्ट करु नका. अशा परिस्थितीत जंप स्टार्ट करण्याचा प्रयत्न केल्यास बॅटर्यांचा स्फोट होऊ शकतो किंवा त्या फुटू शकतात.**
- **जंप लीड कनेक्शन्स करताना तुमचे हात आणि जंप लीड्स हे पुली, बेल्ट्स किंवा फॅनपासून दूर असल्याची खात्री करा.**
- **बॅटर्या ज्वालाग्राही हायड्रोजन गॅस निर्माण करतात. बॅटरीपासून ज्वाला, आणि ठिणग्या दूर ठेवा, नाही तर स्फोट होऊ शकतो. बॅटरीच्या आसपास काम करताना कधीही धूम्रपान करु नका.**
- **तुम्ही जंप स्टार्टिंगसाठी वापरत असलेली बॅटरी दुसर्या वाहनामध्ये बसवलेली असल्यास दोन्ही वाहनांचा एकमेकांना स्पर्श होत नाही याची खात्री करा.**
- **तुमची बॅटरी कोणत्याही स्पष्ट कारणाशिवाय एकसारखी उतरत असल्यास तुमचे वाहन एखाद्या अधिकृत मारुती सुझुकी कमर्शियल वर्कशॉपकडून तपासून घ्या.**
- **तुम्हाला अपाय किंवा तुमच्या वाहन किंवा बॅटरीला हानी होऊ नये म्हणून खालील जंप स्टार्टिंगच्या सूचनांचे काळजीपूर्वक आणि क्रमवार पालन करा.**
  **शंका असेल तर अर्हताप्राप्त रोड सर्व्हिस मागवा.**

**सूचना**

**तुमचे वाहन ढकलून किंवा ओढून नेऊन सुरु करु नये. या वाहन सुरु करण्याच्या पद्धतीमुळे कॅटॅलिटिक कन्व्हर्टरचे कायमचे नुकसान होऊ शकते. कमजोर बॅटरी किंवा पूर्ण उतरलेली बॅटरी असलेले वाहन सुरु करण्यासाठी जंप लीड्स वापरा.**

**तुमचे वाहन जंप स्टार्ट करताना खाली पद्धत वापरा:**

1) वाहन जंप स्टार्ट करण्यासाठी फक्त 12 व्होल्टची बॅटरी वापरा. चांगली 12 व्होल्टची बॅटरी तुमच्या वाहनाजवळ ठेवा म्हणजे जंप लीड्स दोन्ही बॅटर्यांपर्यंत पोहोचतील दुसर्या वाहनावर लावलेली बॅटरी वापरताना दोन्ही वाहनांचा एकमेकांना स्पर्श होऊ देऊ नका. दोन्ही वाहनांचे पार्किंग ब्रेक घट्ट लावा.
2) सुरक्षिततेच्या कारणासाठी आवश्यक असतील त्या ऍक्सेसरीज सोडून (उदा., हेडलाइट्स किंवा हॅझार्ड लाइट्स) बाकी सर्व ऍक्सेसरीज बंद करा.




77PS056

3) खालीलप्रमाणे जंप स्टार्ट कनेक्शन्स जोडा:
   1. पहिल्या जंप लीडचे एक टोक उतरलेल्या बॅटरीच्या (1) पॉझिटिव्ह (+) टर्मिनलशी जोडा.
   2. दुसरे टोक बूस्टर बॅटरीच्या (2) पॉझिटिव्ह (+) टर्मिनलशी जोडा.
   3. दुसर्या जंप लीडचे एक टोक बूस्टर बॅटरीच्या (2) निगेटिव्ह (-) टर्मिनलशी जोडा.
   4. शेवटचे कनेक्शन उतरलेली बॅटरी (1) असलेल्या वाहनाच्या एखाद्या रंग न दिलेल्या, जड धातूच्या भागाशी (म्हणजे डोअर लॅच स्ट्रायकर (3)) जोडा.

**⚠ इशारा**

**जंप लीड कधीही डिस्चार्ज झालेल्या बॅटरीच्या निगेटिव्ह (-) टर्मिनलशी थेट जोडू नका, नाही तर स्फोट होऊ शकतो.**

4) तुम्ही वापरत असलेली बूस्टर बॅटरी दुसर्या वाहनावर बसवलेली असल्यास बूस्टर बॅटरी असलेल्या वाहनाचे इंजिन सुरु करा. इंजिन मध्यम गतीने चालू द्या.
5) उतरलेली बॅटरी असलेल्या वाहनाचे इंजिन सुरु करा.
6) तुम्ही जंप लीड्स ज्या क्रमाने जोडली होती, त्याच्या बरोबर उलट क्रमाने ती काढून घ्या.

### टोइंग

तुम्हाला तुमचे वाहन ओढून नेण्याची गरज भासल्यास एखाद्या व्यावसायिक सेवेला कॉल करा. तुमचा डीलर तुम्हाला वाहन ओढून नेण्याच्या सविस्तर सूचना देऊ शकेल.

**सूचना**

**तुमचे वाहन ओढून नेले जाताना त्याचे नुकसान टाळण्यासाठी योग्य ते साहित्य आणि कार्यपद्धती वापरल्या पाहिजेत.**

**2-व्हील ड्राइव्ह (2डब्ल्यूडी) मॅन्युअल ट्रान्समिशन**

मानवी पद्धतीने ट्रान्समिशन असलेली वाहने खालीलपैकी कोणत्याही एका पद्धतीने ओढून नेली जाऊ शकतात.

1) पुढच्या बाजूने, पुढील चाके उचललेली व मागची चाके जमिनीवर असलेल्या स्थितीत. वाहन ओढण्यापूर्वी खात्री करा की ट्रान्समिशन न्यूट्रलमध्ये आहे आणि पार्किंग ब्रेक सोडलेला आहे.
2) मागच्या बाजूने, मागील चाके उचललेली व पुढची चाके जमिनीवर असलेल्या स्थितीत, मात्र स्टीअरिंग व्हील आणि ड्राइव्हट्रेन काम करु शकत असल्यास. वाहन ओढण्यापूर्वी खात्री करा की स्टीअरिंग व्हील अनलॉक केलेले आहे (इग्निशन चावी “ACC” स्थितीमध्ये असली पाहिजे), आणि स्टीअरिंग व्हील हे वाहन ओढून नेण्याच्या सेवेसाठी तयार केलेल्या क्लॅम्पिंग डिव्हाइसने एका जागी घट्ट ठेवले आहे.

**सूचना**

**स्टीअरिंग कॉलम हा वाहन ओढून नेले जात असताना पुढच्या चाकांमधून बसणारे धक्के सहन करण्याइतका मजबूत नसतो. वाहन ओढून नेण्यापूर्वी नेहमी स्टीअरिंग व्हील अनलॉक करुन ठेवा.**

## स्टार्ट न चालल्यास

1) बॅटरीची स्थिती कशी आहे हे पाहण्यासाठी हेडलाइट्स सुरु करुन इग्निशन स्विच फिरवून “START” स्थितीवर आणण्याचा प्रयत्न करा. जर हेडलाइट्स अंधुक किंवा पूर्णपणे बंद झाले, तर याचा अर्थ, एक तर बॅटरी उतरली आहे किंवा बॅटरी टर्मिनल कॉटॅक्टमध्ये दोष आहे. आवश्यक त्यानुसार बॅटरी चार्ज करा किंवा बॅटरी टर्मिनल कॉटॅक्ट दुरुस्त करा.
2) जर हेडलाईट झगझगीतच राहिले तर फ्युजेस तपासा. स्टार्टर नादुरुस्त होण्याचे कारण स्पष्ट नसेल तर काही तरी मोठी इलेक्ट्रिकल समस्या असू शकते. तुमचे वाहन तुमच्या अधिकृत मारुती सुझुकी कमर्शियल वर्कशॉपकडून तपासून घ्या.

## इंजिन फ्लड झाल्यास

इंजिनमध्ये इंधन जास्त प्रमाणात येऊन ते फ्लड झाले असल्यास ते सुरु होण्यास त्रास देऊ शकते. असे झाल्यास ऍक्सिलरेटरचे पेडल पूर्णपणे खाली दाबा आणि इंजिन क्रँक करताना ते तसेच खाली दाबून ठेवा.

• स्टार्टर मोटर 30 सेकंदापेक्षा जास्त वेळ चालवू नका.

## इंजिन फार गरम झाल्यास

वाहन प्रतिकूल परिस्थितीत चालवल्यास इंजिन तात्पुरते जास्त गरम होऊ शकते. जर वाहन चालवताना इंजिन कूलंटचे तापमान वाढल्याचे सांगणारा लाइट सुरु झाला, तर:

1) वाहन सुरक्षित जागी नेऊन उभे करा.
2) इंजिन कूलंटचे तापमान वाढल्याचे सांगणारा लाइट बंद होईपर्यंत इंजिन काही मिनिटे नेहमीच्या आयडलिंगच्या वेगावर चालू राहू द्या.

**⚠ इशारा**

**वाफ बाहेर पडताना दिसली किंवा तिचा आवाज ऐकू आला, तर वाहन सुरक्षित जागी नेऊन उभे करा आणि त्वरित इंजिन बंद करुन ते थंड होऊ द्या. वाफ असताना इंजिन कंपार्टमेंट उघडू नका. वाफ बाहेर पडताना दिसेनाशी झाली किंवा तिचा आवाज ऐकू येईनासा झाल्यावर, इंजिन कंपार्टमेंट उघडून कूलंट अजूनही उकळत आहे का, हे पहा. ते उकळत असल्यास ते उकळणे बंद होईपर्यंत तुम्ही थांबा.**

इंजिन कूलंटचे तापमान वाढल्याचे सांगणारा लाइट बंद झाला नाही, तर:

1) इंजिन बंद करा आणि वॉटर पंपचा बेल्ट आणि पुलींचे नुकसान झाले नाही ना, किंवा ते जागेवरुन घसरले नाहीत ना, हे तपासा. असे काही झाले असल्यास ते दुरुस्त करा.
2) कूलंटच्या टाकीतील कूलंटची पातळी तपासा. ती जर "कमी" रेषेपेक्षा खाली असल्याचे दिसले, तर रेडिएटर, वॉटर पंप आणि रेडिएटर आणि हीटरचे होजेस गळत आहेत का, हे पहा. अशा काही गळत्या दिसल्या की ज्यामुळे इंजिन गरम झालेले असू शकते, तर या समस्या सोडवेपर्यंत इंजिन चालवू नका.
3) कोठेही गळती दिसली नाही, तर टाकीमध्ये काळजीपूर्वक कूलंट घाला, मग आवश्यक असल्यास रेडिएटरमध्ये घाला ("तपासणी आणि देखभाल" भागातील "इंजिन कूलंट" पहा).

*टीप:*
*तुमचे इंजिन फार गरम होत असेल आणि काय करावे हे तुम्हाला समजत नसेल, तर तुमच्या अधिकृत मारुती सुझुकी कमर्शियल वर्कशॉपशी संपर्क साधा.*




65D350d

**⚠ इशारा**


- **पाण्याचे तापमान उच्च असताना रेडिएटर कॅप काढणे (किंवा डिझेल इंजिनसाठी डीगॅसिंग टँक कॅप) धोक्याचे असते, कारण उकळते फ्लुइड आणि वाफ आतून दाबाखाली जोराने बाहेर पडू शकतात. कूलंटचे तापमान कमी झाल्यानंतरच कॅप उघडावी.**
- **वैयक्तिक दुखापत टाळण्यासाठी हात, टूल्स आणि कपडे इंजिन कूलिंग फॅनपासून दूर ठेवा. हे इलेक्ट्रिक पंखे अचानक कधीही आपोआप सुरु होऊ शकतात.**

## वाहनाच्या खालच्या बाजूने लागल्यामुळे होणारा त्रास

तुमच्या वाहनाची अंडरबॉडी जर जमिनीवर घासली किंवा धडकली, तर तुमचे वाहन एखाद्या अधिकृत मारुती सुझुकी कमर्शियल वर्कशॉपकडून तपासून घ्या. नाही तर स्टीअरिंग, सस्पेन्शन, ड्राइव्हलाइन , आणि ब्रेक्स इ. च्या हानीमुळे तुम्ही वाहन सुरक्षितपणे चालवू शकणार नाही.


## वॉर्निंग ट्रँगल

**उदाहरण**





MHO-07-001

तुमचे वाहन नादुरुस्त झाल्यास किंवा संकटकाळी थांबण्याच्या प्रक्रियेमध्ये जेव्हा तुमचे वाहन रहदारीला धोकादायक ठरु शकते, तेव्हा तुमच्या वाहनासोबत दिलेला वॉर्निंग ट्रँगल रस्त्यावर, कोणतेही अडथळे नसतील अशा रीतीने, वाहनाच्या मागच्या बाजूला सुमारे 50-100 मी अंतरावर ठेवा, जेणेकरुन मागून येणार्या रहदारीला पूर्वसूचना मिळेल. ट्रँगलची प्रकाश परावर्तित करणारी बाजू येणार्या रहदारीच्या बाजूला असली पाहिजे. वॉर्निंग ट्रँगल ठेवण्यासाठी वाहनातून उतरण्यापूर्वी कृपया हॅझार्ड वॉर्निंग लाइट्स चालू करा.





MHO-07-014-1

- बाण 1 ने दाखवल्यानुसार वॉर्निंग ट्रॅंगल त्याच्या कव्हरमधून काळजीपूर्वक काढा.
- बाणाने दाखवल्यानुसार दोन्ही रिफ्लेक्टर आर्म्स उघडा आणि उजव्या आर्मवरील पिनने ते एकमेकाशी लॉक करा. बॉटम स्टॅंड बाण 3 ने दाखवल्यानुसार घड्याळाच्या उलट दिशेने उघडा. वॉर्निंग ट्रॅंगल वाहनाच्या मागच्या बाजूला एखाद्या सपाट जागी ठेवा.
- ट्रॅंगल परत कव्हरमध्ये ठेवण्यासाठी बरोबर उलट कृती करा.





MHO-07-014

## आग विझवण्याचे यंत्र (असल्यास)




77PM08009

आग विझवण्याचे यंत्र सीट्सच्या मागे ठेवलेले असते (ड्रायव्हर सीट आणि प्रवाश्याच्या सीटच्या मध्ये).





77PM08003

(1) आग विझवण्याच्या यंत्राचा सिलिंडर
(2) सील
(3) सेफ्टी नॉझल
(4) लिव्हर
(5) नॉझल

### आग विझवण्याचे यंत्र काढणे आणि परत जागेवर बसवणे


#### आग विझवण्याचे यंत्र काढण्यासाठी




77PM08004

आग विझवण्याच्या यंत्राची लिव्हर (1) किंचित वर उचला आणि आग विझवण्याचे यंत्र चित्रात दाखवलेल्या दिशेला ओढा, म्हणजे ते क्लॅम्पमधून (2) सुटेल.

**आग विझवण्याचे यंत्र परत जागेवर बसवण्यासाठी**





77PM08005

आग विझवण्याच्या यंत्राची बॉडी (1) क्लॅम्पमध्ये (3) सरकवा आणि नॉझल (2) काळजीपूर्वक क्लॅम्पवर खाली ठेवा.


*टीप:*
*आग विझवण्याच्या यंत्राची नॉझल क्लॅम्पवर व्यवस्थित बसली असल्याची खात्री करा.*

**वापरण्याची पद्धत**




77PM08006

1) आग विझवण्याचे यंत्र (1) उभे धरा.
2) सेफ्टी पिन (3) फिरवून सील (2) तोडा.




77PM08007

3) सेफ्टी पिन (3) ओढा
4) लिव्हर दाबा (4) आणि नॉझलमधून येणारा फवारा (5) आगीच्या तुमच्यापासून जवळच्या टोकावर, वेगाने इकडून तिकडे आडव्या दिशेने हलवत मारा.





77PM08008

5) आगीच्या ज्वाला विझेपर्यंत आगीला दूरच्या टोकाच्या दिशेने लोटत रहा.

*टीप:*
*आग विझवण्याचे यंत्र हे फक्त बाहेरील कारणामुळे वाहनात लागलेल्या छोट्या आगींसाठी वापरायचे आहे.*

**हे करा आणि हे करु नका**




77PM08001

**हे करा**

1) प्रेशर गेज ठराविक काळानंतर तपासून पहा. अधिकतम चार्जिंग प्रेशर 15किग्रॅफू /सेंमी2 (हिरव्या झोन (2) मध्ये) इतके आहे.
2) प्रेशर कमी झाल्यानंतर इंडिकेटरची सुई (1) लाल भागाकडे (3) जाईल. आग विझवण्याच्या यंत्रावर दिलेल्या माहितीनुसार आग विझवण्याच्या यंत्राच्या निर्मात्याशी त्वरित संपर्क साधा.
3) आग विझवण्याच्या यंत्राचे सर्व्हिसिंग फक्त निर्मात्याच्या सर्व्हिस सेंटरमधूनच करुन घ्या. सर्वात जवळचे सर्व्हिस सेंटर शोधण्यासाठी आग विझवण्याच्या यंत्रावर दिलेली माहिती पहा.
4) आग विझवण्याचे यंत्र कायम वाहनातील त्याच्या ठरलेल्या जागी असेल याची खात्री करा.
5) आग विझवण्याचे यंत्र वापरल्यानंतर त्वरित पुन्हा भरुन घ्या.

**हे करु नका**

1) आग विझवण्याचे यंत्र साफ करण्यासाठी पाणी वापरु नका. (धूळ पुसण्यासाठी साफ फडके वापरा)
2) वापरलेल्या किंवा डिस्चार्ज झालेल्या आग विझवण्याच्या यंत्रावर अवलंबून राहू नका.

*टीप:*

- *आग विझवण्याचे यंत्र प्रत्येक वेळी वापरल्यानंतर त्वरित पुन्हा भरुन घेणे आवश्यक आहे.*
- *आग विझवण्याचे यंत्र जरी वापरले नाही, तरी ते दर 3 वर्षांनी पुन्हा भरुन घेणे आवश्यक आहे.*

# वाहनाच्या बाह्य रुपाची काळजी घेणे

करोजन होऊ नये म्हणून ........................................................ 9-1
वाहनाची सफाई ...................................................................... 9-2

# करोजन होऊ नये म्हणून

तुमच्या वाहनाचे करोजनपासून (क्षारजन्य झीज) रक्षण करण्यासाठी त्याची उत्तम काळजी घेणे महत्वाचे आहे. करोजनला प्रतिबंध करण्यासाठी तुमच्या वाहनाची कशी निगा ठेवावी, यासाठी खाली सूचना दिल्या आहेत. कृपया या सूचना काळजीपूर्वक वाचून त्यांचे पालन करा.

## करोजनबाबत महत्वाची माहिती

### करोजन होण्याची नेहमीची कारणे

1) वाहनाच्या बॉडीच्या खालच्या बाजूला किंवा जिथे सहज हात पोचू शकत नाही अशा जागी रस्त्यावरील क्षारे, धूळ, ओलावा किंवा रसायने जमा होणे.
2) किरकोळ अपघात किंवा छोटे दगड आणि खडी घासल्यामुळे ट्रीटमेंट दिलेल्या किंवा रंगवलेल्या भागांवर चरे उमटणे, पोपडे जाणे किंवा इतर नुकसान.

### करोजन वाढवणार्या पर्यावरणीय परिस्थित

1) रस्त्यावरील क्षार, धूळ नियंत्रक रसायने, समुद्र, हवा यांचे किंवा औद्योगिक प्रदूषण या सर्व गोष्टी करोजनचा वेग वाढवतात.
2) हवेत भरपूर आर्द्रता असेल तेव्हा, विशेषतः तापमान जेमतेम गोठणबिंदूच्या वर असते, तेव्हा करोजनचा वेग वाढतो.
3) वाहनाच्या काही भागांमध्ये जर बराच काळ ओलावा असेल, तर, जरी वाहनाचे बाकीचे भाग कोरडे असले तरी करोजन वाढू शकते.
4) वाहनाच्या ज्या भागांमध्ये हवा पोचून ते लवकर कोरडे होत नाहीत, अशा भागांमध्ये उच्च तापमानाच्या परिस्थितीत करोजनचा वेग वाढतो

या माहितीमळे लक्षात येते, की तुमचे वाहन (विशेषतः बॉडीच्या खालची बाजू) जास्तीत जास्त साफ आणि कोरडे ठेवणे कशासाठी गरजेचे आहे. तसेच रंग किंवा रक्षक कोटिंग्जना झालेले नुकसान लवकरात लवकर दुरुस्त करुन घेणे तितकेच महत्वाचे आहे.

## करोजनला प्रतिबंध

### तुमचे वाहन नियमितपणे धुवा

तुमच्या वाहनाचा फिण्याचा सर्वोतम मार्ग म्हणजे ते नियमितपणे धुवून साफ ठेवणे, जेणेकरुन करोजन रोखण्यास मदत होईल.
तुमचे वाहन हिवाळ्यामध्ये किमान एकदा आणि हिवाळ्यानंतर किमान एकदा धुवा. तुमचे वाहन, विशेषतः त्याच्या बॉडीखालचा भाग शक्य तितका साफ आणि कोरडा ठेवा.
तुम्ही जर वरचेवर क्षारयुक्त रस्त्यांवरुन वाहन नेत असाल, तर तुमचे वाहन हिवाळ्यात किमान दर महिन्यात एकदा धुतले पाहिजे. तुम्ही समुद्राजवळ राहत असल्यास संपूर्ण वर्षभर तुमचे वाहन किमान दर महिन्यात एकदा धुतले पाहिजे.

धुण्याबाबतच्या सूचनांसाठी “वाहनाची सफाई” भाग पहा.

### बाहेरुन आलेल्या/पडलेल्या गोष्टी काढून टाकणे

तुमचे वाहन जर बाहेर उघड्यावर राहिले तर क्षार, रस्त्यावरील ऑईल किंवा डांबर, झाडांच्या साली किंवा पाने, पक्ष्यांची विष्ठा आणि औद्योगिक उत्सर्जने यासारख्या बाहेरुन आलेल्या/पडलेल्या गोष्टी तुमच्या वाहनाच्या फिनिशची हानी करु शकतात. या प्रकारच्या वस्तू त्वरित काढून टाका. त्या धुवून जात नसल्या तर एका वेगळ्या प्रकारच्या क्लीनर पदार्थांची गरज असू शकते. तुम्ही वापरत असलेला कोणताही क्लीनर हा रंग दिलेल्या पृष्ठभागांसाठी हानीकारक नाही आणि खास तुम्हाला हव्या त्याच कारणासाठी आहे, याची खात्री करा. हे खास क्लीनर्स वापरताना उत्पादकाच्या सूचनांचे पालन करा.

### फिनिशची हानी दुरुस्त करा

तुमचे वाहन काळजीपूर्वक तपासून रंगवलेल्या पृष्ठभागांची हानी झाली आहे का ते पहा. कुठेही पोपडे निघालेले किंवा चरे दिसले, तर त्यांचा टच अप त्वरित करुन घ्या म्हणजे करोजनला सुरुवात होणार नाही. पोपडे किंवा चरे खालच्या धातूपर्यंत गेले असले तर ही दुरुस्ती एखाद्या अर्हताप्राप्त बॉडी शॉपकडून करवून घ्या.

### प्रवाशाच्या आणि सामानाच्या जागा साफ ठेवा

ओलावा, घाण किंवा चिखल फ्लोअर मॅट्सच्या खाली जमून करोजन होऊ शकते. मॅट्सखालचे भाग साफ आणि कोरडे असल्याच्या खात्रीसाठी मॅट्स उचलून पहा. जर वाहन डांबरी रस्ते सोडून इतर भागांमध्ये किंवा ओल्या हवेत वापरले जात असले तर या तपासण्या अधिक वारंवार करणे गरजेचे आहे.
काही प्रकारचे माल, जसे रसायने, खते, क्लीनर्स, क्षार, मीठ इ. मुळातच अत्यंत करोजन-कारक असतात. अशा उत्पादनांची सीलबंद कंटेनर्समध्येच वाहतुक करावी. कुठे गळती झाल्यास तो भाग त्वरित साफ करुन कोरडा करावा.

### तुमचे वाहन कोरड्या, हवेशीर ठिकाणी ठेवा

तुमचे वाहन ओलसर, हवा खेळती नसलेल्या जागी उभे करु नका. तुम्ही जर तुमचे वाहन गॅरेजमध्ये धूत असाल किंवा ते ओले असताना चालवत असाल, तर तुमचे गॅरेज ओलसर असू शकते. गॅरेजमधील भरपूर आर्द्रतेमुळे करोजन सुरु होऊ शकते किंवा त्याचा वेग वाढू शकतो. ओले वाहन ठेवलेल्या गॅरेजमध्ये जरी हीटर असला, तरी जर तेथे खेळती हवा नसेल तर वाहनाचे करोजन होऊ शकते.

**⚠ इशारा**

**कॅटॅलिटिक कन्व्हर्टर, एक्झॉस्ट पाईप्स इ. सारख्या एक्झॉस्ट सिस्टिमच्या भागांवर किंवा आजूबाजूला अतिरिक्त अंडरकोटिंग किंवा गंज प्रतिबंधक कोटिंग करु नका. अंडरकोटिंगचा पदार्थ जर फार तापला तर आग लागू शकते.**

## व्हेईकल स्वच्छ्ता




77PM09001

**⚠ इशारा**

**व्हेईकल च्या आतील बाजूस किंवा बाहेरील भाग साफ करताना, रोगण पातळ, पेट्रोल, बेंझिन किंवा ब्लीच किंवा मजबूत घरगुती डिटर्जंट्स सारख्या साफसफाईची सामग्री म्हणून कधीही ज्वलनशील सॉल्व्हेंट्स वापरू नका. साहित्य वैयक्तिक इजा किंवा व्हेईकल नुकसान होऊ शकते.**

## आतील स्वच्छता

**विनील अपहोल्स्ट्री (फ्रंट पॅसेंजर सीट वगळता)**
कोमट पाण्यात मिसळून साबण किंवा सौम्य डिटर्जंटचे द्रावण तयार करा. व्हॉनीलिनवर द्रावणास स्पंज किंवा मऊ कापडाने लावा आणि घाण सोडविण्यासाठी काही मिनिटे भिजवा. घाण आणि साबण सोल्यूशन काढण्यासाठी स्वच्छ, ओलसर कपड्याने पृष्ठभाग घासणे. अद्याप काही घाण पृष्ठभागावर राहिल्यास, ही प्रक्रिया पुन्हा करा.

**फॅब्रिक अपहोल्स्ट्री (फ्रंट पॅसेंजर सीट वगळता)**
वैक्यूम क्लीनरने सैल घाण काढा. सौम्य साबणाचे द्रावण वापरुन, स्वच्छ ओलसर कापडाने डाग असलेल्या ठिकाणी चोळा. साबण काढण्यासाठी, पाण्याने ओले केलेल्या कपड्याने पुन्हा त्या भागात घासून घ्या. डाग मिळेपर्यंत याची पुनरावृत्ती करा किंवा कठोर डागांसाठी व्यावसायिक फॅब्रिक क्लीनर वापरा. आपण फॅब्रिक क्लीनर वापरत असल्यास काळजीपूर्वक निर्मात्याच्या सूचना आणि सावधगिरी बाळगा.

**फॅब्रिक कापड / विनील (समोरच्या प्रवासी सीटसाठी)**
साफसफाईसाठी द्रव वापरू नका कारण यामुळे फॅब्रिकमध्ये प्रवेश होईल आणि सीट सेन्सर खराब होईल.

**⚠ I ko/kkuhpk**

- **समोरच्या प्रवाशाच्या सीट वर द्रव किंवा अर्ध-घन गळवू नका. जर आपण त्यास पुढच्या प्रवाशाच्या सीट वर शिंपडले तर लगेच ते मऊ कापडाने कोरडे पुसून टाका. सेन्सर सह द्रव संपर्क केल्यास सीट बेल्ट रिमाइंडर सेन्सरच्या कार्यावर परिणाम होऊ शकतो.**
- **प्रवाशाच्या सीटवर कोणतीही तीक्ष्ण किंवा जड वस्तू ठेवू नका जी सीटच्या कापडात जाऊ शकतेआणि सेन्सर खराब होऊ शकते.**

### सीट बेल्ट्स
सौम्य साबण आणि पाण्याने सीट बेल्ट्स **(seat belts)** स्वच्छ करा. बेल्ट्सवर **(belts)** ब्लीच किंवा डाय वापरू नका. ते बेल्टस् **(belts)** मधील फॅब्रिक कमकुवत करू शकतात.

### विनाइल फ्लोर मॅट्स
सामान्य धूळ पाणी किंवा सौम्य साबणाने विनाइलवापरुन काढली जाऊ शकते. धूळ सैल करण्यासाठी ब्रश वापरा. धूळ सैल झाल्यावर मॅट्स पाण्याने चांगले धुवा आणि त्या सावलीत वाळवा.

### कार्पेट्स
घाण आणि माती शक्य तेवढी व्हॅक्यूम क्लीनरने साफ करा. सौम्य साबणाचे पाणी घेऊन डाग पडलेले भाग स्वच्छ ओल्या फडक्याने घासा. साबण घालवण्यासाठी त्याच भागांवर पुन्हा एकदा ओल्या फडक्याने घासा. डाग जाईपर्यंत हीच कृती करा, किंवा अधिक चिकट डागांसाठी बाजारात मिळणारा कार्पेट क्लीनर वापरा. कार्पेट क्लीनर वापरत असल्यास उत्पादकाच्या सूचना आणि खबरदार्या काळजीपूर्वक वाचून त्यांचे पालन करा.

### इन्स्ट्रुमेंट
सुटी धूळ व्हॅक्यूम क्लीनरने साफ करा. स्वच्छ ओल्या, घट्ट पिळलेल्या कपड्याने हळुवारपणे घाण पुसून काढा. घाण जाईपर्यंत हीच कृती करा.

***सूचना***

**स्विचेससारख्या इलेक्ट्रिकल वस्तू पुसण्यासाठी सिलिकॉनयुक्त रासायनिक उत्पादने वापरु नका. यामुळे अशा भागांची हानी होईल.**

## बाहेरील भाग साफ करणे

***सूचना***

**तुमचे वाहन साफ आणि धुळीपासून मुक्त ठेवणे महत्वाचे आहे. वाहन साफ न ठेवल्यास रंग उडून जाऊ शकतो किंवा बॉडीच्या विविध भागाचे करोजन होऊ शकते.**

### धुणे

**उदाहरण**



82DY09

**⚠ इशारा**

- **इंजिन सुरु असताना तुमचे वाहन धुण्याचा आणि त्याला वॅक्स लावण्याचा कधीही प्रयत्न करु नका.**
- **बॉडीच्या खालचा भाग आणि फेंडर साफ करताना, तिथे टोके किंवा धार असलेले भाग असल्यामुळे तुमचे हात आणि बाहूंचे कापण्यापासून रक्षण करण्यासाठी तुम्ही ग्लोव्हज आणि लांब बाह्यांचे शर्ट घातले पाहिजेत.**
- **वाहन धुतल्यानंतर ते चालवण्यापूर्वी ब्रेसची चाचणी घेऊन ते व्यवस्थित लागत असल्याची खात्री करा.**

वाहन धुताना ते अशा जागी उभे करा की जेथे त्याच्यावर थेट सूर्यप्रकाश पडणार नाही, आणि खालील सूचनांचे पालन करा:

1) चिखल आणि इतर चिकटलेल्या गोष्टी धुवून काढण्यासाठी वाहनाची खालची बाजू आणि व्हील हाउसिंग्ज दाबाखालील पाण्याने धुवून काढा. भरपूर पाणी वापरा.

***सूचना***

**वाहन धुताना:**
- **प्लास्टिकच्या भागांवर 80°से (176°फॅ) हून जास्त तापमानाचे पाणी किंवा वाफ मारण्याचे टाळा.**
- **इंजिनच्या भागांची हानी टाळण्यासाठी इंजिन कंपार्टमेंटमध्ये दाबाखालील पाणी वापरु नका.**

2) घाण सुटी करण्यासाठी बॉडी घासा. बॉडीच्या बाहेरच्या भागांवरुन घाण किंवा चिखल वाहत्या पाण्याने धुवून टाका. एखादा मऊ स्पंज किंवा ब्रश वापरण्यास हरकत नाही. रंग किंवा प्लास्टिकवर चरे उमटवू शकतील अशा कठीण वस्तू वापरु नका. लक्षात ठेवा, की अनेकदा हेडलाइटची कव्हर किंवा लेन्सेस प्लास्टिकची असतात.

***सूचना***

**रंग किंवा प्लास्टिकच्या पृष्ठभागाची खराबी टाळण्यासाठी भरपूर पाणी न वापरता धूळ नुसती पुसू नका. वरील पद्धतीचे अवश्य अनुकरण करा.**

3) संपूर्ण बाहेरचा भाग स्पंज किंवा मऊ फडक्याने, सौम्य डिटर्जंट किंवा कार वॉश सोपच्या सहाय्याने धुवा. स्पंज किंवा मऊ फडके वरचेवर साबणाच्या पाण्यात बुडवा.

***सूचना***

**बाजारात मिळणारा कार वॉश सोप वापरताना उत्पादकाने सांगितलेल्या खबरदार्या पाळा. कधीही घरगुती वापराचे तीव्र डिटर्जंट किंवा साबण वापरु नका.**

4) धूळ आणि घाण पूर्णपणे धुवून काढल्यानंतर वाहत्या पाण्याने डिटर्जंट धुवून टाका.
5) वाहनाची बॉडी धुतल्यानंतर ओल्या फडक्याने ती पुसा आणि सावलीत वाळवा.
6) रंगवलेल्या पृष्ठभागांचे नुकसान झाले आहे का, हे काळजीपूर्वक तपासा. नुकसान झाले असल्यास खालील पद्धतीने या नुकसानाचा टच अप करा:
   1. नुकसान झालेल्या सर्व जागा साफ करुन कोरड्या करा.
   2. रंग ढवळून सारखा करा आणि छोटा ब्रश वापरुन या जागांचा हलकेच टच अप करा.
   3. रंग पूर्णपणे वाळू द्या.

***सूचना***

**तुम्ही ऑटोमॅटिक कार वॉश वापरत असल्यास तुमच्या वाहनाच्या बॉडीच्या स्पॉयलर्ससारख्या भागांचे नुकसान होत नसल्याची खात्री करा. शंका असल्यास कार वॉश चालकाचा सल्ला घ्या.**

### वॅक्सिंग

**उदाहरण**



77PM09002

वाहन धुतल्यानंतर रंगाचे अधिक रक्षण करुन सौंदर्य वाढवण्यासाठी वॅक्सिंग आणि पॉलिशिंग करावे अशी शिफारस करण्यात येते.

- फक्त चांगल्या दर्जाचे वॅक्स आणि पॉलिश वापरा.
- वॅक्स आणि पॉलिश वापरताना उत्पादकाने दिलेल्या खबरदार्यांचे पालन करा.


# सर्वसाधारण माहिती

वाहनाची ओळख ........................................................................ 10-1
फास्टैग (असल्यास) ................................................................. 10-1
सीएनजी किट नंबर आयडेंटिफिकेशन (असल्यास) ....................... 10-2
हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन प्लेट (एचएसआरपी)
(लागू असल्यास) ....................................................................... 10-3

# वाहनाची ओळख

### चासी क्रमांक

उदाहरण




77PH059

वाहनाची नोंदणी करण्यासाठी चासी आणि/किंवा इंजिनचे अनुक्रमांक वापरले जातात. तसेच ते तुमच्या डीलरला, ऑर्डर करण्यास किंवा सर्व्हिसबाबत खास माहिती देण्यास मदत करण्यासाठीही वापरले जातात. तुम्हाला जेव्हा कधी तुमच्या अधिकृत मारुती सुझुकी कमर्शियल वर्कशॉपचा सल्ला घेण्याची वेळ येईल, तेव्हा तुमच्या वाहनाची ओळख सांगण्यासाठी हा क्रमांक सांगण्याचे लक्षात ठेवा. हा क्रमांक वाचायला कठीण आहे असे वाटले, तर तो तुम्हाला आयडेंटिफिकेशन प्लेटवरही मिळेल.

### इंजिनचा क्रमांक

उदाहरण



54G082


इंजिन क्रमांक हा चित्रात दाखवल्यानुसार सिलिंडर ब्लॉकवर स्टॅम्प केलेला असतो.

## फास्टैग (असल्यास)

रस्ते वाहतुक आणि महामार्ग मंत्रालयानुसार फास्टैग (1) हा इलेक्ट्रॉनिक टोल संकलनासाठी किंवा भारत सरकार निश्चित करेल त्या अन्य कोणत्याही उद्देशासाठी, प्रत्येक वाहनासाठी बंधनकारक आहे.


फास्टैग टॅगचे नुकसान झाल्यास किंवा फ्रंट विंडस्क्रीन बदलल्यास कृपया तुमच्या जवळच्या अधिकृत मारुती सुझुकी कमर्शियल वर्कशॉपशी संपर्क साधा.

उदाहरण




66MM01001


### वाहनाच्या आतील बाजूने पाहिले असता




64MM01002

*टीप:*
*हे दाखवलेले चित्र फक्त कल्पना येण्यासाठी आहे. वाहनावर प्रत्यक्षात असलेल्या उपकरणाची आतील रचना वेगळी असू शकते.*

### वाहनाच्या बाहेरील बाजूने पाहिले असता





64MM01002

*टीप:*
*हे दाखवलेले चित्र फक्त कल्पना येण्यासाठी आहे. वाहनावर प्रत्यक्षात असलेल्या उपकरणाची आतील रचना वेगळी असू शकते.*

*टीप:*
- *विंडस्क्रीनवरुन हा टॅग काढण्याचा प्रयत्न केल्यास टॅगचे कायमचे नुकसान होईल.*
- *जेथे टॅग आहे त्या विंडस्क्रीनच्या भागाच्या सफाईसाठी रासायनिक क्लीनर्स वापरल्यास टॅगचे नुकसान होऊ शकेल.*
- *टॅगवर कोणतीही धारदार किंवा अणकुचीदार वस्तू वापरल्यास टॅगचे नुकसान होऊ शकेल.*

## सीएनजी किट नंबर आयडेंटिफिकेशन (असल्यास)




77PM10002


सीएनजी सिलिंडर आयडेंटिफिकेशन नंबर आणि सीएनजी किट बसवल्याचा दिनांक येथे दाखवल्यानुसार कार्गो बॉडीच्या उजव्या बाजूला असतात.

## हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन प्लेट (एचएसआरपी) (लागू असल्यास)

मिनिस्ट्री ऑफ रोड ट्रान्स्पोर्ट ॲंड हायवेजच्या अनुसार प्रत्येक नवीन वाहनाला एचएसआरपी असली पाहिजे.
एचएसआरपी मध्ये या गोष्टी समाविष्ट असतात;

- पुढची आणि मागची एचएसआरपी, जी नंबर प्लेटच्या भागावर प्रत्येकी 2 स्नॅप-लॉक्स वापरून बसवली जाईल.
- तिसरी लायसन्स प्लेट पुढच्या विंडशील्ड.


### तिसरी लायसन्स प्लेट




64MM01005

(1) तिसरी लायसन्स प्लेट

### तिसरी लायसन्स प्लेट - वाहनाच्या बाहेरून पाहिली असता जशी दिसेल तशी




64MM01008


(a) एचएसआरपी प्रदान करणार्या अधिकार्यांचे नाव
(b) वाहनाचा रजिस्ट्रेशन नंबर
(c) युनिक लेझर नंबर - पुढची प्लेट
(d) युनिक लेझर नंबर - मागची प्लेट
(e) 1 ल्या रजिस्ट्रेशनची तारीख (दिदि-मम-ववvव फॉर्मॅटमध्ये )

*टीप:*
*दाखवलेले चित्र फक्त उदाहरणादाखल दिले आहे. वाहनावर प्रत्यक्ष बसवलेल्या लेबलचे इंटर्नल स्ट्रक्चर वेगळे असू शकते.*

*टीप*

- *विंडस्क्रीनवरून तिसरी लायसन्स प्लेट काढण्याचा कोणताही प्रयत्न केल्यास लेबलचे कायमस्वरुपी नुकसान होईल.*
- *विंडस्क्रीनवर जेथे लेबल लावले असेल त्या भागावर रासायनिक क्लीनर्स लावून तो साफ करण्याचा प्रयत्न केल्यास त्याचे नुकसान होऊ शकते.*
- *लेबलवर कोणतीही धारदार किंवा अणकुचीदार वस्तू वापरल्यास लेबलचे नुकसान होऊ शकते.*
- *तिसरी लायसन्स प्लेट बदलून दुसरी लावल्याच्या प्रसंगी हवा असल्यास कृपया प्रमाणित अधिकार्यांशी संपर्क साधा.*

### तिसरी लायसन्स प्लेट - वाहनाच्या आतील बाजूने पाहिली असता जशी दिसेल तशी




64MM01009

*टीप:*
*दाखवलेले चित्र फक्त उदाहरणादाखल दिले आहे.*

*टीप:*
*तिसर्या लायसन्स प्लेटचा रंग (मागील बाजू) हा मिनिस्ट्री ऑफ रोड ट्रान्स्पोर्ट ॲंड हायवेज यांनी निश्चित केलेल्या एचएसआरपी नियमानुसार आहे.*

# विनिर्देशने

*टीप:*
*विनिर्देशने कोणत्याही पूर्वसूचनेशिवाय बदलली जाऊ शकतात.*

पेट्रोल: पेट्रोल इंजिन मॉडेल
बाय-फ्युएल: बाय-फ्युएल (पेट्रो ल+सीएनजी) इंजिन मॉडेल
डिझेल: डिझेल इंजिन मॉडेल

| **वस्तू: मापे** | **माप: मिमी** | |
|---|---|---|
| एकूण लांबी | | 3800 |
| एकूण रुंदी | | 1562 |
| एकूण उंची | | 1883 |
| व्हीलबेस | | 2110 |
| ट्रॅक | पुढील | 1345 |
| | मागील | 1330 |

| **वस्तू: वस्तुमान (वजन)** | **माप: किग्रॅ** | |
|---|---|---|
| कर्ब मास (वजन) | पेट्रोल | 860 |
| | बाय-फ्युएल | 975 |
| | डिझेल | 860 |
| ग्रॉस व्हेईकल मास (वजन) रेटिंग | | 1600 |
| पर्मिसिबल मॅक्सिमम ऍक्सल वेट | पुढील | 900 |
| | मागील | 1020 |

| वस्तू: इंजिन | डिझेल | पेट्रोल आणि बाय-फ्युएल |
|---|---|---|
| प्रकार | E08A (DOHC) | G12B (DOHC) |
| सिलिंडर्सची संख्या | 2 | 4 |
| बोअर | 77.0 मिमी | 71 मिमी |
| स्ट्रोक | 85.1 मिमी | 75.5 मिमी |
| पिस्टन डिस्प्लेसमेंट | 793 सेंमी$^3$ | 1196 सेंमी$^3$ |
| कम्प्रेशन रेश्यो | 15.1 ± 0.4 : 1 | 9.9 : 1 |

| वस्तू: इलेक्ट्रिकल | | |
|---|---|---|
| स्पार्क प्लग्ज | पेट्रोल | BOSCH-FR6DC |
| | बाय-फ्युएल | |
| बॅटरी | | 12V 38B20R |
| फ्युजेस | | “तपासणी आणि देखभाल” भाग पहा. |

| वस्तू: लाइट्स | | वॅटेज | बल्ब क्र. |
|---|---|---|---|
| हेडलाइट | | 12V 60/55W | H4 |
| पोझिशन लाइट | | 12V 5W | W5W |
| वळण्याच्या सिग्नलचा लाइट लाइट | पुढील | 12V 21W | PY21W |
| | मागील | 12V 21W | P21W |
| ब्रेक/टेल लाइट | | 12V 21/5W | P21/5W |
| रिव्हर्सिंग | | 12V 21W | P21W |
| लायसन्स प्लेट लाइट | | 12V 5W | W5W |
| वाहनाच्या आतील बाजूचा लाइट | | 12V 5W | C5W |

| वस्तू: चाके आणि टायर्स | |
|---|---|
| पुढील, मागील आणि अतिरिक्त टायरचे आकारमान | 155R13 LT 8PR 90/89Q* |
| रिमचे आकारमान | 13X4J |
| टायरमधील प्रेशर | विनिर्देशित टायर प्रेशरसाठी ड्रायव्हरच्या डोअर लॉक पिलरवरील टायरची माहिती देणारे लेबल पहा. |

* तुम्ही जर विनिर्देशित लोड इंडेक्स आणि स्पीडच्या खुणेसह टायर तयार करु शकत नसाल, तर अधिक लोड इंडेक्स आणि स्पीडच्या खुणेसह टायर तयार करा.


| वस्तू: शिफारसकृत इंधन/लुब्रिकंट्स आणि क्षमता (सुमारे) | | | | |
|---|---|---|---|---|
| इंधन | पेट्रोल | | “इंधनासाठी शिफारस” भाग पहा. | 30 लीटर# |
| | बाय-फ्युएल | पेट्रोल | | 5 लीटर# |
| | | सीएनजी | | 35 लीटर × 2 टँक्# |
| | डिझेल | | | 30 लीटर# |
| इंजिन ऑईल | पेट्रोल | | वर्गीकरण: एसजी+, एसएच, एसजे, एसएल, एसएम किंवा एसएन<br>चिकटपणा: SAE 5W-30 | 5.2 लीटर (ऑईल फिल्टरसह बदलणे) |
| | बाय-फ्युएल | | | |
| | डिझेल | | सिंथेटिक ऑईल, वर्गीकरण: एसीईए ए5/बी5<br>चिकटपणा: SAE 5W-30 | 3.4 लीटर (ऑईल फिल्टरसह बदलणे) |
| इंजिन कूलंट | | | “तपासणी आणि देखभाल” भाग पहा. | 3.5 लीटर (रिझर्व्हॉयर टँक सहित) |
| मॅन्युअल ट्रान्समिशन ऑईल | पेट्रोल | | “एमजीजीओ 75W-80” | 1.4 लीटर |
| | डिझेल | | | 1.3 लीटर |
| रिअर डिफरन्शियल ऑईल | | | “टीओटीएएलएफआयएनएईएलएफ टीआरएएनएसईएलएफ एलएल 85W-140” | 1.6 लीटर |
| ब्रेक फ्लुइड | | | मारुतीचे खरे ब्रेक फ्लुइड (एमजीबीएफ) किंवा डॉट 3 | “तपासणी आणि देखभाल” भागामधील सूचनांनुसार ऑईलच्या योग्य पातळीपर्यंत भरा. |

# फ्युएल टँकची क्षमता ही तुम्हाला इंधन भरण्यासाठीच्याशिफारस केलेल्या प्रमाणापेक्षा बरीच जास्त असते. ही अतिरिक्त मोकळी जागा सुरक्षिततेसाठी आणि शास्त्रीय कारणांसाठी ठेवलेली असते.

## बॉडी फॅब्रिकेशनसाठी सूचना (चॅसी प्रकारासाठी) (पेट्रोलइंजिनच्या मॉडेलसाठी)

बॉ-चॅसी वाहनावरील बॉडी फॅब्रिकेशन खालील शिफारसी व सीमाविषयक अटींची खात्री करुन करावेः

ए) **मापे** : उत्पादकाने पुरवलेल्या कॅब-चॅसी वाहनावर बांधण्याच्या लोड बॉडी/ॲप्लिकेशनची रचना खाली दिलेल्या चित्रामध्ये दाखवल्यानुसार एका कमाल आणि किमान आकारमानाच्या एन्व्हलपमध्ये बसू शकेल, अशा रीतीने करावी.





77PM12001

बी) **वजनव त्याचे वितरण**% लोड बॉडी/ॲप्लिकेशनचे फॅब्रिकेशन संपूर्ण वाहनाचे किमान कर्ब वेट 860 किग्रॅ आणि संपूर्ण वाहनाचे कमाल कर्ब वेट 1140 किग्रॅ असा विचार करुन करावे. फ्रंट ॲक्सलचे कर्ब वेट आणि रिअर ॲक्सलचे कर्ब वेट यांचे प्रमाण 1.46 पेक्षा जास्त असू नये.
बॉडी-बिल्डरने सीएमव्हीआर नियम 122 च्या आवश्यकतेनुसार बॉडी-बिल्डरची अनलेडन वजन आणि पेलोड सांगणारी प्लेट बसवावी.

सी) **बॉडी एक्स्टीरिअर्स** % लोड बॉडी/ॲप्लिकेशन अशा रीतीने फॅब्रिकेट करावे, जेणेकरुन वाहनाच्या बाहेरील भागावर कोणत्याही धारदार कडा किंवा टोकदार भाग बाहेर येणार नाहीत, ज्यामुळे वाहनाशी टक्कर झाल्यास बॉडीवर्कवर येऊन आदळणाÚया किंवा घासून जाणाÚया व्यक्तीला गंभीर शारीरिक इजा होण्याचा धोका वाढू शकेल. संपूर्ण वाहन जेव्हा थांबलेले असेल तेव्हा, तसेच ते चाललेले असेल तेव्हाही हे लागू आहे. बाहेरच्या कडा आणि बाहेर आलेल्या भागांवर किमान 2.5 मिमी त्रिज्येचा गोलाकार आकार केला जावा अशी शिफारस करण्यात येते. बॉडी ही सीएमव्हीआर नियम 124(1)-11 मधील आवश्यकतांची पूर्तता करेल.

डी) **लाइटिंग आणि सिग्नलिंगची उपकरणे :** कॅब चॅसी ही कॅबमध्ये इनबिल्ट असलेली हेड लॅम्प असेंब्ली आणि रिअर कॉम्बिनेशन लॅम्प्स आणि रजिस्ट्रेशन प्लेट लॅम्प्स यांच्यासहित पुरवली आहे. हेड लॅम्प असेंब्लीच्या पोझिशनमध्ये कोणताही बदल केला जाऊ नये. मागच्या बाजूचे कॉबिनेशन लाम्प्स, नोंदणी प्लेट लाम्प्स आणि पार्किंग सेन्सर्स (जे ग्लोव्ह बॉक्स मध्ये व्हेईकल सह प्रदान केलेले आहेत) ते खाली चित्रात निर्दिष्ट केलेल्या शिफारस केलेल्या स्थानानुसार लोड बॉडी / एप्लीकेशन वर बसवावे.



77PM12004

ई) **रिफ्लेक्टिव्ह टेप :** बॉडी बिल्डरने वाहनाच्या पागील भागावर बॉडीची संपूर्ण रुंदी व्यापणारी एक लाल रिफ्लेक्टिव्ह टेप (किमान 20 मिमी रुंदीची) बसवावी आणि सीएमव्हीआर नियम 104 मधील आवश्यकतांची पूर्तता करावी.

एफ) **फॉर्म 22अ भाग 2 :** बॉडी बिल्डरने सीएमव्हीआर नियम 47 च्या आवश्यकतेनुसार फॉर्म 22 अ भाग 2 द्यावा.

जी) बॉडी बिल्डरने बॉडी फॅब्रिकेशन करताना इलेक्ट्रिकल वायरिंग, इलेक्ट्रिकल सामुग्री, ब्रेक कनेक्शन्स, ब्रेक पाइपिंग, फ्युएल कनेक्शन, एक्झॉस्ट सिस्टिम आणि चॅसी कम्पोनंट्स यांमध्ये कोणतेही बदल करता कामा नये.


**अस्वीकृती :** मालकाने/बॉडी बिल्डरने सुपर कॅरी चॅसी प्रकाराच्या बॉडी फॅब्रिकेशनच्या संबंधीच्या वेळोवेळी सर्व लागू असलेल्या सीएमव्हीआर आणि राज्य मोटर वाहन नियमांचे पालन करावे.

वाहन उत्पादक हे वाहन उत्पादकाने केलेल्या शिफारसी आणि सध्याचे नियम डावलून करण्यात आलेल्या बॉडी/ॲप्लिकेषनच्या फॅब्रिकेषनमध्ये लागू कायद्यांचे पालन न झाल्यास त्यासाठी जबाबदार राहणार नाहीत.

| ⚠ सावधानीचा इषाराः |
| --- |
| **तुमचे सुपर कॅरी वाहन डेक/बॉडी फॅब्रिकेषन केल्याषिवाय ठेवू नका.** |

**(डिझेल इंजिनच्या मॉडेलसाठी)**
कॅब-चॅसी वाहनावरील बॉडी फॅब्रिकेशन खालील शिफारसी व सीमाविषयक अटींची खात्री करुन करावेः

ए) **मापे :** उत्पादकाने पुरवलेल्या कॅब-चॅसी वाहनावर बांधण्याच्या लोड बॉडी/ॲप्लिकेशनची रचना खाली दिलेल्या चित्रामध्ये दाखवल्यानुसार एका कमाल आणि किमान आकारमानाच्या एन्व्हलपमध्ये बसू शकेल, अशा रीतीने करावी.





77PM12001

बी) **वजन व त्याचे वितरण :** लोड बॉडी/ॲप्लिकेशनचे फॅब्रिकेशन संपूर्ण वाहनाचे किमान कर्ब वेट 860 किग्रॅ आणि संपूर्ण वाहनाचे कमाल कर्ब वेट 930 किग्रॅ असा विचार करुन करावे. फ्रंट ॲक्सलचे कर्ब वेट आणि रिअर ॲक्सलचे कर्ब वेट यांचे प्रमाण 1.389 पेक्षा जास्त असू नये.
बॉडी-बिल्डरने सीएमव्हीआर नियम 122 च्या आवश्यकतेनुसार बॉडी-बिल्डरची अनलेडन वजन आणि पेलोड सांगणारी प्लेट बसवावी.

सी) **बॉडी एक्स्टीरिअर्स :** लोड बॉडी/ॲप्लिकेशन अशा रीतीने फॅब्रिकेट करावे, जेणेकरुन वाहनाच्या बाहेरील भागावर कोणत्याही धारदार कडा किंवा टोकदार भाग बाहेर येणार नाहीत, ज्यामुळे वाहनाशी टक्कर झाल्यास बॉडीवर्कवर येऊन आदळणाÚया किंवा घासून जाणाÚया व्यक्तीला गंभीर शारीरिक इजा होण्याचा धोका वाढू शकेल. संपूर्ण वाहन जेव्हा थांबलेले असेल तेव्हा, तसेच ते चाललेले असेल तेव्हाही हे लागू आहे. बाहेरच्या कडा आणि बाहेर आलेल्या भागांवर किमान 2.5 मिमी त्रिज्येचा गोलाकार आकार केला जावा अशी शिफारस करण्यात येते. बॉडी ही सीएमव्हीआर नियम 124(1)-11 मधील आवश्यकतांची पूर्तता करेल.

डी) **लाइटिंग आणि सिग्नलिंगची उपकरणे :** कॅब चॅसी ही कॅबमध्ये इनबिल्ट असलेली हेड लॅम्प असेंब्ली आणि रिअर कॉम्बिनेशन

लॅम्प्स आणि रजिस्ट्रेशन प्लेट लॅम्प्स यांच्यासहित पुरवली आहे. हेड लॅम्प असेंब्लीच्या पोझिशनमध्ये कोणताही बदल केला जाऊ नये. रिअर कॉम्बिनेशन लॅम्प्स आणि रजिस्ट्रेशन प्लेट लॅम्प्स हे खालील चित्रामध्ये दिलेल्या शिफारसकृत पोझिशनमध्ये (उंची आणि रुंदी) लोड बॉडी/ॲप्लिकेशनवर बसवावे.




77PM12002

ई) **रिफ्लेक्टिव्ह टेप :** बॉडी बिल्डरने वाहनाच्या पागील भागावर बॉडीची संपूर्ण रुंदी व्यापणारी एक लाल रिफ्लेक्टिव्ह टेप (किमान 20 मिमी रुंदीची) बसवावी आणि सीएमव्हीआर नियम 104 मधील आवश्यकतांची पूर्तता करावी.

एफ) **फॉर्म 22अ भाग 2 :** बॉडी बिल्डरने सीएमव्हीआर नियम 47 च्या आवश्यकतेनुसार फॉर्म 22 अ भाग 2 द्यावा.

जी) बॉडी बिल्डरने बॉडी फॅब्रिकेशन करताना इलेक्ट्रिकल वायरिंग, इलेक्ट्रिकल सामुग्री, ब्रेक कनेक्शन्स, ब्रेक पाइपिंग, फ्युएल कनेक्शन, एक्झॉस्ट सिस्टिम आणि चॅसी कम्पोनंट्स यांमध्ये कोणतेही बदल करता कामा नये.

**अस्वीकृती :** मालकाने/बॉडी बिल्डरने सुपर कॅरी चॅसी प्रकाराच्या बॉडी फॅब्रिकेशनच्या संबंधीच्या वेळोवेळी सर्व लागू असलेल्या सीएमव्हीआर आणि राज्य मोटर वाहन नियमांचे पालन करावे.

वाहन उत्पादक हे वाहन उत्पादकाने केलेल्या शिफारसी आणि सध्याचे नियम डावलून करण्यात आलेल्या बॉडी/ॲप्लिकेषनच्या फॅब्रिकेषनमध्ये लागू कायद्यांचे पालन न झाल्यास त्यासाठी जबाबदार राहणार नाहीत.

| ⚠ सावधानीचा इषाराः |
| --- |
| **तुमचे सुपर कॅरी वाहन डेक/बॉडी फॅब्रिकेषन केल्याषिवाय ठेवू नका.** |